शब्दसंगती, ग्रंथनिर्मिती, पुस्तकवाचन ग्रंथाली
तऱ्हेतऱ्हेच्या विषयकल्पना, विचारमंथन ग्रंथाली
रसिक–वाचक जनामनाचे ओळखते मन ग्रंथाली
काळासोबत कालसुसंगत अक्षरजीवन ग्रंथाली
भाषेचे अन् साहित्याचे सखोल स्पंदन ग्रंथाली
– चंद्रशेखर सानेकर

# शब्द रुची

४७

मार्च २०२३ • मूल्य १० रु. • पृष्ठे ४८

**महाराष्ट्र शासनाचा श्री.पु. भागवत स्मृती उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार २०२२, ग्रंथालीस प्राप्त!**



चंद्रकांत पाटील (उच्च शिक्षण व तंत्रज्ञान मंत्री ), दीपक केसरकर (मराठी भाषा विभाग मंत्री) यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना सुदेश हिंगलासपूरकर (विश्वस्त–ग्रंथाली). सोबत मनीषा पाटणकर–म्हैसकर (अप्पर मुख्य सचिव, मराठी भाषा विभाग) आणि सदानंद मोरे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ)

**पुरस्कारप्राप्त संस्था व व्यक्ती**



महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे



कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी



डॉ. विठ्ठल वाघ यांच्या वतीने पुरस्कार स्वीकारताना त्यांचे चिरंजीव



डॉ. द.ता. भोसले



प्रा. चंद्रकुमार नलगे



@abpmajhatv
कट्टा अमर्याद व्यक्तिमत्वांचा
कट्टा दिलखुलास संवादांचा!
abp माझा
१० माझा कट्टा
दशकाचा...दर्शकांचा...
पाहा दर शनि. रात्री ९ वा. आणि
पुन:प्रक्षेपण रवि. सकाळी ९ वा.
एबीपी माझावर
एपिसोड्स पाहण्यासाठी स्कॅन करा.
6.15 million Followers
1.39 million Followers
1.42 million Followers
9.64 million Subscribers
facebook.com/abpmajha
instagram.com/abpmajhatv
twitter.com/abpmajhatv
www.kooapp.com/profile/abpmajha
youtube.com/abpmajhatv
www.abplive.com
For queries, please contact: adsales@abpnetwork.com | Download the ABP Live app

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

मार्च २०२३, वर्ष नववे
अंक अकरावा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**

SCAN & PAY
GRANTHALI

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

४७
ग्रंथाली

## अनुक्रम

नाट्यदिग्दर्शनाचं शतक... / ५
**पूजा सामंत**

विज्ञानसाहित्यात लेखिकांचे योगदान / ८
**संजीवनी खेर**

त्या दोघी / ११
**अपर्णा पाटील**

अक्षयभाषा : अमेरिकेत मराठीची रुजवात / १६
**विनता कुलकर्णी**

संक्षिप्ताकारातील मोठ्या अवकाशाची कविता / १९
**किरण येले**

पाण्याच्या प्रदूषणाच्या समस्या व त्यांचे निराकरण / २२
**शरद काळे**

विनया मॅथ्यू / २६
**प्रकाश दुधलकर**

दगडाला बोलतं करणारे साधक / २९
**विजयराज बोधनकर**

कवितेचे घर / ३२
**प्रमोद नारायणे**

**कार्यक्रम-प्रकाशनवृत्तांत / ३५**

**'ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ४३**

# संपादकीय...

महाराष्ट्र शासनाच्या साहित्य संस्कृती मंडळ, मराठी भाषा विभाग आदी संस्थांचे २०२२ चे जीवनगौरव पुरस्कार व्यक्ती आणि संस्थांना नुकतेच दिले गेले. ग्रंथालीला श्री.पु. भागवत स्मृती उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कार मिळाला, याचा खचितच आनंद आहे. तो मिळाल्याचे पत्र आल्यापासून सुदेश हेच सांगतो आहे, की ४८ वर्षे सुरू असलेल्या मराठी वाचनप्रसाराच्या कार्यात संस्थापकांसह अनेक कार्यकर्ते, हितचिंतक, वेळोवेळी पाठी उभे राहणारे सुहृद आणि संस्था अशा अनेकांचा सहभाग आहे. त्या साऱ्यांचा हा सन्मान आहे. 'ग्रंथाली'चे संस्थापक-विश्वस्त यांनी 'ग्रंथाली' हे एक विचारांचे खुले व्यासपीठ निर्माण केले. केवळ प्रकाशने नाहीत, तर विविध उपक्रमांतून हा ज्ञानयज्ञ चालला. एका टप्प्यावर नवीन पिढीकडे हा वारसा सुपूर्द झाला. तरी संस्थेचे मूळ उद्दिष्ट आणि विचार यात बदल न होता 'ग्रंथाली' नव्या माध्यमांतही रुजली. त्यामुळेच आज जगभरच्या वाचकांच्या या पुरस्काराबद्दल अभिनंदनपर प्रतिक्रिया आल्या. एक वाचक चळवळ म्हणून 'ग्रंथाली'ला तितक्याच आपलेपणाने समाजाकडून बळ मिळते आहे, ही प्रोत्साहक बाब आहे.

'ग्रंथाली'प्रमाणे कोकण मराठी साहित्य परिषद आणि महाराष्ट्र साहित्य परिषद या संस्थांचे कार्य मोलाचे आहे. त्यांनाही जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले याचा आम्हाला आनंद वाटतो. प्राध्यापक चंद्रकुमार नलगे डॉ. द.ता. भोसले आणि डॉ. विठ्ठल वाघ या व्यक्तीही एकेक संस्थाच आहेत. त्यांचे कार्य अचंबित करणारे आहे. त्यांना मिळालेला जीवनगौरव पुरस्कार सार्थ आहे. याशिवाय विविध प्रकारच्या लेखकांना त्यांच्या साहित्यकृतीसाठी पुरस्कार लाभले आहेत. या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

यावेळी सरकारतर्फे वाचनवृद्धीसाठी, साहित्यिकांच्या सोयीसाठी, छोट्या वाङ्मय मंडळांसाठी काही योजना जाहीर झाल्या. सरकार सुविधा देईल हे खरे, मात्र मराठी भाषादिनापुरते त्याचे कवतिक न राहता घराघरात मराठी वाचन, मराठी संस्कृती जोपासली गेल्यास पुढील मराठी भाषादिन अधिक उत्साहात पार पडतील.

'ग्रंथाली' प्रतिभांगणच्या माध्यमातून 'कॉर्पोरेट गप्पा', 'ग्लोबल रेसिलिअन्स फॉर इंडियन युथ', 'आरोग्याची कॅप्सुल', 'विज्ञानधारा', 'जीवनोत्सव' या उपक्रमांसह २८ फेब्रुवारी या विज्ञानदिनाचे औचित्य साधत डॉ. सुधीर थत्ते आणि नंदिनी थत्ते यांच्या 'विज्ञानगप्पा' या उपक्रमाचा आरंभ झाला. विविध शाळांतील काही मुले व शिक्षकांनी त्याचा प्रत्यक्ष व फेसबुकद्वारा अनेकांनी लाभ घेतला.

याच दिवशी 'ग्रंथाली'ने डॉ. शरद काळे यांच्या कल्पनेतून आणि प्रत्यक्ष पुढाकारातून साकारलेली शालेय विद्यार्थ्यांसाठी 'विज्ञान एकांकिका स्पर्धा' आयोजित केली. त्याची अंतिम फेरी दादर-माटुंगा सांस्कृतिक केंद्रात पार पडली. यावेळी पहिल्या तीन व उत्तेजनार्थ दोन अशा पाच शाळांना बक्षिसे देण्यात आली. त्यात शालेय अंतिम परीक्षांचे दिवस ध्यानात घेऊनही तेरा शाळांनी सहभाग नोंदवला, ही कौतुकास्पद बाब आहे. मुंबई व आसपासच्या शाळांप्रमाणेच अगदी सातारा इथूनही शिक्षका-विद्यार्थी सहभागी झाले. त्यात शाळांचे संस्थापक, प्राचार्य आणि शिक्षकांचा सक्रिय पाठिंबा समाधान देणारा होता. 'ग्रंथाली'चे विज्ञान पोचवण्यासाठी हे नवे पाऊल असून दरवर्षी वाढत्या संख्येने त्यात शालेय विद्यार्थी सहभागी होतील असा विश्वास आहे.

'ग्रंथाली'चे आरंभापासूनचे कार्यकर्ते, लेखक, संपादक, सिनेनिर्माता अशी चौफेर ओळख असलेले जयंत धर्माधिकारी यांचे निधन नुकतेच झाले. सांस्कृतिक क्षेत्राला ते चटका लावणारे आहे.

परदेशी चित्रकारांची कला व जीवन उलगडणारा 'चित्रगुज पश्चिमेचे' हे सदर विजयराज बोधनकर यांनी लिहून अनेक अप्रकाशित चित्रकार आपल्यापुढे मांडले. या सदरातला शेवटचा लेख या अंकात प्रसिद्ध होत आहे. बोधनकर यांनी केलेल्या उत्स्फूर्त सहकार्याबद्दल आभार.

अन्य नियमित सदरे आहेतच. या अंकापासून दर अंकात विनता कुलकर्णी अमेरिकेतील वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या व्यक्ती/संस्थांची ओळख करून देणार आहेत; तसेच, संजीवनी खेर जागतिक लेखिकांच्या अभिजात साहित्याची माहिती देणारे सदर लिहिणार आहेत.

**– अरुण जोशी**

# नाट्यदिग्दर्शनाचं शतक...



पूजा सामंत

**मराठी** रंगभूमीवर विजय केंकरे यांनी शंभर नाटकं दिग्दर्शित करण्याचा विक्रम यंदा २०२३ मध्ये केलाय. सध्या त्यांचे शंभरावे नाटक 'काळी राणी' हाऊसफुल गर्दी खेचतंय. प्रख्यात नाट्यकर्मी दामू केंकरे व ललिता केंकरे यांचा हा मुलगा. पित्यापेक्षा कारकिर्दीत दहा पावलं पुढेच..

विजय केंकरे यांच्याशी केलेल्या ह्या गप्पा!

शंभर नाटकं दिग्दर्शित करणं हा विक्रम! हा विक्रम हल्लीच तुमच्या नावावर कायम झाला! बॉलिवूडमधील अनेक नामवंत दिग्दर्शकांच्या नावावर त्यांच्या पूर्ण कारकिर्दीत अवघ्या ५-६ कलाकृती आहेत.. मग तुमच्या नावावर तब्बल शंभर नाटकांचा विक्रम झालाय! काय भावना आहेत?

- काम करत राहिलो, एका-मागोमाग नाटकं करत गेलो. मनात मी काही विक्रम करतोय, केला आहे, अशी भावना चुकूनही आली नाही. किंबहुना तसा विचारच केला नाही. माझ्या माहितीप्रमाणे आत्माराम भेंडे यांनी ऐंशी नाटकं केलीत, कुणी पंजाबमध्ये ५० पेक्षा अधिक नाटकं केलीत. मनात आनंद आहे पण आनंदापेक्षा जबाबदारी वाटते. अधिक उत्कृष्ट नाटकं केली पाहिजेत अशी भावना मनात निर्माण होते.

प्रवासात येता-जाता मन भूतकाळात डोकावतं.. प्रख्यात निर्माता सुधीर भट असे निर्माते होते की त्यांच्यामुळे आम्ही आजही उभे आहोत, काम करत आहोत. उत्सवमूर्ती, प्रेरणादायी सुधीर भट नवीन नाटक दे म्हणत धोशा लावत. त्यांच्या अशा प्रेमळ आग्रहामुळे आव्हानं स्वीकारण्याची आणि ती कार्यक्षमतेने पार पाडायची सवय लागली. सुधीर भटांसोबत माझी तब्बल पन्नास नाटकं झालीत. प्रेक्षकांना आवडेल ते देण्याची हातोटी होती सुधीर भटांकडे. १९८५मध्ये पहिलं नाटक मी केलं. मी, सुधीर भट, मंगेश कदम, आमचं चांगलंच गुळपीठ होतं. रत्नाकर मतकरींसोबत बारा नाटकं केली.



विजय केंकरे

तुमचे कुणी गुरू होते का ह्या व्यवसायात?

- माझे वडील दामू केंकरे यांचं बोट धरून मी ह्या व्यवसायात आपोआप आलो. जाणीवपूर्वक ह्या व्यवसायात येण्याचा काही निर्णय घेतला नव्हता.. पण पहिले गुरू माझे बाबाच. मग आई ललिता केंकरे. अनेक सन्माननीय व्यक्ती



‘३८ कृष्णव्हिला’ या नाटकातील नेहा पेंडसे, डॉ. गिरीश ओक आणि विजय केंकरे

माझ्या गुरू. पंडित सत्यदेव दुबे यांनी दिलेली शिकवण आजही प्रासंगिक, ठळक आठवते. दुबेजी म्हणत, अच्छा नाटक करने के लिये कभी रुकना नहीं, बस नाटक करते रहो. नाटक केलं तरच विकास घडतो. ते चांगलं की वाईट हा त्या नंतरचा टप्पा.. त्यांच्या या सल्ल्यानंतर, या; या नाटक करण्याची सवय लागली. सतीश आळेकर, राजीव नाईक हे दिग्गजदेखील माझ्या प्रवासात भेटलेत. ललित कला केंद्रात विद्यार्थी आणि रंगभूमीवर शिकवता आलं. मुंबई विद्यापीठाच्या व्हिजिटिंग फॅकल्टीमध्ये नाटक केलं आणि सगळ्यात तरुण विद्यार्थ्यांशी संवाद साधता आला. त्यांच्याशी इंटरॲक्ट होत असताना जाणवलं की ते कशा पद्धतीनं विचार करतात. नवं तंत्र-तांत्रिक बाजू कशा समजून घेतात हे समजलं. मी माझ्या ह्या विद्यार्थ्यांशी सहज गप्पा मारता मारता शिकवतो. सहज गप्पा मारत काम करण्याची माझी पद्धत आजही आहे. हे विद्यार्थी, अनेक दिग्गज यांचा सहवास मला लाभला, हे सगळेच गुरू. मी शिकलो, शिकवलं.. ह्या प्रोसेसमधून घडलो. घडत गेलो. फार माध्यमांतर मी केलं नाही. टीव्ही/सिनेमा फार केला नाही. काही टीव्ही मालिका केल्या, पण त्यांचे फक्त २६/५२ भाग केलेत..

अखंड कारकीर्द घडत असताना, शंभर नाटकं दिग्दर्शित करण्याचा विक्रम करण्याच्या प्रवासात काही खंत आहे, काही उणीव राहिली का?

– खंत म्हणाल तर –मी फॉर्मल ट्रेनिंग घेतलं नाही. हल्ली ह्या व्यवसायात येण्यासाठी, स्थिरावण्यासाठी काही फॉर्मल ट्रेनिंग घेऊन येतात. मी ट्रेनिंग घेतलं असतं, तर अधिक गुणवत्तापूर्ण काम मी केलं असतं. खंत माझी – माझ्या शंभर नाटकांमध्ये एकही नाटक ‘घाशीराम कोतवाल’ ह्या नाटकाच्या तोडीचं नाही. शंभर नाटकं केलीत, त्यात शंभर हा फक्त एक आकडा आहे, मला भावेल असं माझं एकही नाटक नाही. ‘घाशीराम’सारखं एखादं नाटक हातून व्हावं अशी प्रकर्षानं इच्छा आहे. एखादी कालातीत कलाकृती हातून घडावी ह्या दिशेनं प्रयत्न करतो. मी ऐतिहासिक नाटक, बालनाट्य अजून केलं नाही. सध्या डॉक्टर गिरीश ओक नाटक लिहीत आहेत ह्याच समाधान वाटतं.

तुमचं बालपण कसं गेलं?

– संस्कृती, आचारविचार, संस्कार ह्यातून माणूस घडतो. खरं म्हणजे आपल्याला घडवतात ती आपल्या सहवासातील माणसं.. उच्च सांस्कृतिक मूल्यं असलेल्या अनेकांचा गोतावळा माझ्याभोवती होता, म्हणून मी श्रीमंत होतो! आई, बाबा, आत्या, मावश्या अशा अनेक आप्तांचा राबता आमच्या घरी असायचा. साहित्य-वाचन-मराठी नाटक अशा सगळ्यांवर बौद्धिक चर्चा होत असे. शाश्वत मूल्यं कोणती, आपला सांस्कृतिक ठेवा कुठला, तो कसा असावा हे बाळकडू मिळत गेलं, त्याचं आकलन ह्या सगळ्यांच्या साधकबाधक चर्चांमधून होत गेलं. शिवाय आम्ही राहत होतो बांद्र्याच्या कलानगरमध्ये. कलानगरमध्ये सगळाच कलासंपन्न शेजार होता. इथे अनेक गुणीजनांचा जवळून संबंध आला. मुख्य म्हणजे बाळासाहेब ठाकरेंसारखं अतुलनीय, बहुश्रुत व्यक्तिमत्त्व आमचा शेजार होता. दर मंगळवार, बुधवार बाळासाहेबांच्या घरी जाणंयेणं असे. बाळासाहेबांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचं व्यंगचित्र चितारलं तेव्हा त्या व्यंगचित्रातील इंदिराजी यांचं नाक खूप

गाजलं. तर इंदिराजी यांचं नाक बाळासाहेबांनी आमच्यासमोरच कुंचल्यानं काढलं. त्या अद्भुत क्षणाचा मी साक्षीदार होतो. अनेक साहित्यिकांचा सहवास मला ‘साहित्य सहवास’मध्ये लाभला. अरुण नाईक, राजीव नाईक यांच्या घरी तर संपूर्ण मजलाभर लायब्ररी होती. पुस्तकांचं हे वैभव पाहून आमचे डोळे दिपले! पंडित मल्लिकार्जुन मन्सूर यांची पहिली मैफल ऐकल्याचं मला आठवतं. पु.ल.देशपांडे यांना याची देही याची डोळा पाहिल्याचं -भेटल्याचं स्मरतंय. श्रुती सडोलीकर-काटकर यांचे गायन ऐकलं. विजया मेहता, श्रीराम लागू, दिलीप प्रभावळकर, प्रशांत दामले, वंदना गुप्ते ह्या सगळ्याच नाट्यवेड्या महारथींचा सहवास मला लाभला. ह्या सगळ्यांनी माझ्याकडे नाटक करायला होकार देणे ही फार मोठी बाब होती माझ्यासाठी.. ह्या सगळ्यांनी माझ्याकडे नाटक केलं, माझा मान वाढवला.. ह्यांची ऊर्जा मला लाभली.

तुम्ही परदेशात जाऊनही फक्त नाटकं पाहिलीत हे खरं का?

– हो! अगदी खरंय हे. आपल्यापैकी प्रत्येकाला पर्यटन करायला आवडतं. देशांतर्गत आणि देशाबाहेर पर्यटन करूनदेखील आपण घडत असतो. पर्यटनातील अनुभव समृद्ध करतात. माझं देशाबाहेर पर्यटन झालं ते तेथील ‘ब्रॉडवे’ नाटकांचा अनुभव घेण्यासाठी होतं. ब्रॉडवे, वेस्ट एन्डला अनेक इंग्रजी नाटकं पाहिली, त्यांचा आनंद घेतला. माझ्या ह्या आत्मिक आनंदाच्या अनुभवांवर आधारित पुस्तक अक्षर प्रकाशननं काढलं. तेथील नाटकांच्या अनुभवांमुळे माझा नाटकविषयक अनुभव अधिक समृद्ध झाला, जाणिवा अधिक विस्तारल्या. मराठीखेरीज हिंदी, इंग्रजी, गुजराती, कोकणी अशा विविध भाषांमधून नाटकं करायला मिळाली. माझ्या ह्या नाटकांच्या पिचवर टिकून राहिलो मी ते ह्या सगळ्या थोरामोठ्यांच्या आशीर्वादामुळे. सुधीर भट नेहमीच त्यांचं नाटक घेऊन परदेशात प्रयोग करत. तब्बल वीस वर्षं ते त्यांची चार नाटकं परदेशात घेऊन जात. नफा-तोट्याचा विचार न करता हे धाडस ते करत. त्या काळात मराठी नाटकं पाहण्यासाठी तिथला प्रेक्षक भुकेला असे. पुढे थोडी ह्या लोकप्रियतेत घट आली. भारतातील प्रेक्षकवर्ग तिथे आणि तिथला प्रेक्षक इथे येणं हे कॉमन झालं.

नाट्यक्षेत्रातील तुमचा अनुभव प्रदीर्घ. कधी आत्मचरित्र लिहावंसं वाटलं नाही का?

– आत्मचरित्र लिहिण्यापेक्षा मला माझ्या क्षेत्रातील अनुभव लिहावेसे वाटलेत. अन्य क्षेत्रांप्रमाणं ह्या क्षेत्रातदेखील मोठ्या प्रमाणावर सातत्यानं बदल घडत आहेत. मी आत्माराम भेंडे, विजयाबाई मेहता, सत्यदेव दुबे, मोहन तोंडवळकर, दाजी भाटवडेकर अशा अनेक प्रभृतींवर दिवाळी अंकांमधून लिहिलंय. ह्या लेखकांचं संकलन ‘थिएट्रिकली युअर्स’ ह्या शीर्षकानं प्रसिद्ध करतोय. नव्या-जुन्या पिढीत मला चंदू कुलकर्णी, देवेंद्र पेम, अभिराम भडकमकर, केदार शिंदे, वामन केंद्रे, प्रदीप दळवी अशा अनेकांच्या नाट्यकृतींनी भुरळ घातली आहे.

नव्या दमाच्या स्त्री नाटककार वाढत आहेत ही समाधानाची बाब मला वाटतेय.

कलाकार म्हणूनही तुमची कारकीर्द लक्षवेधी ठरतेय.

मी अभिनय करणं अपघातानं झालं. ज्या वेळेस जो कलाकार अनुपस्थित असेल त्याची रिप्लेसमेंट म्हणजे माझा अभिनय. जाणीवपूर्वक अभिनय-अभिनेता नाही मी. हल्लीच ‘मोनिका ओ माय डार्लिंग’ ह्या वेब शोमध्ये मी होतो. हवाहवाई, गोळाबेरीज, व्यक्ती की वल्ली, तू फक्त लढ म्हण अशा काही नाटकं-सिनेमे आणि ओटीटीवर मी काम केलं.. अगदी सहजच घडलं हे.

नाटकानं माझ्या वैयक्तिक जीवनात-कारकिर्दीत सुखासमाधानाचे गहिरे रंग भरलेत. मंगल केंकरे माझी पत्नी माझ्या नाटकातील कलावंतांची वेशभूषा खूप कलात्मकतेनं करते. कारकीर्द आणि माझं व्यक्तिगत आयुष्य एकमेकांना पूरक ठरलं आहे. म्हणून मी कृतार्थ आहे!

**– पूजा सामंत**

samant.pooja@gmail.com



**‘यू मस्ट डाय’ या नाटकातील कलावंत**

# विज्ञानसाहित्यात लेखिकांचे योगदान




संजीवनी खेर

**वास्तविक** विज्ञान हे असे क्षेत्र आहे जिथे स्त्री-पुरुष भेद नसावा. तिथं फक्त गुण आणि संशोधन हेच महत्त्वाचे निकळीचे मुद्दे असावेत. पण पुरुषप्रधान जगाला हेही मान्य नसावे. कारण विज्ञान काल्पनिका असोत की त्या आधारित भविष्यवेधी लेखन असो. ते पुरुषांनी पुरुषांसाठीच लिहिलेले असते असा ठाम समज अगदी १९व्या शतकाच्या पहिल्या दशकापावेतो होता. त्यामुळे त्या काळात ज्या साहित्यिकेच्या ऊर्मी तिला स्वस्थ बसू देत नव्हत्या तिलाही टोपणनावाने लिहिणे भाग होते. त्याखेरीज ते लिखाण वाचक स्वीकृत करणार नाहीत ही भीती होती. ती खरीही होती. पण ह्या दडपणाला न जुमानता अनेक लेखिका लिहीत होत्या. नाव, कीर्ती, पैसा कमावत होत्या. त्यांच्या लेखनावर टीव्हीमालिका, चित्रपट येत होते. अगदी आठवलेली नावं म्हणजे जे. के. रोलिंग, मेरी शेली, मार्गारिट अटवूड, रेचल कारसन, जोना रुस, बेगम रुकय्या, मंजुळा पद्मनाभन इत्यादी. ह्यातील भारतीय नावे वाचून आपल्याला (मलाही) आश्चर्य वाटते. कारण ह्या नावाकडे आपण फारसे लक्ष देत नाही. ती आपल्या वाचनयादीत नसतात. त्यांचे मराठी अनुवाद झालेत की नाही हेही ठाऊक नाहीय. रोलिंगच्या काही कादंबऱ्या मराठीत आहेत. त्याबद्दल 'ग्लोकल लेखिका' एपिसोडमध्ये मी लिहिले आहे. पण हे करताना तिच्या काल्पनिका ह्या रंजनापलीकडे किती महत्त्वाच्या आहेत ह्याकडे फारसे पाहिले नव्हते. आज महिलांनी लिहिलेल्या विज्ञानकथा, कादबऱ्यांचा वेध घेताना ते अधिक तीव्रतेने जाणवू लागले.

मुळात स्त्रीला विज्ञान कळते, त्याविषयी ती काही व्यक्त होऊ शकते हेच लोकांना समजत नव्हते. मानवत नव्हते. विज्ञानजगातील साहित्यात जे अपसमज आहेत त्यापैकी हा एक आहेच. त्यातून रुकय्या बेगमसारख्या मुस्लीम स्त्रीने विज्ञानकथा लिहिल्या असतील ह्यावर आपलाही विश्वास बसत नाही. ह्या स्त्रीने आपल्या सामाजिक स्थितीचा फायदा करून घेत मुस्लीम मुलींसाठी अनेक शाळा काढल्या, स्वत:च्या उदाहरणाने मुस्लीम स्त्रीबद्दलचे नरेटिव्ह बदलले. बदललो नाहीत ते आपण. तिच्याबद्दल, तिच्या लिखाणाबद्दल परत कधी पाहू. आज दोन लेखिकांविषयी, त्यांच्या लेखनाविषयी जाणून घेऊ. आपल्याकडे हा सायन्स फिक्शन आणि फँटसी जॉनर गाजलेला वाचला गेलेला नाही. विज्ञानावर आधारित कथाकाल्पनिका जयंत नारळीकर आणि इतरांनी थोड्याफार लिहिल्या आहेत. ह्या लेखन यादीत मराठी स्त्रीचे नाव मला आढळले नाही. ते असो. १९व्या शतकापासून स्त्रिया विज्ञानकथा लिहीत आहेत. इंग्रजीत ह्या प्रकारच्या लेखनाला ह्युगो पुरस्कार, आर्थर सी क्लार्क आणि नेब्युला ॲवॉर्ड दिले जातात.

ह्या विभागात लिहिणाऱ्या लेखिका फक्त रंजन हे उद्दिष्ट ठेवून लिहीत नाहीत तर त्यात स्त्रीवाद, समलिंगी आकर्षणाचा भागही आणतात. रहस्य, गूढ, विज्ञानकथेचा गाभा आहे. प्रचलित विज्ञान, त्यात होऊ शकणारे बदल, त्यांचा फायदा घेऊन होणारे गुन्हे नि विज्ञानाचा वापर करून केलेली उकल हे केंद्रस्थानी असतात. परग्रहावरील माणूस, त्याचे इथे येणे, उत्पात वा मदत करणे, हवामानातील वा पृथ्वीवरील अचानक बदल, माणसाचा उपभोगाचा हव्यास ह्यांचाही उपयोग कथनात होत असतो. विज्ञानलेखिका आणि त्यांचे साहित्य यांचा धावता आढावा घेतला तरी आपल्याला वेगळेपणा नक्कीच दिसतो. आज मी दोन पुस्तकांबद्दल लिहीत आहे. एक आहे 'स्टार मॅन्स सन २२५०' हे आंद्रे नॉरटन ऊर्फ ॲलीस नॉरटन हिने लिहिलेले. दुसऱ्या महायुद्धानंतर हिरोशिमा नागासाकीवरील भीषण अणुबॉम्ब-हल्ल्यानंतर झालेला विध्वंस पाहून सारे जग हादरले होते. त्याच भावनेचा परिपाक ह्या कादंबरीत झाला आहे. तिनेही टोपणनावाने लेखन केले हे स्पष्ट आहे. अशाच एका सर्वनाशी स्फोटात नाहीसे झालेली शहरे आणि त्यातून वाचलेले काही जमातीचे लोक. त्यातील एक तरुण- फोर्स हा धाडसाने आपल्या पूर्वजांचा शोध घ्यायला बाहेर पडतो. त्याच्या ह्या धडपडीची ही कहाणी








मूळ घटनेनंतर जवळजवळ तीनशे वर्षांनंतरच्या घटनेच्या वेदना मुखर करते.

दुसरे पुस्तक आहे, 'सायलेंट स्प्रिंग'. जगभर गाजलेले. समाजाचे आणि राज्यकर्त्यांचे, अर्थकारणी यांचे डोळे उघडायला लावणारे पुस्तक. वास्तव हे कल्पनेहून किती भेदक असते ह्याचे चित्र उभे करणारे हे लेखन; रेचल कार्लसनचे वैयक्तिक अनुभव त्यात आहेत. तिने जे केमिकल पेस्टीसाइडच्या भयावह परिणामाला आव्हान दिले नि जो लढा उभारला त्याबाबतचे हे थरारक पुस्तक आहे. ज्यावर सिनेमाही आला होता. ज्यातील भूमिकेचे पारितोषिक नायिकेला मिळाले होते. १९६२ सालची ही घटना, ज्यामुळे एक जागतिक पातळीवरील चळवळ उभी राहिली होती. रेचल मरीन बायोलॉजिस्ट होती. ह्या अगोदर तिने समुद्र आणि पर्यावरण ह्यावर पुस्तके लिहिली होती. मरणोत्तर तिला प्रेसिडेंशिअल मेडल ऑफ फ्रीडम मिळाले होते. अखेर पर्यावरणरक्षण म्हणून अंदाधुंद फवारणीवर बंदी आणली गेली. पण केमिकल कपन्यांनी तिला खूप त्रास दिला. नाना तऱ्हेचे आरोप तिच्यावर केले. स्त्री म्हणून वैयक्तिक आरोप, चारित्र्यहननदेखील होतेच. कुणीकडून तरी तिने हा हल्ला, हा लढा मागे घ्यावा वा बंद करावा.

इतके टोकाचे पाऊल उचलावे असे कंपनीला का वाटत होते? असे काय होते तिचे म्हणणे? कंपन्या जे कीटकनाशक शेतकऱ्यांना, बागायतदारांना विकत होत्या त्यामुळे कीटकांबरोबरच इतरही सूक्ष्म जीव मरत होते. जे जमीन, वातावरण आणि मनुष्यप्राण्यांची अनेक मार्गांनी मदत करत असतात. साहजिकच त्यामुळे फायद्या ऐवजी नुकसानच अधिक होत होते. अमेरिकेतील शेतकरीही पिकाच्या संरक्षणासाठी भरमसाट रसायनाचे आणि डीडीटीचे- जे त्या आधीही वापरले जात होते- अधिक मात्रेत फवारे मारत. त्याचा परिणाम पिकातून केमिकल पोटात जाऊन माणसांनाही त्रास होण्याची शक्यता वाढू लागली. दोन महायुद्धांत शत्रूला नामोहरम करण्यासाठी अनेक रायानिक द्रव्यांचा वापर होत होता. आता लक्षात आले की ह्याच द्रव्यांचा वापर पिकांवरील किडे, बुरशी वा तत्सम कीटकांचा नाश करून अन्नधान्य वाढवता येईल, पण वास्तवात ह्या केमिकल्समुळे संपूर्ण नैसर्गिक इकोसिस्टिम धोक्यात येऊ लागली होती. इतर खगचर, जलचर यांनाही धोका निर्माण झाला होता. कारण हे रसायन पाण्यात मिसळले जाऊन सहजपणे मासे आणि अन्य जीवांना त्रासदायक ठरू लागले होते. म्हणूनच लेखिकेने पुस्तकाला नाव दिलेय 'सायलेंट स्प्रिंग'. पक्ष्यांचे कूजन कानी पडत नाही असा मूक वसंत. एकप्रकारचा भकास काळ. निसर्गाचा गळा आवळला जात असल्याचे हे लक्षण होते. सरळपणे त्याचा संबंध रासायनिक फवारणीकडे लागत होता. ही वस्तुस्थिती कंपनीवाले मान्य करायला तयार नव्हते. त्यांना हे सगळे त्यांच्याविरुद्ध असलेले कारस्थान वाटत होते. तिने अनेक पुरावे दिले, पण ते सारे कंपनीच्या लोकांनी ठोकरून लावले. तिला खोटे ठरवले. तिच्या चारित्र्यवर चिखलफेक सुरू केली. ती देखणी, तरुण असून लग्न का करत नाही? नक्कीच काहीतरी काळेबेरे आहे. ह्याचाही शोध आरंभला. पण अखेर तिने नाइलाजाने सांगितले की हो काळंबेरं आहे, 'माझ्याकडे थोडेच दिवस राहिले आहेत. कॅन्सरने मला ग्रासले आहे'. विरोधकांची तोंडे काळी पडली. अमेरिकन सरकारने तिच्या कामाची योग्य ती दखल घेतली. ह्या साऱ्या पर्यावरणाची आणि पर्यायाने मानवाचीही हानी करणाऱ्या कंपनीच्या कारवायांवर चाप बसवला. पर्यावरणस्नेही कायदे केले.

निसर्ग हा जणू फक्त माणसासाठी निर्माण झालेला आहे नि तो त्याला बेधुंदपणे ओरबाडत आहे. कुठल्याही किमतीवर आपला विकास करायचा अशा माणसाच्या न तृप्त होणाऱ्या लालसेची किंमत सर्व प्राणिमात्रांना द्यावी लागत आहे. हे थांबले पाहिजे. खरेतर ह्या रसायनांनी धान्याचा फडशा पाडणाऱ्या कीटकाचा समूळ नाश होत नाही. आरंभी तसे वाटते, पण कीटक त्यावर मात करतात नि त्यांच्या पुढच्या पिढ्या रसायनांना जुमानत नाहीत. अधिक जोमाने कीड वाढू लागते. अनेक






प्रकारचे आजार त्यामुळे पसरू लागतात. या पुस्तकाचीच सत्यकथा ३० जून १९६२ रोजी लोकांसमोर आली आणि जणू कथा कादंबरी असावी अशी वाचली जाऊ लागली. म्हटले तर सत्यकथा, पण ज्या प्रकारे समाजात त्यावर उद्रेक होऊ लागला, कंपन्या आणि लेखिका यांची; आपापले सत्य वाचकांसमोर मांडायची तळमळ रहस्यकथेचे आणि थरारपटाचे रूप घेऊ लागली. आर्थिक व्यवहारातील संस्थापनांना ह्या स्त्रीला संपवणे अवघड नव्हते. पाहता पाहता ह्याला द्वंद्वयुद्धाचे रूप येत गेले. एका परीने तिचा विजया झाला पण मृत्यूने तिला गाठले. एक वादळ शांत झाले. माणसाला खूप मोठा धडा शिकवून गेले.

आणखी एका विज्ञानकाल्पनिकेचा उल्लेख मी ह्या लेखाच्या सुरुवातीला केला आहे. 'स्टार मॅन्स सन २२५०' हिचा. ही कादंबरी 'डे ब्रेक २२५०' ह्या नावाने अनेक वर्षांपूर्वी प्रकाशित झाली होती. लेखिकेने विध्वंसातून प्रेरणा घेऊन हे लेखन केलेय. अणुस्फोटानंतर पर्वतीय भागात राहणारे आणि सपाटीवर राहणारे लोक यांच्यात एक सुप्त अढी वाढत असते. आपण नक्की कोण आहोत? आपला पूर्वेतिहास काय आहे. ह्याचे कुतूहल तरुणांना स्वस्थ बसू देता नसतं. त्याची आई भिन्नवंशीय आहे, आदिम जमातीतील आहे, तो फोर्स प्युमा जमातीतील आहे, तो रात्रीच्या अंधारात पाहू शकतो, त्याला वातावरणातील सूक्ष्म आवाज सहज ऐकू येतात. त्याला ल्यारा ह्या अशाच मिश्र वंशीय मांजराची भाषा समजते. त्या दोघांची घट्ट मैत्री असते. त्याला त्याच्या वडिलांसारखे 'स्टार मॅन' व्हायचे आहे. सारा आसमंत विध्वंसाच्या खुणा वागवत आहे. काही ढिगाऱ्याजवळ जायला तर कुणी फिरकतही नसते. त्यातून रेडिओ ॲक्टिव्ह किरणांचा धोका असतो. त्याच्या जमातीतील लोकही त्याला स्वीकारत नाहीत. कारण तो वेगळाच दिसत असतो. स्टार सन व्हायचे त्याचे स्वप्न भंगते. कारण त्याच्या जमातीतील लोकच त्याला ती संमती देत नाहीत. मग तो एकटाच आपले पूर्वज काय करत होते, कुठे राहता होते, हे शोधायला बाहेर पडतो. ते विविध ग्रहांवर जाण्याचा विचार करत होते आणि त्याचे वडील त्याच प्रयत्नात मरण पावले होते.

ह्या एकाकी शोधयात्रेत अनेक भिन्न वंशांच्या, खासकरून कृष्णवर्णीय लोकांच्या संपर्कात फोर्स येतो. त्यातील जर्ल नावाचा तरुण त्याचा मित्र होतो. रेडिएशन पचवलेले, टेलिपथीचे सामर्थ्य असलेले हे लोक जुन्या जगाची माहिती करून घ्यायला उत्सुक असतात. त्यातूनच त्यांना जाणवते की आता आपण सारे एकत्र आल्याखेरीज नवे जग वसणार नाही. जी चूक आपल्या पूर्वजांनी केली ती आपण करता कामा नये. किरणउत्सर्ग आपण इतक्या वर्षांत पचवला आहे, पण त्याचा परिणाम होऊन आपण असे वेगळेच दिसू लागलो आहोत. त्यांचा मित्र जर्ल समजावतो, की आपले पूर्वज अंतराळात जाण्याचा राहण्याचा प्रयत्न करत होते. त्याचे पुरावेही तो रेडिएशनच्या ध्वस्त वस्तूवरून दाखवून देतो. लारासारख्या मोठ्या मांजरी आणि अन्य प्राणी हे सारे त्या काळातील विचित्र वायुप्रदूषणातून निर्माण झाले. आणि त्या दरम्यान विभिन्न जमातीत आणि विचित्र जनावरात तीव्र तणाव निर्माण होतो. ह्यातून पुन्हा विनाशाकडे जाणार आहोत ह्याची जाणीव तेथे असलेल्या एका स्त्रीला होऊ लागते ती सर्वांना सामंजस्याने तडजोड करत एकत्र राहणे हाच एकमेव उपाय असल्याचे समजावते. कादंबरीत लहानमोठे लढे आहेत. रक्तपात आहे. आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा मानवी स्वभाव इतक्या मोठ्या प्रलयंकारी आघातानंतरही कायम आहे.हीच माणसांची नियती आहे? अखेर माणसाला 'एक जग एक माणूस' हाच मंत्र तारणारा आहे याची जाणीव होते. हे या लेखनाचे सार आहे. सायन्स फिक्शन हे राजकीय नसते असे म्हणता येत नाही अखेर माणसाचे अस्तित्वच पणाला लागते तेव्हा ते राजकारणाशी येतेच. लेखिका हेच सांगू पाहत आहे.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com

# ‘त्या’ दोघी



**अपर्णा पाटील**

**जगभरातील** नेते आपलं पद टिकावं म्हणून कायद्याच्या दुरुस्त्या, एकाधिकारशाही, यंत्रणांना हातातलं बाहुलं बनवत आहेत. त्याचवेळी दोन महिला मात्र पंतप्रधानपदाचा सहजपणे राजीनामा देतात, ही बाब दखल घेण्याजोगी ठरते. काळाच्या कसोट्यांवर त्यांचं यश-अपयश मोजलं जाणारच आहे, तरी गलिच्छ राजकारणाच्या काळात त्यांचं स्वत:हून पद सोडून देणं, हे मात्र विचार करायला लावणारं आहे.

**जेसिंडा अर्डर्न**

जागतिक राजकारणात भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी, ब्रिटनच्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर आणि जर्मनीच्या चान्सलर एंजेला मर्केल या अत्यंत कठोर मात्र संवेदनशील राजकारणी म्हणून ओळखल्या जातात. याच यादीत आणखी एक नाव अगदी अलीकडेच जोडलं गेलं ते न्यूझीलंडच्या पंतप्रधान जेसिंडा अर्डर्न यांचं. वयाच्या ३७ व्या वर्षी, २०१७मध्ये जेसिंडा या न्यूझीलंडच्या सर्वात तरुण पंतप्रधान झाल्या. अलीकडेच त्या पदाचा त्यांनी राजीनामा दिला आहे.

न्यूझीलंडमधल्या राजकीय नेत्यांशी नातं असलेल्या कुटुंबात जेसिंडा यांचा जन्म झाला. त्यामुळे त्यांचा राजकीय प्रवास सोपा झाला असला तरी पंतप्रधानपदाचा काळ आव्हानात्मक ठरला. कोरोनासंसर्गाचा उद्रेक, दहशतवादी हल्ला आणि स्थलांतरितांचे नाजूक प्रश्न या सगळ्या पार्श्वभूमीवर जेसिंडा यांच्या पंतप्रधानपदाची कसोटी लागली. या काळात त्या सक्षम, संवेदनशील आणि निर्णयक्षम पंतप्रधान ठरल्या.

राजकारणात येणं आणि यशस्वी होणं, याचं बाळकडू त्यांना घरातूनच मिळालं होतं. २६ जुलै, १९८० रोजी हॅमिल्टनमध्ये जेसिंडा यांचा जन्म झाला. त्यांचे वडील पोलिस अधिकारी, तर आई एका शाळेत व्यवस्थापक म्हणून काम करत होती. शाळेत असतानाच ‘फिश अँड चिप्स’ या ब्रिटनमध्ये लोकप्रिय असलेल्या स्थानीय फूड जाँइटमध्ये त्यांनी पहिली नोकरी केली. मॉरिन्सव्हिल कॉलेजमध्ये त्यांनी शिक्षण घेतलं. त्यांचे अनेक नातेवाईक राजकारणात आहेत. त्यांच्या नातेवाईक असलेल्या मेरी अर्डर्न या लेबर पक्षाच्या दीर्घकाळ सदस्या होत्या. सार्वत्रिक निवडणुकीत न्यू प्लायमाऊथचे खासदार हॅरी ड्युनहोवन यांच्या प्रचारात मेरी यांना मदत करण्यासाठी जेसिंडा यांनीही पक्षाचं सदस्यत्व स्वीकारलं. अशातऱ्हेने त्यांचा न्यूझीलंडच्या राजकारणात प्रवेश झाला. वायकातो विश्वविद्यालयात त्यांनी ‘राजकारण आणि जनसंपर्क’ या विषयांमध्ये पदवीपर्यंतचं शिक्षण घेतलं. तिथे त्या विद्यार्थिप्रतिनिधी म्हणूनही वावरत होत्या. त्यानंतर पंतप्रधान हेलेन क्लार्क यांच्या कार्यालयात साहाय्यक म्हणून काम करायला सुरुवात केली.

ब्रिटनचे पंतप्रधान टोनी ब्लेअर यांच्या कार्यालयात नीती सल्लागार म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली. इंटरनॅशनल युनियन ऑफ सोशालिस्ट युथच्या अध्यक्षपदाची धुराही त्यांनी सांभाळली. देशातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास करत एक अभ्यासू नेता म्हणून ओळख मिळवत त्यांची पक्षातील वाटचाल सुरू झाली. हाच अनुभव त्यांना पंतप्रधानपदाकडे घेऊन गेला. १ ऑगस्ट २०१७ या दिवशी पार पडलेल्या निवडणुकीच्या आधी त्यांच्या कारकिर्दीत महत्त्वाचं पद त्यांच्याकडे आलं. मजूर पक्षाच्या त्या नेत्या झाल्या होत्याच, पण विरोधी पक्षनेतेपद त्यांच्याकडे चालून आलं. मजूर पक्षाच्या त्या सगळ्यात तरुण नेत्या ठरल्या. पक्षवाढीसाठी त्यांचं नेतृत्व फायदेशीर ठरलं. त्यांच्यामुळेच २०२०मध्ये त्यांच्या पक्षाची सत्ता स्थापन झाली.

कोरोनासारख्या जागतिक संकटात जेसिंडा यांनी परिस्थिती मोठी संयमाने आणि प्रभावीपणे हाताळली. त्यामुळेच त्यांच्या नेतृत्त्वाखाली न्यूझीलंडमध्ये या संसर्गामध्ये कमीत कमी नुकसान झाले. जेसिंडा यांनी कोरोनाकाळात जनतेवर निर्बंध लादले नाहीत. तर ते निर्बंध जाहीर करताना स्वत:ही काटकोरपणे पाळले. अगदी स्वत:चं लग्नही दोन वर्षं पुढं ढकललं. कोरोनाकाळ त्यांना इतरही



**जेसिंडा अर्डर्न**

स्त्री म्हणून त्यांचं उदाहरण जगभरातल्या स्त्रियांना प्रेरणादायी ठरलं.

संयुक्त राष्ट्रसंघात आई म्हणून त्यांची प्रतिमा जितकी गाजली तितकीच त्यांची भूमिकाही राजकारणात वेधक ठरली. पुरोगामी राजकारणाच्या अग्रणी नेत्या म्हणून त्यांचा उदय झाल्याचं प्रसारमाध्यमांनी म्हटलं. त्याच्या राजकीय धोरणांचं स्वागत करताना 'विखारी ट्रम्पवादा'वरील उपाय असं म्हटलं गेलं. त्याचवेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या आक्रमक राजकारणावरील संयमित उत्तर म्हणून त्यांच्याकडे पाहिलं गेलं. संयुक्त राष्ट्रसंघातील त्यांची उपस्थिती आणि भूमिका यामुळे त्या सेलिब्रिटी बनल्या.

जेसिंडा स्वत:ला लोकशाहीवादी, पुरोगामी आणि स्त्रीवादी म्हणवून घेतात. त्यांनी न्यूझीलंडमधील मुलांना भोगावी लागत असलेली गरिबी आणि बेघरांचं प्रमाण पाहून हे भांडवलशाहीचं 'उघड अपयश' असल्याचं म्हटलं. त्यांच्या या भूमिका न्यूझीलंडमधल्या डाव्या विचारसरणीच्या राजकीय मंडळींच्या पचनी पडणाऱ्या नव्हत्याच. समाजवादी असल्या तरी त्यांची मतं ही नवउदारमतवादी प्रकारात मोडणारी आहेत. अण्वस्त्रमुक्त धोरण, हवामान बदलाबाबत त्या अधिक सजग आहेत.

अनेक आव्हानांचा सामना करावा लागला.

१५ मार्च २०१९ रोजी मशिदींवरील गोळीबाराच्या घटनेनं एरवी कमालीचं शांत असलेलं न्यूझीलंड हादरलं. हा 'दहशतवादी हल्ला' असं म्हणत त्या मुस्लीम समुदायाच्या बाजूनं उभ्या राहिल्या. ख्राइस्टचर्चमधील मुस्लिमांच्या भेटीला जाताना हिजाबसह गेलेल्या पंतप्रधान जेसिंडा यांच्या त्या प्रसंगीच्या छायाचित्राचं वर्णन जागतिक स्तरावर 'ॲन इमेज ऑफ होप' असं करण्यात आलं. त्याचवेळी देशातील शस्त्रकायदे अत्यंत कमकुवत असल्याचं सांगितलं. परंतु असे निव्वळ सांगून त्या थांबल्या नाहीत तर महिन्याभरात शस्त्रकायद्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव संसदेत मंजूरही करून घेतला. जगभरात त्यांच्या या निर्णयाची चर्चा झाली.

राजकीय आव्हानांबरोबरच त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात महत्त्वाच्या घटना घडल्या. त्या २०२२मध्ये लग्न करणार होत्या, पण आधी कोरोना मग सार्स अशा भयंकर संसर्गाच्या उद्रेकांमुळे हे लग्न पुढे ढकललं गेलं. पुढे १९ जानेवारी २०१८ रोजी जेसिंडा यांनी, जूनमध्ये आपल्या पहिल्या बाळाला जन्म देणार असल्याचं जाहीर केलं. पंतप्रधान असलेल्या जेसिंडा संयुक्त राष्ट्रसभेत आपल्या लहानग्या मुलीसह उपस्थित राहिल्या होत्या. त्यांच्या त्या कृतीचं जगभरात कौतुक झालं. एकविसाव्या शतकातील

कोरोनाचे निर्बंध शिथिल झाले, सगळं पूर्वपदावर येत असतानाच राजकारणातल्या उलथापालथी मात्र वाढल्या. जेसिंडा यांनी समलिंगी विवाहाला उघडपणे पाठिंबा दिला. आपली ही भूमिका केवळ समर्थनापुरती नाही हे दाखवून देण्यासाठी त्यांनी विवाह सुधारणा अधिनियम २०१३च्या बाजूनं मतदान केलं. ज्यामुळे समलिंगी जोडप्यांच्या विवाहाला कायदेशीर मान्यता मिळाली आहे. २०१८मध्ये समलिंगींच्या अधिकाराबाबत जनाजागृती करणाऱ्या 'प्राइड परेड'मध्ये सहभागी होणाऱ्या त्या न्यूझीलंडच्या पहिल्या पंतप्रधान ठरल्या. जेसिंडा यांनी गुन्हे गर्भपात कायद्याच्या संदर्भात सुधारणा करण्याचं महत्त्वाचं कामही केलं.

त्यांनी स्थलांतरितांच्या बाबत सकारात्मक भूमिका घेतली. परराष्ट्र व्यवहारात इस्रायल-पॅलेस्टाइनसंघर्ष सोडवण्यासाठी दोन राष्ट्रांच्या तोडग्याला पाठिंबा दर्शवला. गाझा सीमेवरील निदर्शनांदरम्यान पॅलेस्टिनींच्या हत्येचा त्यांनी निषेध केला. त्यांच्या या कृतीची जगभरात दखल घेतली गेली. पंतप्रधान म्हणून वावरताना त्यांनी अनेक देशांबरोबर सौहार्दाची भूमिका ठेवली. कंबोडिया, युक्रेन या देशांबाबत त्यांनी घेतलेल्या भूमिका त्यांच्यामध्ये बलाढ्य नेत्यांसमोर नमते घेण्याची नाही, हे दाखवून

देणाऱ्या होत्या. पंतप्रधान म्हणून वावरताना त्यांनी अनेक देशांबरोबर सौहार्दाची भूमिका ठेवली. प्रसंगी रोकठोक भूमिकाही घेतल्या. कंबोडिया, युक्रेन या देशांबाबत त्यांचं धोरण बलाढ्य नेत्यांसमोर नमतं घेण्याचं नाही, हे त्यांनी दाखवून दिलं होतं.

नोव्हेंबर २०२२मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या 'मेक इट १६ इन्कॉर्पोरेटेड विरुद्ध ॲटर्नी जनरल' या ऐतिहासिक निकालानंतर जेसिंडा यांनी मतदानाचं वय १६ वर्षांपर्यंत कमी करण्याचं समर्थन केलं. त्यांनी मतदानाचं वय १६ वर्षांपर्यंत कमी करणारा कायदा केंद्र सरकार आणणार असल्याचं तत्काळ जाहीरही केलं. करोनाकाळात प्रचंड लोकप्रिय झालेल्या जेसिंडा यांना नंतर मात्र राजकीय विरोधकांना तोंड द्यावं लागलं. देशांतर्गत विरोध वाढण्याची कारणं वेगवेगळी आहेत.

न्यूझीलंडच्या राजकारणात सगळ्यात वादग्रस्त ठरला तो विषय म्हणजे माओरी मतदारांच्या भवितव्याच्या. माओरी या न्यूझीलंडमध्ये मूळ अधिवास असलेल्या जमातीला राजकीय प्रतिनिधित्व मिळण्याबाबतचा निर्णय सर्वस्वी त्यांच्याच हातात सोपवला पाहिजे, शाळांमध्ये माओरी भाषेची सक्ती झाली पाहिजे, अशा प्रकारची मतं जेसिंडा यांच्याविषयीचा विरोध वाढण्याचं एक कारण ठरलं, असं म्हणता येईल. कोरोनाकाळात न्यूझीलंडची अर्थव्यवस्था कमकुवत झाली ती बळकट करण्यासाठी जेसिंडा यांचे निर्णय सपशेल अपयशी ठरले, परिणामी देशापुढील आव्हानं स्वीकारणं त्यांना शक्य न झाल्यानं त्यांच्या नेतृत्वाविरोधात देशांतर्गत मतप्रवाह वाढू लागला.

कोरोनाकाळात प्रचंड लोकप्रिय झालेल्या जेसिंडा यांच्या प्रत्येक हालचालीवर टीका होऊ लागली. अगदी त्यांचं मैत्रिणींसोबत पार्टी करणं हेही लोकांना रुचलं नाही. राजकीय नेत्यांच्या खासगी आयुष्यावर आणि त्यांच्या राजकीय भूमिकांवर टीका होणं काही नवीन नाही. पण अशावेळी थेट आपल्या पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन जेसिंडा यांनी मोठा धक्का दिला. ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीत आपला पराभव समोर दिसत असल्यानेच त्यांनी राजीनामा दिला असं बोललं गेलं. त्याचवेळी त्यांनी राजीनामा देत असतानाचं व्यक्तव्य विशेष लक्षवेधी ठरलं.

जेसिंडा यांनी अवघ्या ४२व्या वर्षी पंतप्रधानपद सोडलं आहे. हे पद त्यांनी साडेपाच वर्षं सांभाळलं. आपल्या पदाचा राजीनामा देताना त्यांनी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले. ते स्त्रीच्या नजरेतून समजून घेणं गरजेचं आहे. त्या म्हणतात,

'माझ्या कार्यकाळाचं सहावं वर्ष सुरू होणार आहे. मी हे पद सोडते आहे. विशेष अधिकारांसोबत जबाबदाऱ्याही येतात. तुम्ही नेतृत्व करायला कधी सक्षम आहात आणि कधी नाहीत याची योग्य वेळी जाणीव होणं, ही एक जबाबदारीच असते. मला माहीत आहे की माझ्याकडे आता हिंमत नाही. ही खरी गोष्ट आहे. आता माझ्यात हिंमत उरली नाही', असं प्रांजळपणे सांगत त्यांनी राजीनामा दिलाय. काहींना त्यांची ही कृती पळपुटेपण आहे, असंही वाटत आहे. पण एक स्त्री म्हणून त्यांच्या या शब्दांचा अधिक गंभीरपणे विचार करायला हवा. कारण त्या म्हणतात, 'माझ्याकडं देशाचं नेतृत्व करण्याची शक्ती आहे का? तर या प्रश्नाचं उत्तर मला 'नाही' असं मिळालं. त्यामुळे मी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान म्हणून साडेपाच वर्षं खडतर होती. पण, राजकीय नेतादेखील शेवटी माणूसच आहे. जोपर्यंत आमच्यावर जबाबदारी होती, ती चोख पाडण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी आम्ही केल्या. खरा नेता तो आहे, ज्याला पद सोडण्याची योग्य वेळ माहीत असते. मात्र, याचा अर्थ मी कमकुवत आहे, असा मुळीच नाही', असंही त्यांनी म्हटलं आहे. त्यांनी आपण आई म्हणून आपला प्राधान्यक्रम स्वत:च ओळखायला शिकला पाहिजे, असंही सांगितलंय.

जेसिंडा यांनी जगभरातील राजकीय नेत्यांना आपल्या राजीनाम्यातून आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे. त्यांचा राजीनाम्यांचं कारण काहीही असलं तरी त्यांच्या नेतृत्वाचा प्रामाणिकपणा अधोरेखित करणारा आहे. त्यामुळेच जेसिंडा यांच्यावर जगभरातून कौतुकाचा वर्षाव झाला. सत्तेच्या लोभानं जगभरात हुकूमशाहीची बीजं रुजवली जात असताना केवळ आपल्या राजकीय विरोधात आपलं स्वत्व गमावलं जाऊ नये, म्हणून त्यांचं राजीनामा देणं राजकारणात नवा आदर्श निर्माण करणारं आहे.

**लिझ ट्रस**

ब्रिटनच्या पंतप्रधानपदाच्या निवडणुकीत भारतीय वंशाचे उमेदवार ऋषी सुनक यांचा पराभव करत लिझ ट्रस यांनी पंतप्रधानपद मिळवलं होतं. परंतु अवघ्या सहा आठवड्यांत त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याचा धक्कादायक निर्णय घेतला. राजीनामा देताना त्यांनी, मी जी आश्वासनं दिली होती ती सध्याच्या स्थितीत पूर्ण करू शकले नाही, त्यामुळं पंतप्रधानपदाचा राजीनामा देत आहे. जेव्हा मी पंतप्रधान बनले त्यावेळी देशात आर्थिक स्थिरता नव्हती. देशातील नागरिकांना वीज बिल कसं भरायचं याची चिंता होती. आम्ही करकपातीचं स्वप्न पाहिलं होतं. मजबूत अर्थव्यवस्थेचा पाया रचण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, वर्तमानात ते शक्य नसल्यानं राजीनामा देत आहे,' असं त्यांनी म्हटलं.

लिझ यांनी राजीनामा देण्यापूर्वी संसदेत अर्थसंकल्प सादर केला होता. यामध्ये त्यांनी करवाढ आणि महागाईला रोखणाऱ्यासाठी पावलं टाकण्यासाठी निश्चित अशी योजनाही आखलेली दिसत होती. सत्तेत येताना त्यांनी करकपातीचं आश्वासन दिलं होतं. प्रत्यक्षात उलट झालं होतं. लिझ सरकारनं मांडलेल्या मिनी बजेटनंतर देशभरात कररचनेवरून गोंधळ माजला. त्यांच्या विरोधात संतापाचं वातावरण निर्माण झालं. त्यांच्याच पक्षाच्या खासदारांनी त्याला विरोध केला. या अगदी काही दिवसांतल्या घटनांची परिणती म्हणून त्यांनी राजीनामा दिला.

लिझ यांचा जन्म १९७५मध्ये ऑक्स्फर्ड इथे झाला.

ट्रस यांचे वडील गणिताचे प्राध्यापक होते तर आई नर्स म्हणून काम करत. त्या चार वर्षांच्या असताना त्यांचं कुटुंब स्कॉटलंडला राहायला गेलं. तिथल्या पेस्ली येथे राहताना प्राथमिक शिक्षण सुरू झालं. नंतर त्यांचं कुटुंब लीड्स इथं स्थायिक झालं. तिथंच त्यांनी आपलं माध्यमिक शिक्षण पूर्ण केलं. त्यांनी ऑक्स्फर्ड विद्यापीठातून उच्च शिक्षण घेतलं. त्यासाठी त्यांनी तत्त्वज्ञान, राजकारण आणि अर्थशास्त्र हे विषय निवडले. यासोबतच त्या राजकारणातही सक्रिय होत्या. सुरुवातीला त्यांनी लिबरल डेमोक्रॅट्ससोबत काम केलं आणि नंतर कन्झर्व्हेटिव्ह पक्षासाठी सक्रिय काम सुरू केलं.

'शेल अँड केबल अँड वायरलेस' या कंपनीसाठी काही काळ अकाऊटंट म्हणून कामही केलं. परंतु राजकारणाची ओढ त्यांना ब्रिटनच्या संसदेपर्यंत घेऊन गेली. २००१ आणि २००५मधील सार्वत्रिक निवडणुकांत त्या कन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या उमेदवार म्हणून हेम्सवर्थ आणि कॅडर-व्हॅली मतदारसंघांतून उभ्या होत्या. त्या निवडणुकांमध्ये त्यांना एकही जागा जिंकता आली नाही, पण त्यांनी हार मानली नाही. २००६मध्ये त्यांची ग्रीनिच काऊन्सिलर म्हणून नियुक्ती करण्यात आली. २००८मध्ये त्यांनी राइट-ऑफ-सेंटर रिफॉर्म थिंक टँकच्या उपसंचालकपदी काम करायला सुरुवात केली.



लिझ ट्रस

लिझ कन्झर्व्हेटिव्ह नेते डेव्हिड कॅमेरून यांच्या निकटच्या सहकारी असल्यानं संभाव्य उमेदवारांच्या यादीत होत्या. त्यामुळे २०१०मध्ये निवडणूक लढवण्यासाठी त्यांनी पक्षाच्या सुरक्षित अशा दक्षिण पश्चिम नॉरफॉक येथून निवडणूक लढवली. त्या निवडून आल्या आणि संसदेत जाण्याचं त्यांचं स्वप्न पूर्ण झालं. त्यानंतर दोन वर्षांनी त्या शिक्षणमंत्री झाल्या. खासदार असलेल्या लिझ यांनी 'ब्रिटानिया-अनचेन्ड' या पुस्तकाचं सहलेखनही केलं.

शाळांमध्ये नव्या सुधारणा राबवण्यावरून लिझ आणि उपपंतप्रधान निक क्लेग यांच्यात बराच वाद झाला. त्यावेळी त्यांच्या भूमिकेवरून लिझ चर्चेत आल्या. लिझ यांची कामावरील निष्ठा पाहून कॅमेरून यांनी त्यांना २०१४ मध्ये पर्यावरणमंत्री केलं. २०१५ मध्ये वेगळ्याच कारणानं त्यांच्या नावाची पुन्हा चर्चा झाली. कन्झर्व्हेटिव्ह कॉन्फरन्समध्ये चीजच्या आयातीवर भाषण दिल्याबद्दल त्यांची खिल्ली उडवण्यात आली. त्यांचं ते भाषण 'चीज स्पीच' म्हणून गाजलं. त्यांना ट्रोलर्सनं प्रचंड झोडपून काढलं, पण त्या डगमगल्या नाहीत.

ब्रेक्झिट म्हणजेच युरोपीयन युनियनपासून फारकत घेण्याच्या सार्वमतामध्ये लिझ यांनी युरोपीयन युनियनमध्ये राहण्यासाठी पाठिंबा दिला होता. 'ब्रेक्झिट ही एक शोकांतिका असेल' असं त्या त्यावेळी म्हणाल्या, नंतर मात्र त्यांनी आपला विचार बदलला.

त्या २०१६ मध्ये थेरेसा मे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये कायदामंत्री बनल्या. त्यानंतरच्या वर्षी त्या अर्थमंत्री झाल्या. २०१९मध्ये बोरिस जॉन्सन पंतप्रधान झाल्यानंतर लिझ यांना आंतरराष्ट्रीय व्यवहार मंत्रिपद देण्यात आलं. त्यांनी उत्तर आयर्लंड प्रोटोकॉलच्या गुंतागुंतीच्या समस्येचं निराकरण करण्याची मागणी केली. त्यांच्या या मागणीवर युरोपीयन युनियननं जोरदार टीका केली होती. इराणमध्ये अटक केलेल्या नाझानिन झाघारी-रॅटक्लिफ आणि अनुशेह आशुरी या दोन ब्रिटिश-इराणी नागरिकांची सुटका करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. रशियानं युक्रेनवर केलेल्या हल्ल्याचा निषेध करण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. त्याबाबत बोलताना त्यांनी, रशियन सैन्याला देशातून हाकलून लावलं पाहिजे, असं वक्तव्य केलं. ब्रिटनमधील काहींनी युक्रेन युद्धात सामील होण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यांना पाठिंबा दिल्याबद्दल लिझ यांना टीकेचा सामना करावा लागला होता.

हुजूर पक्षाची सत्ता असलेल्या ब्रिटनच्या संसदेत बोरिस जॉन्सन यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झालं. मग

पक्षातील सदस्यांनी आपला नेता निवडण्यासाठी मतदान केले आणि लिज यांच्या पंतप्रधानपद देण्यात आलं. तेव्हा ती घटना ऐतिहासिक ठरली. राजकीय, आर्थिक अशा अनेक संकटांमुळे त्रस्त झालेल्या ब्रिटनच्या पंतप्रधान म्हणून लिझ यांनी औपचारिकपणे सूत्रं हाती घेतली. ब्रिटनच्या त्या तिसऱ्या महिला पंतप्रधान ठरल्या. शिवाय त्यांना मिळालेल्या मताधिक्यानं त्यांचा विजयदेखील ऐतिहासिकदृष्ट्या अभूतपूर्व मानला गेला.

त्यांनी लहानपणी शाळेतल्या नाटकात हौस म्हणून पंतप्रधान मार्गोरेट थॅचर यांची भूमिका त्यांनी केली होती. ते पंतप्रधानपद त्यांच्याकडे चालून आलं होतं. परंतु हे पद औटघटकेचं ठरलं. वाढती महागाई आणि त्यामुळे निर्माण झालेली आर्थिक अस्थिरता; या कारणांमुळे ट्रस यांनी अवघ्या सहा आठवड्यांत राजीनामा दिला. देशातील राजकीय स्थिती ओळखून वेळीच राजीनामा दिल्यानं लिझ यांनी आव्हानं स्वीकारण्याआधीच माघार घेतली असं म्हटलं गेलं. मात्र त्या राजीनाम्याच्या दोनच दिवस आधी त्यांनी 'बीबीसी'ला मुलाखत दिली होती. ती ऐकून त्यांच्यात एक लढवय्यी वृत्ती असल्याचं जाणवलं होतं.

त्या मुलाखतीत, 'मी जनतेची आश्वासनं पूर्ण करू शकले नाही. माझ्या चुकांची मी जबाबदारी घेते. मी जनतेची माफी मागते. मला प्रत्येक आश्वासन पूर्ण करायचं आहे, पण आता त्यासाठी वेळ लागेल. मी हार मानणाऱ्यांपैकी नाही. मला लोकांसाठी काम करायचं आहे. त्यामुळे राजीनाम्यासारख्या फालतू गोष्टीत वेळ वाया घालवू नका. काम करणं हीच गोष्ट देशाच्या हिताची आहे.' असं म्हटलं होतं.

मुलाखतीत त्यांनी राजीनामा देणं योग्य नाही असं म्हटलं तरी त्यानंतर दोनच दिवसांनी त्यांनी राजीनामा दिला. पंतप्रधानपदाच्या प्रचारादरम्यान अर्थव्यवस्था रुळावर आणण्याबाबत लिझ यांनी जनतेला आश्वासनं दिली होती. ती त्यांच्यासाठी अडचणीची ठरली. महागाई नियंत्रणात आणण्यात त्यांचं सरकार पूर्णपणे अपयशी ठरलं. ट्रस यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करणारे अर्थमंत्री क्वासी क्वार्टेंग यांना राजीनामा द्यावा लागला होता. तर लिझ यांना करकपातीसंदर्भातील आपली सर्व धोरणं मागे घ्यावी लागली. त्याचा फटका अर्थव्यवस्थेला बसला. राजकीय संकटही इतकं मोठं झालं की त्या विरोधकांच्या टीकेचं लक्ष्य ठरल्या. याच राजकीय संकटातून त्यांनी राजीनाम्याचा निर्णय घेतला. लिझ ट्रस यांनी राजीनामा दिल्यामुळे ब्रिटनच्या इतिहासातील त्या सर्वात कमी कार्यकाळ असलेल्या पंतप्रधान बनल्या.

लिझ यांनी राजकीय दबाबामुळे किंवा विरोधकांच्या टीकेमुळे राजीमाना द्यावा लागला असला तरी लिझ यांचं वेगळेपण निश्चितच लक्षात घेण्यासारखं आहे. जेसिंडा यांच्याप्रमाणे त्यांचं राजीनामा देणं धक्कादायक असलं तरी त्यांच्या निर्णयाला जेसिंडा यांच्याप्रमाणे जनतेची सहानुभूती मिळालेली नाही. लिझ यांच्या पुढील आयुष्यात त्यांना पुन्हा पंतप्रधान होण्याची संधी मिळेल की नाही हे माहीत नाही, तरीही त्यांनी आपल्या पदाचा तत्काळ राजीनामा दिला.

भारतीय वंशाच्या ऋषी सुनक यांच्या पंतप्रधानपदावर येण्यानं भारतीय जनतेला लिझ यांच्या राजीनामा आणि त्यामागील कारणांचा तसा विसरच पडल्याचं दिसतं. ब्रिटनमध्येही फार वेगळी परिस्थिती नसावी, असं प्रसारमाध्यमांमधील बातम्यांमधून लक्षात येतं.

लिझ यांच्या निमित्तानं पंतप्रधानपदी महिला आपल्या कामाप्रती संवेदनशील असतात, आपण जनतेची कामं पूर्ण करू शकलो नाही ही बोच त्यांना अधिक तीव्रपणे टोचते हे लक्षात आलं. अर्थात जगभरातील राजकारणी नैतिक मूल्यं पायदळी तुडवत असताना लिझ यांचा राजीनामा आत्मघाती वाटू शकतो. परंतु लिझ यांनी आपल्या राजीनाम्यातून पदापेक्षा जनतेची बांधिलिकी अधिक महत्त्वाची मानली हेही लक्षात घ्यायला हवं. अशी संवेदनशीलता दाखवणारा एकही राजकीय नेता सध्या तरी कोणत्याही देशात दिसत नाही.

लिझ आणि जेसिंडा यांच्या राजीनाम्याची कारणं त्या–त्या देशांतील राजकीय आणि आर्थिक असली तरी जनतेप्रती प्रामाणिक असणं, पदापेक्षा आपण मोठं नाही हे मान्य करणं या बाबी ठळकपणे दिसतात. राजकीय नेत्या म्हणून त्यांच्या वाट्याला आलेली टीका ही पुरुषांच्या वाट्याला येते त्यापेक्षा अधिक टोकदार आहे. त्याला उत्तर म्हणून राजीनामा देणं हा पळपुटेपणा आहे, असं म्हटलंही गेलं. मात्र त्यांनी दाखवलेला बाणेदारपणा आणि जनतेचे प्रश्न सोडवण्यात आपण अपयशी ठरलो हे मान्य करण्याची ताकद क्वचितच अन्य नेत्यांनी दाखवली आहे. देशातील सर्वोच्च जबाबादारीच्या पदाचा राजीनामा देणाऱ्या या दोघी म्हणूनच अधिक आदरणीय ठरतात.

**– अपर्णा पाटील**

aparna.patil1@gmail.com


ग्रंथाली

**अभिनंदन**



संगीता अरबुने यांच्या ग्रंथाली प्रकाशित
**'बायका झुळझुळ ठेवतात आयुष्याचा पदर'**
या कवितासंग्रहाला नारायण सुर्वे साहित्य कला अकादमी, पुणे या संस्थेचा 'केशवसुत काव्यपुरस्कार' प्राप्त झाला आहे.

# अक्षयभाषा

## अमेरिकेत मराठीची रुजवात



विनता कुलकर्णी

**अमेरिकेच्या** ॲरिझोना राज्यात फिनिक्स शहरामध्ये स्थायिक डॉ. भाग्यश्री बारलिंगे (MD, Internal Medicine) एक निष्णात डॉक्टर आणि त्याचबरोबर, संवेदनशील जाणिवांच्या कवयित्री, लेखिका आणि सामाजिक व सांस्कृतिक बांधिलकी जपणारे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे.

संस्कारक्षम वय भारतात/महाराष्ट्रात घालवून, उच्च शिक्षण, व्यवसाय-नोकरीची नवीन क्षितिजे आजमवण्यासाठी अमेरिकेत मराठी माणूस येणे, परक्या देशात स्थायिक होणे आता अजिबात नवलाचे राहिलेले नाही. अमेरिकन सेन्सस ब्युरोच्या अलिकडच्या एका पाहणीनुसार अमेरिकेच्या सुमारे ३३१.९ मिलियन म्हणजे ३३ कोटी १९ लाख लोकसंख्येपैकी 'सुमारे' एक लाख तीस हजार मराठी भाषक (थोडक्यात ०.०३९ प्रतिशत) आहेत. स्थलांतरितांची परक्या देशात स्थिरस्थावर होण्यातील सुरुवातीची काही वर्षे भिन्न भाषा, भिन्न संस्कृती, रीतीरिवाज यांच्याशी जुळवून घेणे आणि पोटापाण्याचा व्यवसाय मार्गी लावणे यामध्ये खर्ची होतात. हे सारे करत असताना, संवेदनशील मन असेल तर आपण जेथून आलो त्या मातीचे बंध, आपली सांस्कृतिक मुळे मनात घर करून असतात. सतत मनातून वर डोके काढत असतात. मग नकळत सुरू होते, त्यांचे संवर्धन करण्याची धडपड! आपले शिक्षण व व्यावसायिक अनुभव याद्वारे काही सेवाभावी कार्यात योगदान करणे, आपल्या अस्तित्वाचा एक भाग बनलेली मराठी भाषेची, मराठी संस्कृतीची ज्योत अखण्ड तेवत ठेवणे, आणि परदेशी जन्मणाऱ्या, परक्या वातावरणात लहानाचे मोठे होणाऱ्या आपल्या पुढच्या पिढीतही मराठी भाषा अक्षय राहावी या उद्देशाने, उपक्रम आयोजित करणे हे परदेशातील मराठी माणसासाठी एक प्रकारे सकारात्मक आव्हान असते. ते स्वीकारून भाग्यश्री बारलिंगे यांनी फिनिक्समध्ये त्यांच्यासारख्याच समविचारी मैत्रिणी शिल्पा केळकर आणि अस्मिता काणे यांच्यासमवेत नियमितपणे मराठी भाषेचे वैविध्यपूर्ण कार्यक्रम करण्यास सुरुवात केली, विविध वयोगटांचा विचार करून! त्या कार्यक्रमांस त्यांना चांगला प्रतिसाद मिळू लागला. शिल्पा केळकर उत्तम लेखिका व कवयित्री असून भाग्यश्रींनी लिहिलेल्या सर्व नाट्य-एकांकिका शिल्पा यांनी दिग्दर्शित केल्या. त्यामुळे या दोघींनी एकमेकांना पूरक असे काम करत संस्था वाढवली. या उपक्रमांना एक स्थायी आणि स्पष्ट स्वरूप देण्यासाठी २००५ मध्ये भाग्यश्री यांनी रीतसर, ना-नफा तत्त्वावर फिनिक्स येथे 'अक्षयभाषा' (http://www.akshaybhasha.org) ही नोंदणीकृत संस्था स्थापन केली. ती आजही कार्यरत आहे.



डॉ. भाग्यश्री बारलिंगे

अमेरिकेत येण्यापूर्वी भाग्यश्री यांची शिक्षणाची वाटचाल विदर्भातील हिंगणघाट (वर्धा जिल्हा) येथून सुरू झाली. त्यांचे शालेय शिक्षण मराठी माध्यमातून झाले. वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असताना त्या राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या मानकरी होत्या. १९८५ मध्ये नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस पदवी संपादन

केली. त्यानंतर भारताच्या ग्रामीण आणि शहरी रुग्णालयांमध्ये बालरोग, प्रसूती आणि स्त्रीरोग, शस्त्रक्रिया व औषधशास्त्र यामध्ये इंटर्नशिप करून, महात्मा गांधी हॉस्पिटल, सेवाग्राम येथून इंटर्नल मेडिसिनमध्ये पदव्युत्तर प्रशिक्षण आणि सहा वर्षे तेथील वैद्यकीय महाविद्यालयात शिकवण्याचा अनुभव घेतला.

डॉ. भाग्यश्री यांचे सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्षेत्र आणि कर्तृत्व पाहता ओक महावृक्षाच्या फळावरून (एकॉर्न) आलेली इंग्रजी भाषेतील म्हण, The Acorn does not fall far from the tree सार्थ ठरते. त्यांचे वडील डॉ. मल्हार कावळे हे वैद्यकीय क्षेत्रातील एक उत्तम डॉक्टर आणि लोकप्रिय लेखक होते. त्या काळात तरुणभारत, लोकमत या दैनिकांतून मल्हार कावळे यांचे लेख, कथा प्रकाशित झाल्या. 'रंग माझा वेगळा' आणि 'सहज लिहायचं म्हणून', ही त्यांची दोन प्रकाशित पुस्तके! भाग्यश्रींची आई, विशाखा देवईकर-कावळे मराठी व संस्कृतच्या शिक्षिका होत्या. आईवडिलांविषयी, माहेरच्या जुन्या आठवणी आणि अक्षयभाषेचे बीज त्यातच कसे दडलेले होते याबद्दल भाग्यश्री सांगतात-

आईने निवृत्ती नंतरही संस्कृतचे विनाशुल्क वर्ग बराच काळ सुरू ठेवले होते. माझ्या आईवडिलांना संस्कृत चांगले येत असे. त्यांच्या बोलण्यात नेहमी कालिदासाचे काव्यपंक्ती येत. दोघांनाही साहित्याची आवड होती. आमच्याकडे कवी, लेखक यांचा राबता असायचा. एके काळी आमच्या घरी स्थानिक वाचनालयापेक्षाही जास्त पुस्तके होती. या पुस्तकांत पु.ल. देशपांडे, नरहर कुरुंदकर, आचार्य अत्रे अशा अनेक साहित्यिकांची पुस्तके, अनेक कवितासंग्रह, अनेक नाटके होती, ज्यात एक दुर्मिळ असा देशमुख आणि कंपनीने काढलेला छोटेखानी संगीत नाटकांचा संचही होता. तसेच 'द गुड अर्थ', 'ओल्ड मॅन अँड द सी', 'रिबेक्का' अशी इंग्रजी पुस्तकेदेखील होती. आम्ही बहिणी धेडगुजरी मराठी बोलणाऱ्या गावात वाढलो तरी आमच्या घरात पुणे होते. माझ्या दोघी बहिणींनाही (अनघा व राधा) मराठी साहित्याची आवड आहे. अनघाच्या 'पळस' या कवितासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळालेय.

माझ्या शाळकरी वयात, आमच्या गावात साहित्य अकादमी पारितोषिक विजेत्या लेखिका आशा बगे अनेक वर्षे होत्या. बगे आणि कावळे कुटुंबामध्ये मैत्रीचा दृढबंध निर्माण झाला. आशा बगे यांच्याबरोबर मी साहित्य संमेलनाला जात असे. त्यांच्यामुळे कवितांमध्ये आणखी गोडी निर्माण झाली, कवितासंग्रह जमवण्याचा छंद लागला. मी आता-आतापर्यंत काही नवीन लिहिले तर आईवडिलांबरोबर बगेकाकूंनाही ते पाठवत असे. माझी पहिली कथा 'घर' ही स्त्री मासिकात छापून आली होती. त्यावेळी संपादिका विद्या बाळ यांनी पाठवलेले पत्र माझ्या आईने दागिन्यांच्या पेटीत जपून ठेवले होते. माझ्या आईने मला तिच्या शेवटपर्यंत लेखनासाठी प्रोत्साहन दिले. कथास्पर्धांमध्ये भाग घ्यावा म्हणून त्यांची माहिती ती भारतातून मला पाठवत राहिली. आता तो स्रोत मावळला... पण आईने लावलेले उत्साहाचे झाड मनात अजून ताजेतवाने आहे. समाजकार्य हा आयुष्याचा भाग आहे, त्याला मुहूर्त पाहण्याची गरज नाही असे आईवडिलांच्या कृतीतून मी व माझ्या बहिणी शिकलो, असेही भाग्यश्री कृतज्ञतेने सांगतात.

अमेरिकेत आल्यावर मेसा ॲरिझोना येथे भाग्यश्रींनी इंटर्नल मेडिसिनमध्ये रेसिडेन्सी-प्रशिक्षण (१९९४-१९९७) पूर्ण केले. त्यांच्याकडे ॲरिझोना राज्याचा, अमेरिकन बोर्ड ऑफ इंटर्नल मेडिसिन वैद्यकीय सेवेचा परवाना आहे. गेली पंचवीसहून अधिक वर्षे अमेरिकेत वैद्यकीय क्षेत्रात त्या कार्यरत आहेत.

मात्र अमेरिकेत आल्यावर पूर्वीच्या साहित्यिक वर्तुळापासून भाग्यश्री दुरावल्या. महाराष्ट्रातून अमेरिकेत येणारी त्यांच्या आसपासची बरीचशी मराठी मंडळी मिंग्लिश (अर्धवट मराठी, अर्धवट इंग्रजी) बोलताहेत, अमेरिकेतील अनेक मराठी पालकांचा आपल्या मुलांनी मराठीपेक्षा इंग्रजी बोलावं याकडे कल आहे, माय-मराठीचा क्षय होतो आहे, हे भाग्यश्रींना जाणवलं. आणि मग जणू स्वतःची मातृभाषेची तहान भागवायला त्यांनी अमेरिकेत 'अक्षयभाषा'ची विहीर खोदली, अर्थात, स्वान्तः सुखाय, तसेच जनहिताय... या दोन्ही कारणांनी! मराठी भाषेचे शिक्षण देण्याच्या उद्देशाने नव्हे तर पुढच्या पिढीत मराठी भाषेची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने मल्टि-व्हिटॅमिन पिल्ससारखे सर्वसमावेशक कार्यक्रम त्यांनी तयार केले. त्यात बालकविता, चांदोबातील गोष्टी, समुद्र आणि विविध विषयांवर आधारित श्राव्य कार्यक्रम, इत्यादींपासून दुर्गाबाई भागवतांच्या पुस्तकातील उताऱ्यांपर्यंत सर्व काही असायचे. हे बाळबोध कार्यक्रम उत्क्रांत होऊन त्यांचे पुढे मोठ्या स्टेजवरील 'त्रिवेणी', 'पुलोत्सव', 'युनिव्हर्सल टागोर' इत्यादी भव्य सादरीकरणात रूपांतर झाले. अक्षयभाषा संस्था नाट्यमाध्यमाद्वारे छत्रपती शिवाजीमहाराज, लक्ष्मीबाई टिळक, रवींद्रनाथ टागोर, ग्रेस, पु.ल. देशपांडे आणि अनेक थोर मराठी, भारतीय व्यक्तिमत्त्वांची ओळख भारताबाहेर वाढणाऱ्या नवीन पिढीला करून देत आहे. महाराष्ट्रातील ख्यातनाम लेखक-लेखिका आशा बगे, भानू काळे, अरुणा ढेरे, डॉ. माधव चितळे, महेश एलकुंचवार, कवी हेमंत जोगळेकर नामांकित चित्रपट-निर्मात्या, दिग्दर्शिका सुमित्रा भावे इत्यादींबरोबर त्यांच्या कार्याविषयी कार्यक्रम, अश्विनी भिडे-देशपांडे, राहुल देशपांडे यांचे गाण्याचे कार्यक्रम, पु.ल. देशपांडे यांचा भाचा दिनेश ठाकूर व त्यांच्या पत्नी ज्योती यांची मुलाखत, डॉ. रविन थत्ते यांचे ज्ञानेश्वरीवर भाषण, आणि अशा अनेक मान्यवरांना आमंत्रित करून तसेच स्थानिक कलाकारांसमवेतही अक्षयभाषाने आजवर अनेक दर्जेदार कार्यक्रम सादर केले आहेत. रोटरी क्लब (कोथरुड, पुणे शाखा) यांनी अंधांसाठी आणि वंचितांसाठी स्थापिलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या 'सुहावा' ऑडिओ मासिक मालिकेत अक्षयभाषा संस्थेचा सहभाग आहे. अक्षयभाषा संस्थेने पद्मविभूषण पूज्य बाबासाहेब पुरंदरे यांच्या श्रद्धांजलीपर, बहुतांश त्यांनी लिहिलेल्या साहित्यावर आधारित श्राव्य कार्यक्रमांचे प्रायोजन

आणि सादरीकरण केले. (अक्षयभाषाच्या यूट्यूब वाहिनीवर अशा विविध कार्यक्रमांचे सादरीकरण पाहण्यासाठी संकेतस्थळ– (https://www.youtube.com/akshaybhasha7778/videos , https://www.youtube.com/akshaybhasha7778/playlists)

वैद्यकीय व्यवसाय आणि अक्षयभाषा संस्थेचे कार्य करत असताना, एकीकडे भाग्यश्रींनी आपल्या दोन अपत्यांचे संगोपनही डोळसपणे केले आहे. त्यांची मुलगी डॉक्टर आहे आणि मुलगा इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात कार्यरत आहेत. अमेरिकेत लहानाचे मोठे झालेल्या या दोघांनाही मराठी भाषा बोलता येते आणि मराठी नाटकांमधेही त्यांचा सहभाग असतो. मुलगा, मुलगी जावई, नात असे भाग्यश्री यांचे विस्तारीत कुटुंब आहे.

सध्या अक्षयभाषातर्फे अमेरिकेतील मराठी व अमराठी लेखकांसाठी शब्दकर्मी हा प्लॅटफॉर्म निर्माण केला जातोय. ह्या यूट्यूब प्लेलिस्टवर लेखकांच्या मुलाखती आहेत. ह्या मुलाखती केवळ दोन व्यक्तींमधला संवाद नसून लेखकाच्या पुस्तकांवर आधारित प्रहसने, त्यातील उताऱ्यांचे वाचन, त्यातील पार्श्वभूमीचे फोटो इत्यादी अनेक बाबी यात असतात. उत्तर अमेरिकेतील मराठी माणसांच्या लेखनगुणांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने अक्षयभाषा संस्था अलिकडेच अमेरिकेतील एकता फाऊंडेशन प्रायोजित कथास्पर्धांचे आयोजन करते. तसेच, स्वतंत्रपणे कवितास्पर्धांचे प्रायोजन करते. अमेरिकेतील मराठी लेखकांना व्यासपीठाची, प्रकाशकाची, वितरकाची गरज आहे हे लक्षात घेऊन अक्षयभाषा संस्थेच्या माध्यमातून या क्षेत्रात काही योगदान करण्याचा भाग्यश्री यांचा विचार आहे. आपल्या अक्षयभाषा संस्थेच्या वाटचालीत भाग्यश्रींनी स्वत:ही बऱ्याच नवीन गोष्टी शिकून आत्मसात केल्या. वैद्यकीय व्यवसायात व्यग्र असल्याने संगणकाच्या वापराबद्दल त्यांना पूर्वी जुजबीच माहिती होती. परंतु अक्षयभाषा संस्थेच्या कामानिमित्ताने संस्थेच्या वेबसाइटची देखभाल, व्हिडिओ एडिटिंग ही कामे आता त्या स्वत:च आत्मविश्वासाने करत आहेत. आणि 'मुख्य म्हणजे लोकसंग्रह वाढला, ही माझी श्रीमंती!', असं डॉ. भाग्यश्री बारलिंगे सांगतात.

अक्षयभाषा संस्थेने फिनिक्स येथील स्थानिक दोन वाचनालयांत मराठी भाषेविषयी माहिती देऊन, स्थानिक शासनाच्या सर्व नियमांची अंमलबजावणी करून, मराठी दालनास परवाना मिळवला. अक्षयभाषा संस्था विविध विषयांवरची मराठी पुस्तके या वाचनालयांमध्ये उपलब्ध करून देत असते.

नवनवीन गोष्टी शिकत राहण्याची इच्छा, अडचणीतून मार्ग काढण्याची जिद्द आणि आपल्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करण्याची जाणीव असणाऱ्याला वयाचे बंधन नसते. अगदी अलिकडेच, जून २०२२ मध्ये भाग्यश्रींनी हॉस्पिस आणि पॅलिएटिव्ह केअर मेडिसिनमध्ये फेलोशिप प्रशिक्षण पूर्ण केले. हॉस्पिस– म्हणजे असाध्य रोगाच्या अंतिम अवस्थेतील रुग्णांसाठी सेवाकेंद्र; आणि पॅलिएटिव्ह केअर मेडिसिन म्हणजे–



**टेम्पी, ॲरिझोना येथे सार्वजनिक वाचनालयात अक्षयभाषा संस्थेने सुरू केलेल्या मराठी दालनाचे उद्घाटन – डॉ. भाग्यश्री बारलिंगे, ग्रंथालयीन कामकाजाचे सुपरवायझर क्ले वर्कमन आणि आमंत्रित अतिथी–तत्कालीन काँग्रेस वूमन फरहाना शिफा**

रोग– उपशामक आंतरशाखीय वैद्यकीय उपचारात्मक दृष्टिकोन. याचा उद्देश रुग्णाच्या जीवनाचा दर्जा सुधारणे आणि गंभीर, जटिल आजार असलेल्या रुग्णांमधील वेदना कमी करणे हा आहे. अक्षयभाषाच्या कार्याबरोबरच सध्या भाग्यश्री 'इंटर्नल मेडिसिन, हॉस्पिस आणि पॅलिएटिव्ह केअर' क्षेत्रात स्वतंत्रपणे खाजगी प्रॅक्टिस करत आहेत. आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग नोकरी व्यवसायाच्या कक्षेबाहेरही समाजकल्याणार्थ करण्यासाठी अक्षयभाषा संस्थेद्वारे, भाग्यश्रींनी आजवर फिनिक्समधील मराठी लोकांसाठी मधुमेह, हृदयविकार, स्मृतिभ्रंश, पॅलिएटिव्ह केअर मेडिसिन अशा विषयांवर तज्ज्ञांमार्फत माहितीपर व्याख्याने, मार्गदर्शनपर कार्यशाळा आणि महाराष्ट्रातील पॅलिएटिव्ह केअर संस्थेसाठी निधी–संकलनार्थ अमेरिकेत सांस्कृतिक, साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन केले. यामध्ये मराठी आणि अमराठी लोकांचाही सहभाग असतो.

एकंदरीत, डॉ. भाग्यश्री बारलिंगे यांनी अठरा वर्षांपूर्वी अमेरिकेच्या मातीत रुजवलेले अक्षयभाषाचे मराठी रोपटे आता जोमाने बहरते आहे. सांस्कृतिक विविधता ही मानवतेला लाभदायी अशी सामूहिक शक्ती असते. याच तत्त्वावर, पूर्वपश्चिम संस्कृतींचा सुयोग्य मेळ घालत, अमेरिकेतील स्थानिक संस्थांबरोबरही अक्षयभाषा संस्थेचे कार्य चालू आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

**– डॉ. विनता कुलकर्णी** (शिकागो)
vinata@gmail.com



किरण येले

# संक्षिप्ताकारातील मोठ्या अवकाशाची कविता

**संवदनशील** व्यक्तीला कविता वयाच्या कोणत्याही टप्प्यात गाठतेच. बालपणी अंगाईगीते, शालेय पुस्तकातील कविता यातून शिकता शिकता, कविता आत सव़ेदनशीलतेचं बीज रुजवते. पण पुढे शाळा-कॉलेज सरलं की घरप्रपंचासाठी अर्थार्जन करताना कधीतरी कवितेचा हात सुटतो आणि अनेक जण जगण्याच्या रोलरकोस्टरमध्ये भिरभिर फिरत राहतात. अशा रोलर कोस्टरमधल्या माणसांना सर्व ऐहिक सुखं सोबत असतानाही आयुष्यात काहीतरी कमतरता असल्याची सल जाणवू लागते. आसपासच्या किंवा स्वतःच्या जगण्यातील न्यूनभान येऊ लागतं. समाजव्यवस्था, नातेसंबंध, मानसिकता, एकूणच समष्टी याकडे वेगळ्या कोनातून पाहण्याची निकड त्यांना भासू लागते. आणि त्यांच्या नजरेत बदल होतो. ती व्यक्ती पुस्तकं वाचू लागते, मणसं वाचू लागते, काळाच्या पटलावरील भूत आणि वर्तमान घटनांचे अनुबंध लावून त्यांचे मानवी जीवनावर झालेले परिणाम अभ्यासू लागते आणि त्या अभ्यासातून प्रत्येक गोष्टीकडे अधिक चिकित्सकपणे पाहण्याची सवय लागून जाते. प्रत्येक बाबीकडे सजगतेनं पाहताना त्यांच्या आत विरलेल्या किंवा विरत चाललेल्या संवेदनजाणिवांना आच लागते आणि कवितेचा जन्म होतो. आणि त्यानंतर कवीचा.

डॉ. धीरज कुलकर्णी चिंचवड विभागात वैद्यकीय प्रॅक्टिस करतात आणि गेली अनेक वर्षं कविता लिहीत आहेत. अजून एकही पुस्तक त्यांनी प्रकाशित केलेलं नाही. काळ असा आहे की आपले काहीतरी प्रकाशित होण्यासाठी सारे आसुसलेले असतात, परंतु याच काळात असेही काही लोक आहेत जे आतून उजळण्यासाठी किती काळ थांबले होते, थांबले आहेत. त्यासाठी ते वाचन, चिंतन, मनन याची साधना करत आहेत. ही साधना करता करता काही आतून उजळलेही, परंतु आतून उजळल्यावर त्यांना आता बाह्यझोताची गरज वाटत नाही. डॉक्टर धीरज कुलकर्णी हे त्या लोकांपैकी एक आहेत. त्यांचे वाचन विलक्षण आहे. वाचन आणि नाटक या त्यांच्या दोन आवडी आहेत. ते उत्तम अभिनेते आहेत. जाहिराती, प्रायोगिक नाटके, मालिका, शॉर्ट फिल्म यांमधून ते अभिनय करत असतात आणि नव्या लेखकापासून अगदी पंतकाळातील अपरिचित-परिचित लेखकांची पुस्तकं वाचून त्यातील चांगली पुस्तके वाचकांनी वाचावीत म्हणून त्या पुस्तकाचा रसास्वाद सामाजिक माध्यमावर देत असतात. त्यांच्या वाचनामुळे आजच्या काळातील बालाजी सुतार, गणेश कनाटे, यांच्यासारख्या अनेक चांगल्या लेखक-कवींशी त्यांची साहित्यिक मैत्री झाली आहे परंतु अनेकांना ते कविता लिहितात याबद्दल कल्पना नाही. धीरज कुलकर्णी यांची कविता अशी स्वतःविषयी न बोलणारी आहे. ती नात्यातील विसंवादावर बोलत नाही तर नात्यातील तरलतेवर ज्या नजाकतीनं भाष्य करते ते विलक्षण आहे.



डॉ. धीरज कुलकर्णी

भेटलेला प्रत्येक शब्द
वाटेत सोबत होता
ओळ होत असताना,

पहाटेच्या धुक्यावर तरंगणाऱ्या
सूर्यबिंदूंच्या चमकेसारखे,
रानात आनंदाने गाणाऱ्या
पक्ष्यासारखे,
आणि तुझ्या हाताच्या
हळुवार स्पर्शासारखे
शब्द सोबत राहिले
कायम,

काही न मागता
कधीही

मला त्यांचे मोल
जाणणे,
तितकेच होते अगत्याचे,
जितका वाऱ्याने
वाहून आणलेला तुझा गंध
होता मोलाचा

ही प्रेमकविता असूनही त्यात चंद्रचांदण्या अशी रूढ चिन्हं येत नाहीत. एखाद्या गोष्टीचं फक्त आपल्यासाठी असणं किती महत्त्वाचं आहे हे अलवारपणे या कवितेत अधोरेखित होत जाताना दिसतं. त्यांची कविता मनाच्या पातळीवर चाललेल्या खळबळीचा वेध घेण्याचा प्रयत्न करते आणि ते करताना त्याची कविता ज्या चिन्हसृष्टीचं योजन करते ते वाचताना कळतं, की ही कविता वरवरच्या प्रतलातून आलेली नाही. त्यामागे अनेक काळाची घुसळण आणि चिंतन आहे.

हो नाहीच्या सीमारेषेपल्याड
गवसलेली गर्भित उपवने
अर्थ देतायत अनिश्चिताच्या वारूळाला
वक्षातून वाहणारे हुंकार

कुठूनही ऐकावेत,
जरी दगा दिला श्वासांनी

प्राप्तस्थात देहांचे
झुरतात स्वच्छंद योग

विरलेल्या सोनगाठीची सळसळ
वीजबावऱ्या क्षणात साठवलेली

तुझे म्हणावे असे महाभूताचे दर्पण
हृदयातून हृदयातच झरणारे किलवरी

मला नक्की माहितेय अर्थ
तुझ्या पदर नीट सावरण्याचा

धीरज कुलकर्णी यांची कविता चिरेबंद आहे. त्यातील एकही शब्द काढता वा हलवता येत नाही. त्यांच्या कवितेतील विचार आणि मध्यवर्ती बिंदू कवीला स्पष्ट आणि ठाम असल्यानं कविता पसरत जात नाही. कविता तिच्या संक्षिप्ताकारात मोठा अवकाश घेऊन येते. त्यांच्या कवितांचा रूपबंध दीर्घ नाही आणि तरीही त्यांच्या कवितेतील भाष्य आणि जाणिवा मात्र प्रदीर्घ आहेत.

न विसरण्याचं ठरलेलं
अजन्म विस्कटलेपण,
सतत साथ करत येतं.

सावरण्याचं भान ओघळलेलं
सलगसे काही दिवस
विसावतात तुझ्या माझ्या खांद्यावर
कसे विश्वासानं

आणि गर्दीत सुटू नयेत
हात एकमेकांचे
म्हणून गुंफून एकमेकांत
रस्ता चालण्याची समग्रता

विजेच्या तारांवर बसलेल्या
दुपारच्या प्रहराला
कलत्या सूर्यानं काही
क्षण उधार मागावेत,
तर,
त्यानं आपल्याकडे बोट दाखवावं

अनेक नवोदित कवींच्या कवितांत थेट आशय सांगणाऱ्या कविता येतात. भाषेची अलवार गुंफण आणि त्यातून साध्य होणारी बहुविधता अनेक नवोदित कवींच्या कवितांत दिसत नाही. धीरज कुलकर्णी यांच्या कवितेत भाषेचे सौंदर्य प्रकर्षानं दिसतं आणि त्यांची कविता भाषेचा प्रवाह त्यांच्या मुक्तछंद कवितेतही अशा रीतीनं येतो की कविता वृत्तबद्ध असल्याचा आभास होतो. किवा असंही म्हणता येईल की धीरज कुलकर्णी यांची कविता रूढ रूपबंध टाळून, रूढ रूपबंधाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न करते.

अरण्यतेचा प्रदेश होता
रुदनात सारे जीव निमूट
स्वत्वाच्या बेलाग आरशात
धूळ झटकते वेडी ओळ

लुचताना भाषेत शब्दांना
पाढे म्हण अवयवाचे
सुखाला गुणिले भूक
सत्वर सात्त्विक हवी

उद्याची पहाट सांगते
गाणे आपल्या पक्ष्यांचे

कुण्या काळचा पाणवठा
तुझ्या अधरात विरघळे

ही ओढ नदीच्या धारेची
हा प्राण त्यात मी ओतावा
जल झाले निमग्न प्रतिमेत
मागते तुला ओलावा

त्यांच्या कवितेतील जाणिवांचे पदर लयबद्ध रूप घेतात तेव्हा काही ज्येष्ठ कवींच्या लयकवितांची आठवण होते, पण सजगतेनं वाचल्यावर कळतं की कुलकर्णी यांच्या कवितातील संवेदन स्वत:चे आहेत आणि महत्त्वाचं म्हणजे अनेक वेळा ते संवेदन स्त्रीभूमिकेतून व्यक्त होतं तेव्हा ते अधिक तरल बनतं.

तुझ्या आतमध्ये आणि
आसपास
असलेली मी, नसलेली मी
समर्पित मी, अलिप्त मी.

किंवा

अज्ञाताच्या अंतरंगात जितका
मावेल अंधार
तितकं सुस्नात पिवळ्या हिरव्या शेतात
मोजलंय सौख्याचं भरलेपण

कविताच का लिहिता या प्रश्नावर धीरज कुलकर्णी म्हणतात भाषेशी इमान राखणारा कवितेइतका दुसरा फॉर्म नाही आणि कविता काळाला पुरून उरू शकते इतकी ताकद कवितेच्या चार ओळींत असते. अल्पाक्षरत आशय घट्टपणे व्यक्तर करणाऱ्या कविता त्यांना आवडतात आणि वसंत आबाजी डहाके, ग्रेस, विंदा, अरुण कोलटकर हे त्यांच्या आवडीचे कवी आहेत. कविता का जवळची वाटते या प्रश्नावर ते म्हणतात मी कवितेला जवळचा वाटतो. याचा अर्थ असा होतो की धीरज कुलकर्णी कविता मुद्दाम लिहीत नाहीत तर ती येईल तेव्हाच उतरवतात. कवितेचा असा गंभीरपणे विचार करत कविता लिहीणाऱ्या धीरज कुलकर्णी यांची कविता लवकर वाचकापुढे येवो.

**– धीरज कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९८२२४५१९२८

**– किरण येले**
kiran.yele@gmail.com

**मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन**

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**

| | |
|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : मासिक |
| मुद्रकाचे नाव | : इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |

मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०२३



शरद काळे

# पाण्याच्या प्रदूषणाच्या समस्या व त्यांचे निराकरण

**दूषित** पाण्याच्या समस्या आपल्या देशात फार पूर्वीपासून भेडसावत आहेत. फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांनी भारतातील ब्रिटिश सैनिकांच्या आरोग्याविषयी बरेच संशोधन सन १८५५-५६ मध्ये इंग्लंडमध्ये बसून केले होते. संख्याशास्त्रातील त्यांच्या ज्ञानामुळे त्यावर उपाययोजना करण्यात त्यांना चांगलेच यश मिळाले होते. त्यांनी त्याची कारणमीमांसा करताना ग्राम ीण भारताविषयी बरीच माहिती गोळा केली व सांडपाण्याचे नियोजन नीट न होणे, दूषित पिण्याचे पाणी, अतिशय गर्दी (१८६० सालच्या आसपासमुद्धा!) आणि अतिशय सदोष वायुवीजन (ventilation) ही चार कारणे ह्या सैनिकांच्या प्रचंड मृत्युदरासाठी जबाबदार आहेत असे आपले निष्कर्ष प्रसिद्ध केले होते. भारतीय लोकांचे आणि ब्रिटिश सैनिकांचे आरोग्य एकमेकांवर अवलंबून आहे, म्हणून भारतीय लोकांचे जीवनमान सुधारले पाहिजे असे त्यांनी सांगितले होते. भारतीय राज्यव्यवस्थेत आरोग्यसेवा सुधारण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्यव्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी त्यांच्या या निष्कर्षांचा चांगलाच उपयोग झाला. सन १८५८-५९ मध्ये भारतीय आरोग्यव्यवस्था सुधारावी म्हणून रॉयल कमिशन स्थापन केले पाहिजे, यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि त्यातूनच हे कमिशन नेमले गेले. त्या कमिशनकडे त्यांनी आपला अहवाल सुपूर्द केला. त्यांनी सुचवलेल्या सुधारणा करण्यात आल्या. त्यानंतर दहा वर्षांनी ब्रिटिश सैनिकांचा मृत्युदर दर हजारी ६९पासून १८पर्यंत खाली आला होता. पण त्यावेळी झालेल्या सुधारणा तात्पुरत्या असल्यासारख्या होत्या! आज १६० वर्षांनीदेखील आपण या बाबी फारशा सुधारू शकलो नाही ह्याची वेदना जाणवत राहते. अजूनही घरांची रचना करत असताना वायुवीजन हा विषय अभावानंच चर्चिला जातो, त्यामुळे घरात शुद्ध खेळती हवा असली पाहिजे हे एकविसाव्या शतकातदेखील स्वप्नच वाटते. तसेच, शुद्ध पिण्याचे पाणी हीदेखील कविकल्पना वाटावी अशीच कागदावर राहिलेली आहे.

पाण्यातून ज्या संसर्गजन्य रोगांचा फैलाव होतो, त्यात प्रामुख्याने विषमज्वर (टॉयफॉइड), पटकी (कॉलरा), हगवण या जिवाणूप्रणित रोगांचा, कावीळ या विषाणूप्रणित रोगाचा आणि अमिबा आणि जिअरडीया या आदीजीवप्रणित हगवण या रोगाचा समावेश असतो. यातील टायफॉइड हा रोग मुदतीचा ताप म्हणूनही परिचित आहे. सालमोनेला टायफी, सालमोनेला पॅराटायफी ए, सालमोनेला पॅराटायफी बी आणि सालमोनेला टायफिम्युरियम या चार प्रमुख जिवाणूंच्या प्रादुर्भावामुळे टायफॉइड हा रोग होतो. पिण्याच्या पाण्याच्या साठ्यात सांडपाण्याचे मिश्रण होत असेल, तर ह्या रोगाचा फैलाव सहजतेने होतो. रुग्णाच्या विष्ठेतून ह्या जिवाणूंचे प्रदूषण सांडपाण्यात होते, आणि असे सांडपाणी पिण्याच्या पाण्यात मिसळले, तर हे जिवाणू निरोगी माणसांच्या शरीरात प्रवेश करतात. सात, चौदा, एकवीस अशा सातच्या पटीत रुग्णाला ताप येत राहतो. पोटात दुखते, व आतड्याला क्षते पडतात. या रोगावर क्लोरोमायसिटीन, जेंटामायसीन यासारखी प्रतिजैविके उपलब्ध झाल्यामुळे बळी पडणाऱ्या रुग्णांच्या संख्येत घट झाली असली, तरी अजूनही दरवर्षी आपल्या देशात लाखाच्या संख्येत लोक बळी पडतातच! कॉलरा या रोगाचा प्रादुर्भाव व्हिब्रियो कॉलरी या जिवाणूंमुळे होतो. या रोगाचा रुग्ण उलट्या आणि जुलाब यामुळे एक दोन दिवसांतच पूर्णपणे गळून जातो. शरीरातील पाणी आणि क्षार मोठ्या प्रमाणावर यातून बाहेर टाकले जातात, त्यामुळे निर्जलीकरण किंवा डीहायड्रेशनमुळे रोगी दगावण्याची शक्यता असते. लिंबू सरबत, ग्लुकोजचे द्रावण, भाताची पेज यांसारख्या द्रवरूप अन्नातून या पाण्याची आणि

क्षारांची सतत भरपाई करणे अपेक्षित असते. गंभीर स्वरूपाच्या रुग्णांना सलाइन लावावे लागते. याही रोगावर इलाजासाठी प्रतिजैविके उपलब्ध आहेत. भारतात गावोगावी ज्या यात्रा किंवा जत्रा भरतात, त्या झाल्या की कॉलऱ्याची साथ पसरतेच!

Reverse Osmosis म्हणजे उलट द्रवाभिसरण किंवा उलट परासारण म्हणजे ज्याला आर.ओ. पाणी असे संबोधले जाते त्याविषयी गैरसमजुती अधिक आहेत. अशा पद्धतीने शुद्ध केलेल्या पाण्याचा पिण्यासाठी अजिबात वापर करू नये, या पाण्यामुळे व्हिटॅमिन डीची कमतरता निर्माण होते, यापासून ते केवळ हेच पाणी आपल्याला तारणहार ठरणार आहे अशी टोकाची मतमतांतरे याविषयी ऐकायला मिळतात. वास्तविक वैयक्तिक किंवा कौटुंबिक पातळीवर पाण्यासाठी कधी हे तंत्रज्ञान वापरावे लागेल असे वाटले नव्हते. परंतु प्रख्यात आणि लोकप्रिय अभिनेत्रीने जाहिरात केल्यामुळे आर.ओ. हे नाव खेड्यापाड्यातदेखील पोहोचले. तंत्र पोहोचले तरी त्यातील नेमके विज्ञान मात्र गुलदस्त्यात राहिल्यामुळे, पाणीप्रश्न तसाच राहून अशा मतमतांतरांना मात्र खतपाणी मिळत राहिले!

आपल्याला जीवनासाठी पाणी आवश्यक असते आणि जीवन म्हणजेच पाणी असेही शिकवले जाते. रोज साधारण दोन ते तीन लिटर पाणी प्यावे. हे पाणी शुद्ध असावे अशी गरज शरीराची असते कारण टॉयफाइड, कॉलरा, कावीळ यांसारखे साथीचे रोग पाण्यातून पसरतात. त्यामुळे पाणी निर्जंतुक असायला हवे याबद्दल वाद असण्याचे कारण नाही. पाण्यात क्षारांचे प्रमाण अधिक असेल तर ते पचनक्रियांमध्ये अडथळे आणू शकते. म्हणून पिण्यासाठी मृदू पाणी वापरले पाहिजे हेही योग्य आहे. सर्वसाधारणपणे स्थानिक स्वराज्यसंस्थांमार्फत जो पाणीपुरवठा केला जातो त्यात या बाबींचा विचार करून तसे पाणी पुरवणे अभिप्रेत असते. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, कोल्हापूर यासारख्या महानगरपालिका त्यात बऱ्यापैकी यशस्वी झाल्या आहेत. मुंबईत माझ्या घरी मी गेली ४० वर्षे कोणत्याही फिल्टरविना पाणी पितो ही वस्तुस्थिती आहे. मृदू पाण्याचे गुणधर्म कसे असावेत याबद्दल भारतीय प्रमाण १०५०० (IS 10500) यात जी प्रणाली देण्यात आली आहे तीत कोणत्या धातूच्या आयन्सचे आणि क्षारांचे प्रमाण किती असावे, पाण्यात जिवाणूंचे प्रमाण शून्य असावे ह्यासारख्या बाबी स्पष्टपणे सांगितल्या आहेत. पिण्याचे पाणी हा जीवनसत्त्वांचा म्हणजे व्हिटॅमिनचा उद्‌गम नसतो. त्यामुळे आर. ओ. तर सोडाच पण जगाच्या पाठीवरील कोणत्याही पाण्याने व्हिटॅमिन 'डी'चीच नव्हे तर इतर कोणत्याही जीवनस्तवाची कमतरता निर्माणही होत नाही आणि दूरही होत नाही!

IS 10500 2012 या प्रणालीप्रमाणे भारतीय मानक मंडळ (इंडियन ब्युरो ऑफ स्टँडर्ड्स) यांनी ठरवलेले पिण्याच्या पाण्याचे निकष कसे असावेत हे सोबतच्या तक्त्यामध्ये दाखवले आहे.

तक्ता क्रमांक १ – पिण्याच्या पाण्याचे निकष (IS 10500 2012)

पाणी शुद्धीकरणाच्या ज्या विविध पद्धती वापरल्या जातात त्यात गाळणे, तुरटी फिरवणे, उकळणे, क्लोरिनेशन व उर्ध्वपातन या पारंपरिक पद्धतींबरोबर रिव्हर्स ऑस्मोसिस, अल्ट्राव्हायोलेट किरणांचा वापर आणि ओझोनायझेशन यासारख्या नावीन्यपूर्ण पद्धतींचादेखील समावेश करण्यात आला आहे. पाणी गाळण्यासाठी विविध प्रकारची आकर्षक स्वरूपातील मांडणी असलेली उपकरणे बाजारात उपलब्ध होत आहेत. त्यातील लोकप्रिय असलेली उपकरणे ही कँडल फिल्टर म्हणून प्रसिद्ध आहेत. पण या कँडल दर १५–२० दिवसांनी घासून स्वच्छ केल्या नाहीत तर मात्र आरोग्याला अपायकारक असतात. कारण त्यावर फंगल म्हणजे बुरशीसदृश जीवांची वाढ होऊन त्यांची विषे गाळलेल्या पाण्यात येण्याची शक्यता असते. तसेच, ही कँडल ठरावीक काळानंतर बदलण्याची गरज असते. अशा उपकरणांच्या नळाभोवतीसुद्धा काही वेळा बुरशी वाढताना दिसते. त्यामुळे उपकरण घेण्यासाठी सोयीचे वाटत असले तरी त्याची निगा राखणे जिकिरीचे पण गरजेचे असते. अल्ट्राव्हायोलेट किंवा अतिनील किरणांवर आधारित जी उपकरणे बाजारात मिळतात त्यातील अल्ट्राव्हायोलेट उद्‌गम नळी ठरावीक काळानंतर बदलावी लागते कारण तिची परिणामकारकता कमी होत जाते. काही फिल्टर हे जैव पटलावर किंवा काही विशिष्ट रासायनिक पटलांवर आधारित असतात. ह्या पटलांची आर्युमर्यादा कालबद्ध असल्यामुळे जुन्या पटलांच्या जागी नवीन पटल बसवणे आवश्यक असते. आपल्याकडे एवढ्या बारकाईने त्याकडे लक्ष दिले जात नाही आणि मग हे फिल्टर असून नसल्यासारखे असतात!

साखरेचा पाक एका बाजूला आणि पाणी दुसऱ्या बाजूला ठेवून मध्ये एक विशिष्ट पटल अंतरपाटासारखे ठेवले तर त्या पटलातून पाणी पाकाकडे वाहते व पाकाची संपृक्तता कमी होऊ लागते. या प्रक्रियेस परासरण किंवा ऑस्मोसिस असे म्हणतात. वनस्पतींची पाने या प्रक्रियेने पेशींमधील जास्तीचे पाणी हवेत सोडतात. साखरेच्या पाकावर आपण दाब दिला तर मात्र पाकात असलेले पाणी दुसऱ्या बाजूला म्हणजे पाण्याच्या बाजूला वाहू लागते. या प्रक्रियेस रिव्हर्स ऑस्मोसिस किंवा उलटी परासारणक्रिया म्हणतात. पाणी शुद्धीकरणासाठी या प्रक्रियेचा वापर केला जातो. या प्रक्रियेत क्षारयुक्त पाणी शुद्ध केले जाते. जिथे टँकर्सनी पाणी पुरवले जाते ते पाणी बोअरवेलचे असले तर क्षारयुक्त असण्याची दाट शक्यता असते. स्टीलच्या भांड्यांवर जर क्षारांचे डाग दिसत असतील तर ते पाणी क्षारयुक्त आहे असे सहजपणे ओळखता येते. हे पाणी आरोग्यासाठी घातक असू शकते. या पाण्यासाठी रिव्हर्स ऑस्मोसिस ही योग्य प्रक्रिया ठरते. पण जिथे महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या मार्फत नदीतील किंवा तलावातील गोड्या पाण्याचा पुरवठा केला जातो तिथे मात्र रिव्हर्स ऑस्मोसिस वापरणे अजिबात योग्य नसते. कदाचित अशा ठिकाणी ते युनिट घरात शोभून दिसेलही, पण आपल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा तो जाहीर पंचनामा असतो! ज्या ठिकाणी हे संयंत्र बसवणे आवश्यक असेल तिथे ते जरूर बसवावे. ह्याचे

| क्रमांक | गुणधर्म | प्रमाणित मात्रा |
|---|---|---|
| १ | रंग | रंगहीन (हेझन स्केलवर ५) |
| २ | चव | स्वीकारार्ह |
| ३ | सामू | ६.५ ते ८.५ |
| ४ | गढूळपणा (टरबिडीटी) | नितळ/पारदर्शक |
| ५ | विद्राव्य पदार्थ (टोटल डीझॉलव्हड सॉलिडस) | ५०० मिलिग्रॅम प्रति लिटर |
| ६ | अॅल्युमिनियम | ०.०३ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| ७ | बेरीयम | ०.०७ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| ८ | बोरॉन | ०.५ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| ९ | कॅल्शियम | ७५ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| १० | क्लोराईड | २५० मिलिग्रॅम प्रति लिटर |
| ११ | क्लोरामाईन | ४ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| १२ | तांबे (कॉपर) | ०.०५ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| १३ | फ्ल्यूओराईड | १.० मिलिग्रॅम प्रति लिटर |
| १४ | मुक्त क्लोरीन अंश | ०.२ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| १५ | लोखंड (आयर्न) | ०.३ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| १६ | मॅग्नेशियम | ३० मिलिग्रॅम प्रति लिटर |
| १७ | मॅंगनीज | ०.१ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| १८ | नायट्रेटस | ४५ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| १९ | सेलेनियम | ०.०१ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| २० | फिनोलिक संयुगे | ०.००१ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| २१ | सल्फेट | २०० मिलिग्रॅम प्रति लिटर |
| २२ | सल्फाईड | ०.०२ मिलिग्रॅम प्रति लिटर |
| २३ | कठीणपणा (कॅल्शियम कार्बोनेट) | २०० मिलिग्रॅम प्रति लिटर |

पाणी आरोग्याला घातक असते कारण त्यातील क्षारांचे प्रमाण शून्य असते असे जे सांगितले जाते, त्यात फारसे तथ्य नसते. कारण आपण पाण्यातून मिळणाऱ्या क्षारांवर अवलंबून नसतोच, आहारातून आपल्याला क्षारांचा पुरेसा पुरवठा होत असतो.

मिनरल पाणी जे प्लास्टिकच्या बाटल्यांमधून सर्रास विकले जाते त्याचीदेखील आपल्या रोजच्या जीवनात आवश्यकता नसते. चांगले पाणी वाया घालवणे आणि प्लास्टिक बाटल्यांमुळे पर्यावरणाला धोका निर्माण करणे ह्या दोन नकारार्थी बाबी यातून साधल्या जातात! पाण्याच्या बाटलीतील पाणी अर्धवट पिऊन बाटली तशीच सोडून देणारे कितीतरी महाभाग आपल्याला रोज ठिकठिकाणी भेटतात! ते अर्धेअधिक पाणी उष्टे झाल्यामुळे कुणी पिण्यासाठी वापरत नाही आणि ते ओतून दिले जाते! प्लास्टिकच्या बाटलीबंद पाण्यावर आपणच बंदी घातली पाहिजे, म्हणजे पाण्याचे आणि पर्यावरणाचे नुकसान काही प्रमाणात तरी कमी करता येईल.

काही खाजगी कंपन्या ऑक्सिरीच पाणी विकतात! पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण दर लिटरला जास्तीत जास्त ८ ते ९ मिलिग्राम एवढे असते. प्यायच्या पाण्यात ते असावेच लागते तरच ते पिण्यायोग्य असते. यापेक्षा जास्त ऑक्सिजन पाण्यात विरघळणे अधिक दाबाखालीच शक्य असते. त्यामुळे बाटलीत पाणी भरताना दाबाखाली त्यात जास्तीचा ऑक्सिजन विरघळवला तरीदेखील पाण्याच्या बाटलीचे झाकण उघडताच तो जास्तीचा ऑक्सिजन हवेत निसटून जातो! आणि मुळात आपण पाणी पितो ते ऑक्सिजनसाठी नसून पाणी म्हणून आवश्यक असते. पाण्यातला ऑक्सिजन हा मासे श्वसनासाठी वापरतात, आपण नाही! त्यामुळे ऑक्सिरिच पाणी हा जाहिरातीसाठी चांगला प्रकार असला तरी वास्तवात तसे काही नसते! पाण्यात ऑक्सिजन योग्य पातळीत म्हणजे लिटरमागे ८-९ मिलिग्राम आहे, म्हणजे ते पाणी पिण्यासाठी योग्य आहे एवढाच महत्त्वाचा अर्थ माहीत हवा. त्यापेक्षा कमी असेल तर पाणी पिण्यासाठी अयोग्य असते. जास्त असेल तर तो जास्त आणण्यासाठी दाब द्यावा लागतो आणि पुन्हा त्याचा विशेष असा काही उपयोग नाही, हे लक्षात घ्यावयास हवे.

पाणी शुद्ध करण्यासाठी वर म्हटल्याप्रमाणे अनेक पद्धती उपलब्ध आहेत. त्या सर्व पद्धतींमध्ये पाणी उकळून पिणे ही सर्वात सुरक्षित पद्धत आहे. जसजशी लोकसंख्या वाढत आहे, तसतशी पाण्याची गरज वाढतच जाणार आहे. विशेषतः शहरी

भागामध्ये ही लोकसंख्या वाढण्याचे प्रमाण अधिक आहे, कारण ग्रामीण भागातून पोट भरण्यासाठी स्थलांतर करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. नागरी वस्तीत काँक्रीटची जंगले तयार होत आहेत. या सर्व भागांची पाण्याची गरज भागवणे स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या आवाक्याबाहेर जात आहे. त्यामुळे बोअरवेल किंवा नलिकाकूप विहिरी खणून ह्या गरजा भागवण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यामुळे भूजल पातळी खोल खोल जात आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचे प्रम ाण नगण्य आहे. त्यामुळे पाणी ही समस्या अक्राळविक्राळ रूप धारण करत आहे.



हल्ली प्रत्येक घरात वाहन आले आहे. दुचाकी किंवा चारचाकी वाहनांसाठी पाण्याची सोय करावी लागते. वाहने धुण्यासाठी अनेक ठिकाणी मुक्तहस्ताने पिण्याचेच पाणी वापरले जाते व कुणी त्याला हरकत घेतली तर अरेरावीची उत्तरे दिली जातात. पैसा असेल तर आम्ही काहीही करू शकतो ह्या भ्रमात राहाणारी ही माणसे नैसर्गिक स्त्रोतांचा केवढा अपमान करत असतात हे त्यांच्या लक्षातदेखील येत नाही. वास्तविक वाहन धुताना पाणी कमी वापरणे, ओल्या फडक्याने वाहन पुसणे, शिळे पाणी ओतून देण्याऐवजी त्याचा वापर करणे, पावसाळ्यात छतावरून वाहाणाऱ्या पाण्याचा वापर त्यासाठी करणे यासारख्या उपायांमुळे आपण पिण्याच्या पाण्याची बचत मोठ्या प्रमाणावर करू शकतो. पावसाळ्यात छतांवर जमा होणारे पाणी जमिनीत मुरवून नलिकाकूप विहिरीच्या माध्यामातून वर्षभर वापरता येते पण त्यासाठी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. आजकाल रेन वॉटर हार्वेस्टिंग हा परवलीचा शब्द झाला असला तरी यशस्वीपणे केलेल्या योजनांची संख्या मात्र हाताच्या बोटांवर मोजता येण्याइतकीही नाही ही वस्तुस्थिती आहे. असे किती पाणी आपण पावसाच्या माध्यमातून जमिनीत मुरवू शकतो हे पाहिले तर आपण किती पाणी वाया घालवत आहोत हे लक्षात येईल. समजा एखाद्या इमारतीची गच्ची ३० मीटर X ३० मीटर असेल ते क्षेत्रफळ ९०० चौरस मीटर एवढे असते. मुंबईत साधारणपणे २००० मिलीमीटर म्हणजे २ मीटर पाऊस पडतो असे मानले तर पावसाळ्यात एकूण १८०० घनमीटर म्हणजे १८ लाख लिटर पाणी त्या गच्चीवरून वाहत असते. हे पाणी आपल्याला मोठ्या नळावाटे जमिनीत मुरवून मग नलिकाकूप विहिरीच्या माध्यमातून कितीतरी महिने वापरता येईल. आम्ही नगरला राहत असताना सतत दुष्काळी भाग म्हणून प्रसिद्ध असलेल्या या शहरात केव्हा पाऊस पडे तेव्हा आम्ही पन्हाळ्यातून पडणाऱ्या पाण्याने घरातील सारी भांडीकुंडी भरून ठेवायचो व दोन तीन दिवस तरी पाणी भरण्याचा त्रास वाचायचा! हा प्रकार पावसाळ्यात किमान ४-५ वेळा तरी चालायचा व १० ते १५ दिवसांचे पाणी साऱ्या नगरवासियांना या माध्यमातून मिळायचे. मुंबईत नगरच्या तुलनेने दहा पट तरी पाऊस पडतो. म्हणजेच अर्ध्या वर्षाचे पाणी आपण पावसापासून साठवून वापरू शकतो. त्यासाठी नियोजन हवे आहे.

शहराच्या सीमा ओलांडून वाढणाऱ्या नागरी वस्त्यांना टँकरने जो पाणी पुरवठा होत आहे, त्याची गुणवत्ता भयावह आहे. त्यात क्षारांचे प्रमाण कितीतरी अधिक आहे. अनेक ठिकाणी पाण्याचे पाइप अशा क्षारयुक्त पाण्यामुळे गंजत किंवा झिजत आहेत. कपड्यांची धुलाईयंत्रे खराब होत आहेत. पाण्याचे फिल्टर सतत बदलण्याची पाळी अनेक नागरिकांवर आलेली आहे. त्यातच गृहनिर्माणसंस्थांच्या पाण्याच्या टाक्या स्वच्छ करण्याकडे कमालीचे दुर्लक्ष होत आहे. पाणी चोवीस तास पुरवले तर पाण्याचा वापर खूप कमी होतो, असा अनुभव आहे. मात्र तसे होत नाही. त्यामुळे घरात पाणी साठवून ठेवले जाते. नळाला पाणी आले की बिनदिक्कतपणे आधी भरून ठेवलेले पाणी ओतून दिले जाते! त्यात आपण काही चुकीचे करत आहोत, हे अनेकांच्या गावीही नसते. एकविसाव्या शतकात आपल्या देशात ही परिस्थिती आहे, ही बाब खरे तर लाजिरवाणी आहे, पण सांगणार तरी कुणाला? लोकांच्या सद्सद्विवेकबुद्धीला साद घालण्याशिवाय आपण काही करू शकत नाही. शाळाशाळातून विद्यार्थ्यांना ह्या बाबतीत जागरूक करत राहिले, तर काही आशा आहे!

शेवटी माणूस म्हणून आपण काय करत आहोत, निसर्गातील जीवसृष्टीला आवश्यक असलेल्या या महत्वाच्या घटकाच्या संवर्धनासाठी काही करत आहोत का हे पाहणे प्रत्येक सुशिक्षित आणि सुसंस्कृत नागरिकाचे कर्तव्य आहे. पाण्याचा वाचवलेला एक थेंब एक जीव वाचवू शकतो हे ध्यानात ठेवले पाहिजे.

**– शरद काळे**
sharadkale@gmail.com



**प्रकाश दुधलकर**


# विनया मॅथ्यू

**एकेकाळी** फोटोग्राफी हा प्रांत केवळ पुरुषांचा म्हणून ओळखला जात होता. मात्र आज अनेक महिलांनीही या क्षेत्रात चांगलाच जम बसवला आहे. होमाई व्यारावाला या भारताच्या पहिल्या महिला छायाचित्रकार. त्यांनी १९३८ पासून १९७० पर्यंत या क्षेत्रात अथक कामगिरी केली. त्यांचे फोटो देशविदेशातील अनेक वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले आहेत. त्यांना २०११ मध्ये पद्मविभूषण हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. त्याच काळात कोलकाता येथील देवालीना मजुमदार आणि मनोबिना रॉय या भगिनींनीदेखील कलात्मक फोटोग्राफीच्या क्षेत्रात बऱ्यापैकी नाव कमवले होते, पण दुर्दैवाने त्यांचे फार कमी काम आज उपलब्ध आहे. सद्यस्थितीत भारतात अनेक महिला फोटोग्राफर उत्तम प्रकारे काम करत आहेत. त्यातील बऱ्याच महिलांनी फोटोग्राफीच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत जागतिक स्तरावरदेखील आपले नाव कोरले आहे. कलात्मक फोटोग्राफी या क्षेत्रात आपल्या कामाने वेगळा ठसा उमटवणाऱ्या विनया मॅथ्यूज ह्या एक. केवळ फोटोग्राफीच्या छंदासाठी वेळ देता यावा म्हणून बँकेतील चांगल्या पगाराची नोकरी सोडून पूर्णवेळ फोटोग्राफीसाठी वाहून घेणारी एक कलाकार म्हणून त्यांच्याकडे बघता येईल. त्यांच्या छायाचित्रांना भारतात तसेच भारताबाहेरील अनेक स्पर्धांमध्ये विविध पारितोषिके मिळालेली आहेत. ज्यांनी फोटोग्राफीच्या प्रसारासाठी अगदी सोप्या भाषेत वेगवेगळ्या वृत्तपत्रांत तसेच मासिकांतदेखील लेखन केले आहे.



विनया मॅथ्यू

श्रीमती विनया मॅथ्यू या मूळच्या कोकणातल्या, कणकवलीच्या. त्यांचे वडील सूर्यकांत अरदकर. घरी कलेची कोणतीही पार्श्वभूमी नाही, पण त्यांना लहानपणापासून चित्रकलेची आवड होती. कॉलेजमध्ये शेवटच्या वर्षाला असतानाच त्यांना स्टेट बँकेमध्ये नोकरी मिळाली. एका मित्राच्या मदतीने त्यांनी एक सेकंड हॅन्ड कॅमेरा खरेदी केला आणि फोटो काढण्यास सुरुवात केली. पण फोटोग्राफीचे ज्ञान काहीही नव्हते. त्यांनी मनोहर देसाई यांच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फोटोग्राफी येथे फोटोग्राफीचा बेसिक कोर्स केला, तेव्हाच त्यांना फोटोग्राफीचे रीतसर शिक्षण मिळाले. देसाईसरांच्या अप्रतिम शिकवण्यामुळे त्यांना फोटोग्राफीतील मर्म हळूहळू कळत केले, तसेच त्यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळे फोटोग्राफीतील बारकावे स्पष्ट होत गेले आणि त्या अक्षरशः फोटोग्राफीच्या प्रेमातच पडल्या. त्याच वेळेस त्या बँकेतील प्रमोशनच्या परीक्षा पास झाल्या व आता लवकरच प्रमोशन ही मिळणार होते. परंतु त्या फोटोग्राफीच्या एवढ्या प्रेमात पडल्या की नोकरी सोडून फक्त फोटोग्राफी करावी असा त्यांनी ध्यास घेतला. अनेकांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. शेवटी देसाईसरांनीपण त्यांना आधी नोकरी व नंतर फोटोग्राफी करण्याचा सल्ला दिला व त्यांनी प्रमोशन स्वीकारून नोकरी पुढे चालू ठेवली. त्यांच्या पतीच्या बदलीमुळे मात्र त्यांना मुंबई सोडून चेन्नईला जावे लागले व त्याचवेळी त्या फोटोग्राफीपासूनही दूर गेल्या. नवीन जागा, नवीन ब्रांच, भाषेचा मोठा प्रॉब्लेम, घर सांभाळणे या सर्वात फोटोग्राफी करणे त्यांना शक्य होत नसे. वर्षाला चार चांगले फोटो काढणेही जमत नव्हते. जिवाची खूप तडफड



**अरूपाथु मूवर थिरूव्हिझा फेस्टिव्हल**

खूप आवड असल्यामुळे आता त्यांना गर्दीची ठिकाणे जास्त आवडू लागली. सुरुवातीची दोनेक वर्षे फोटोग्राफीच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री विवेकानंद व्ही व्ही यांच्याबद्दल त्या कृतज्ञता व्यक्त करतात.

२००४ मध्ये त्यांनी फोटोग्राफीचा कोर्स केला, तेव्हा आठ महिने त्या मुंबईतील फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडियाच्या सभासद होत्या. तिथे अनेक सभासदांची कामे त्यांना बघता आली. दिवंगत फोटो जर्नालिस्ट अनिला भारतीया यांच्यासोबत जैसलमेर येथे वर्कशॉपला गेल्या असताना त्यांची ओळख प्रसिद्ध फोटोग्राफर शिवजी जोशी यांच्याशी झाली. शिवजी यांनी ज्याप्रकारे मार्गदर्शन केले त्यांनी त्या खूप प्रभावित झाल्या. अकरा वर्षांनंतर त्यांनी परत फोटोग्राफी सुरू केली तेव्हा पुन्हा शिवजी जोशी यांच्याशी संपर्क साधला व तेव्हापासून ते त्यांचे गुरू आहेत. त्यांनी मार्च २०१८ मध्ये शिवजी जोशींच्या गुरुकुलमध्ये बेसिक फोटोग्राफीचा कोर्स केला. जिथे फोटोग्राफीचे पायाभूत तत्त्वज्ञान त्यांना शिकवण्यात आले. लाईन, लाईट, व्हिजन, कंपोझिशन आणि व्हिज्युअलायझेशन हे पाच मंत्र त्यांना शिवजींकडून मिळाले. २०१५ मध्ये त्या फेडरेशन ऑफ इंडियन फोटोग्राफीच्या सभासद झाल्या तेव्हापासून त्यांनी देशविदेशातील फोटो स्पर्धांमध्ये भाग घेऊन अनेक प्रावीण्य प्रमाणपत्रे प्राप्त केली.

त्यांना दि इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फोटोग्राफिक आर्ट,

व्हायची. मात्र फोटोग्राफीच्या संपर्कात राहण्यासाठी त्या ब्रिटिश काऊन्सिल लायब्ररीच्या सभासद झाल्या व तिथून फोटोग्राफीवरची वेगवेगळे पुस्तके आणून खूप वाचन केले. त्यांच्या लक्षात आले की केवळ पुस्तकी ज्ञान प्रत्यक्ष कामाची जागा घेऊ शकत नाही. त्यासाठी सराव हाच महत्त्वाचा घटक आहे. मात्र घरी वेगवेगळ्या कारणासाठी पैशांची गरज होती. त्यामुळे नोकरी सोडणे शक्य नव्हते. अशी अकरा वर्षे गेली. त्यांना डेप्युटी मॅनेजरच्या पदावरून मुख्य मॅनेजरच्या पदावर पदोन्नती मिळाली. आता बँकेमध्ये ३१ वर्षे नोकरी झाली होती आणि त्यांनी निर्णय घेतला की आता नोकरीतून निवृत्त व्हायचे. घरच्या लोकांचा व वडिलांचा विरोध होता, पण त्यांच्या पतीने त्यांना साथ दिली. शेवटी २००४ मध्ये त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. नोकरी करत असतानाच त्यांनी मुलींच्या अनाथाश्रमासाठी काम करत असलेल्या एका सेवाभावी संस्थेसोबत शेवटची पाच वर्षे काम केले, पण त्या तिथे रमल्या नाहीत. त्या तिथून बाहेर पडून त्यांनी पूर्णवेळ फोटोग्राफीला वाहून घेतले.

पहिली दोन वर्षे त्यांनी केवळ चेन्नईमध्येच फोटोग्राफी केली. त्यांना श्री विवेकानंद व्ही व्ही नावाचे एक वयस्कर मित्र भेटले. त्यांनी त्यांना चेन्नईमध्ये खूप फिरवले. सर्व उत्सवांमध्ये ते त्यांना घेऊन गेले. काही काही उत्सवात लाखोंनी लोक एकत्र येतात. यापूर्वी मुंबईतील गर्दीचा भाग न झालेल्या पण हातात कॅमेरा आल्यापासून व फोटोग्राफीची



**कान्हा नॅशनल पार्क**



**टू विचेस – स्मोकी छायाचित्र**

बेल्जियमकडून २०१६ मध्ये AFIAP, २०१७ मध्ये फेडरेशन ऑफ इंडियन फोटोग्राफीकडून FFIP, २०१८ मध्ये दि इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ फोटोग्राफिक आर्टकडून EFIAP, २०२० मध्ये एशिया फोटोग्राफर युनिट करून गोल्ड एक्झिबिटर, २०२१ मध्ये फेडरेशन ऑफ इंडियन फोटोग्राफीकडून MFIP, २०२१ मध्येच फोटोग्राफिक सोसायटी ऑफ अमेरिका यांच्याकडून PPSA इत्यादी उपाधी प्राप्त झाल्या आहेत.

विनया यांनी फोटोग्राफीच्या विविध स्पर्धांसाठी ज्युरी मेंबर म्हणूनदेखील काम केले आहे. तसेच स्पाइन फाऊंडेशनच्या पहिल्या कॉपी टेबल बुकमध्ये त्यांचे दोन फोटोग्राफ प्रकाशित झाले आहेत. त्यांनी २०२१ मध्ये, फोटोग्राफी अगदी सोप्या शब्दात या नावाने तरुण भारत सिंधुदुर्ग या वर्तमानपत्रात सलग तेरा आठवडे साप्ताहिक स्तंभ लिहिला आहे. विनया यांचे तीन लेख FIP च्या 'व्ह्यूफाइंडर' या मासिकात प्रकाशित झाले आहेत. पहिला लेख छोट्या बगळ्यांच्या घरटी व प्रजननप्रवासावर होता. चेन्नई येथील त्यांच्या परिसरातील सारंगागारातील छोट्या बगळ्यांच्या जीवनपद्धतीचा अभ्यास करून त्यांच्या घरटी तयार करण्यापासून अंड्यातून पिले बाहेर येईपर्यंत व उडून स्वतंत्रपणे आकाशात झेप घेण्यापर्यंतचा टप्प्याटप्प्याने होणारा प्रवास त्यांनी कॅमेराद्वारे सुंदर प्रकारे टिपला आहे, सोबत सुंदर माहितीही दिली आहे.

दुसरा लेख 'अनयुझवल लाइफ' हा गाडिया लोहार यांच्या जीवनावर होता. गाडिया लोहार या भटक्या जमातीवर व त्यांच्या जीवनक्रमावर लक्ष केंद्रित करून त्यांच्या दैनंदिन कष्टप्रद जीवनातील एक एक प्रसंग त्यांनी चित्रित केला आहे व त्याकरता त्या परिवाराशी एकरूप होऊन त्यांच्या दैनंदिन हालचाली सुंदर रीतीने कॅमेऱ्यामध्ये बंदिस्त केल्या आहेत. याकरता संबंधितांशी संपर्क साधून त्यांच्या मनामध्ये शिरण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. आणि तिसरा लेख हा 'सोल ऑफ इंडिया – अ व्हीलेज' हा रत्नागिरीजवळील चांदोर गावावर होता. कोकणातील ग्रामीण जीवन व त्यांचे सण आणि उत्सव व त्यांच्या रोजच्या जगण्यातील संघर्ष या लेखात सुंदर रीतीने मांडला आहे. त्याला छायाचित्रांची जोड असल्याने हा लेख फारच बोलका झालेला आहे. एखाद्या गोष्टीच्या मागे लागून त्याची इत्थंभूत माहिती मिळवणे व त्यासाठी आवश्यक ते कष्ट घेण्याची व झोकून देण्याची त्यांची वृत्ती खरच कौतुकास्पद आहे. अगदी अलीकडे, म्हणजे जानेवारी २०२३च्या शेवटच्या आठवड्यात, त्यांचा 'फोटोग्राफिक सोसायटी ऑफ अमेरिकाच्या (PS's) भारतातील पहिल्या प्रिंट प्रदर्शनाचा भाग होता. ते ३३ देशांतील १५२ छायाचित्रकारांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन होते, त्यापैकी त्या एक होत्या.

या क्षेत्रात नव्याने येणाऱ्याबद्दल त्या म्हणतात, ''हल्लीची मुलं जन्मताच टेक्नॉलॉजी बरोबर घेऊन जन्माला आली आहेत. दिवसेंदिवस मोबाइल कॅमेरा एवढे सुपिरियर कॉलिटीचे बनत आहेत की मोबाइल कॅमेरा आणि SLR नं काढलेल्या फोटोमध्ये फरक करणं अशक्य होतं. आपण आयफोनच्या जाहिरातींची मोठमोठी होर्डिंग पाहिली तर आपल्या लक्षात येईल की ती केवळ फोनमध्ये असणाऱ्या कॅमेऱ्याचीच जाहिरात असते. मथितार्थ हल्ली प्रत्येकाच्या हातात कॅमेरा असतो. डिजिटल फोटो काढणं फारच स्वस्त झालं आहे. त्यामुळे कोणालाही या प्रांतामध्ये यश मिळवायचं असेल तर प्रचंड मेहनत करायला पाहिजे, हे मात्र नक्की. कदाचित हे जुन्या विचारांचं वाटेल, पण माझ्यासाठी फोटोग्राफीचं सखोल ज्ञान असणं हे कुठल्याही यशस्वी फोटोग्राफरसाठी अत्यंत आवश्यक आहे. पोस्ट प्रोसेसिंग म्हणजे फोटोवर काम करण्यात पारंगतता हेही त्यात आलंच. आणि सर्वात शेवटी मला माझ्या गुरूंचं, शिवजींचं, वाक्य सांगण्यासारखं वाटतं की चांगला फोटोग्राफर होण्यापूर्वी चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न जरूर करा. नेचर फोटोग्राफर असाल तर निसर्गाची काळजी घ्या, स्ट्रीट फोटोग्राफर असाल तर ज्यांचा फोटो काढाल त्यांच्या भावनांचा आदर करा. चुकीचं वागून, एका फोटोला खूप लाइक घेण्यापेक्षा कायम लोकांच्या लक्षात राहील असा फोटोग्राफर बनण्याचा प्रयत्न करा.''

सतत नावीन्याचा शोध घेणे व त्याकरता आवश्यक ते कष्ट घेणे हा विनया यांचा स्वभाव आहे. चेन्नई परिसरातील फोटोग्राफीसोबतच देशातील वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन फोटोग्राफी करण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांच्या मते चांगला फोटोग्राफ तोच ज्याबद्दल दुसऱ्यांकडून वेगळे काही सांगायला नको. फोटोग्राफ स्वतःच प्रेक्षकांशी बोलला पाहिजे. विनया यांनी यापूर्वी वेगवेगळे विषय हाताळले असले तरी आता विशिष्ट विषय घेऊन त्याची फोटोग्राफी करण्याचा त्यांचा मानस आहे.


**– प्रकाश दुधलकर**

dudhalkar@gmail.com



विजयराज बोधनकर

# दगडाला बोलतं करणारे साधक

**दगडाला** बोलतं करण्याचं मन आणि बुद्धी फक्त शिल्पकाराला नियतीनं प्रदान केली आहे. कठीण अशा दगडाला तो तलम बनवू शकतो, दगडातून ममतेची मूर्ती जन्माला घालू शकतो, दगडाला हसवतो, रडवतो किंवा दगडाला क्रूर बनवतो. शिल्पकराची छिन्नी आणि हातोडा तेव्हा कवितेसारखा हळवा किंवा बंडखोरसुद्धा बनतो. क्रूर पशू निर्माण करतांना मनात त्याला काही काळ पशूच्या क्रूरतेसोबत प्रवास करावा करतो.. कलावंताच्या मनाला विषयासोबत चालताना मनाच्या अवस्थासुद्धा अमिबासारख्या बदलवाव्या लागतात आणि पुन्हा मूळ स्वभावाकडे त्याला यावे लागते. हे एखाद्या अभिनेत्याच्या भूमिकेसारखे असते. शिल्पकाराला शिल्प घडवताना गणिताचा आणि भावनिक धागा पकडून काम करावे लागते. शिल्पकार म्हणजे सतत कठीण काळाला समोरा जाणारा योद्धा असतो, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अशा तीन शिल्पकारांचं जीवन इथे साकारलं आहे.



**एनटवॉन कॉयसेवॉक्स (१६४०)**

त्यानं केवळ वयाच्या सतराव्या वर्षी अशी शिल्पं घडवली ज्यांचं मोल एखाद्या प्रस्थापित कलावंताच्या बरोबरीचं असावं. तो काळ असा होता, की मुलांचे सुप्त गुण आणि त्याचा कल दिसला की त्याच्या जडणघडणीला प्रारंभ व्हायचा. जसं झाड तसं फूल तसाच सुगंध ही शैक्षणिक वृत्ती असल्यामुळे अवघ्या सतराव्या वर्षी एनटवॉन व्यावसायिक शिल्पकार बनला. अफाट ऊर्जा असलेल्या बालपणातच क्रियाशीलतेचा महायोग कामातून सिद्ध व्हायचा. अशा या काळात म्हणजेच २९ सप्टेंबर



**एनटवॉन कॉयसेवॉक्सची शिल्पाकृती**

१६४० मध्ये एनटवॉन कॉयसेवॉक्स याचा जन्म झाला. तो स्पॅनिश शिल्पकार होता.


एनटवॉन अंगभूत शिल्पकला फ्रेंच शिल्पकार लुइस लिर्रबर्टकडे प्राथमिक धडे गिरवले. पुढे त्यानं रोमन शिल्पकलेचा अभ्यास करून त्याची प्रतिकृती करत करत शिल्पकलेचा पाया पक्का आणि नक्की केला. एकूणच परिपूर्ण कलाप्राप्त काम जाणकाराच्या चटकन लक्षात येतं. बिशप ऑफ स्ट्रासबर्ग ह्यांनी एनटवॉनला आपलं विशाल घर सजवण्याचं पूर्ण देऊ केलं आणि ते काम त्यानं पूर्ण करून दाखवलं. त्यानंतर १६७१ मध्ये सवन (फ्रान्स) या स्थळी काम करण्यात वेळ

व्यतीत केला. पण, दु:खाची बाब अशी की या विशाल घराला आग लागली. आगीत घर नष्ट झालं. एनटवॉन निराश झाला आणि त्याच मनानं तो पॅरिसला परतला. कामाचा दर्जा हळूहळू अत्यंत लक्षणीय होत गेल्यामुळे त्यानं राजाचा दरबारी चित्रकार चार्ल्स लेब्रनचा अर्धपुतळा बनवला व याच अर्धपुतळ्यानं त्याला रॉयल ॲकॅडमीमध्ये प्रवेश मिळवून दिला.

त्यानं वर्षभरात त्याचा गुरू लुई लिर्बर्ट याची भाची क्लाड बौद्धिकंद हिच्याशी लग्न केलं. दोनाचे चार हात झाल्यानंतर जबाबदाऱ्या वाढल्या आणि त्याला ज्यूल्स हारडूईन मानसारर्टस रॉयल चॅपल या प्रार्थनास्थळाच्या दर्शनी भिंतीवर त्याला (शिल्पं साकारण्याचं) महत्त्वाचं काम देण्यात आलं. त्याच्या कलाप्रवासात त्यानं अनेक अर्धपुतळे बनवले. त्याचं ते बलस्थान होतं. त्याच्या शिल्पांमध्ये व्यक्तीची छबी, व्यक्तिमत्त्व पूर्णपणे उतरत असे. त्यात त्यांचा हातखंडा होता.

चार्ल लेब्रननं यांनी जे अधिकृत कलांचे समन्वय जोडून ठेवले होते, ते सारे दुवे एनटवॉनच्या उपयोगी ठरले. १६७७ ते १६८५ या काळात लुईस चौदावा या राजाने एनटवॉनला खूप मोठ्या प्रमाणात डेकोरेशनच्या कामासाठी करारबद्ध केलं होतं. इथेच त्यानं अनेकांचे अर्धपुतळे निर्माण केले. याचबरोबर त्यानं भरपूर दफनस्मारकंही तयार केली. तो काळ कलेच्या दृष्टीनं कलासक्त असल्यामुळे कला सर्वत्र स्थापन होत होती. याच प्रेरणेमुळे पाश्चिमात्य देशांत कलेची सकारात्मक प्रवाही जडणघडण मोठ्या प्रमाणावर होत होती. त्यातलाच एक एनटवॉन हा शिल्पकार. अशा या शिल्पकारानं ज्याला उपजत कलेची जाणीव होती, ज्यानं आयुष्य शिल्पासाठी दिलं १० ऑक्टोबर १७२० रोजी या मायावी जगाचा निरोप घेतला.

**जीन कारपीऑक्स (१८२७)**



व्यावसायिकता आणि कलात्मकता याचा मेळ कधीच बसत नसतो. तो अस्तित्वात आणावा लागतो. अनेक कलावंत कलेची निर्मिती करतात. आर्थिक व्यवहाराला महत्त्व देत नाही. पैसा हा मनाला आधार देतो. निर्मितीच्या काळात मनाला स्थिरता देतो. त्यामुळेच अव्वल निर्मितीचा प्रवास सुखकर होत राहतो. शिल्पकारानं जितकं महत्त्व कलेला दिलं तेवढंच व्यावसायिक रचनेला दिलं. मोठमोठी शिल्पं कालांतराने कासवाच्या गतीनं विकली जायची तीच शिल्पं छोट्या आणि खिशाला परवडेल अशा स्वरूपाची केल्यामुळे समाजातल्या सामान्यवर्गानंसुद्धा त्याला आपल्या घरात स्थान दिलं आणि त्या शिल्पकारानं आर्थिक उंची वाढवत नेली. शिल्पप्रसारसुद्धा होत गेला. अशा बुद्धिमान शिल्पकाराचं नाव आहे जीन कारपीऑक्स. याचा जन्म फ्रान्समधल्या वॅलनसीननेस इथे ११ मे १८२७ रोजी झाला. वडील गवंडी होते. घरची परिस्थिती सामान्य होती. पण जीनच्या अंगी मुळातच शिल्पकला उपजत असल्यामुळे तो या क्षेत्रात आला नी दिव्य घडवून आणलं.

जीन हा अठराव्या शतकातला एक अग्रगण्य शिल्पकार होता. प्रारंभीच्या काळात त्यानं फ्रँनक्रॉईस रूड या शिल्पकाराकडे शिकाऊ उमेदवारी केली. याच काळात त्याने मोठी साधना करून शिल्पकलेला उंचीवर नेत राहिला. १८५४ साली रोममधली प्रीक्स दे रोम ही पदवी त्याला मिळाली आणि काही वर्षं तो रोममध्ये राहिला. इटालियन प्रबोधनात्मक शिल्पकलेच्या प्रभावाखाली बहरला. डोनंटेललो व वॅरेक्कीओ या दोन शिल्पकारांचा त्यावर मोठा प्रभाव पडला. याच काळात रोममधल्या चळवळीतून त्याला उत्स्फूर्त कलात्मक ज्या कल्पना सुचू लागल्या त्याच आधारावर त्यानं अनेक शिल्पं घडवली. नेपोलियन तिसरा याची मर्जी जीननं जिंकल्यामुळे त्याला भरपूर कलात्मक कामांची संधी मिळाली आणि त्यातून ख्याती वाढतच गेली.

१८६९ 'द डान्स' हे शिल्प त्यानं पॅरिस ऑपेरासमोर लावलं तेव्हा ह्या कामानं त्याच्यावर अनीतीचे आरोप झाले. हल्लेही झाले. त्याच्या लक्षणीय कामाचा वादविवाद होत राहिल्यामुळे तो वादग्रस्त ठरला. त्यानं अनेकांचे अर्धपुतळे करून अव्वल दर्जाचे काम जगापुढे मांडलं. त्याच्या कामात एक प्रकारचा ताल, विविधता आणि समकालीनतेची झळाळी होती. त्याच्या अनेक



**जीन कारपीऑक्सची शिल्पाकृती**

शिल्पांचे विषयही लक्षणीय आणि मनाला आकर्षित करणारे होते. नेपोलियन तिसरा याच्या मुलांचा अर्धपुतळा करून नेपोलियनकडून मोठं आर्थिक मानधन मिळालं. तो काळ कलावंतांना फक्त कोरडे पुरस्कार देणारा नव्हता तर अर्थानं त्यांचा सत्कार होत असे. असा हा जगविख्यात शिल्पकार १२ ऑक्टोबर १८७५ रोजी जग सोडून गेला तेव्हा या व्यवहारदक्ष शिल्पकारानं आपला संपूर्ण व्यवसाय उत्तम मार्गदर्शन करून भावाच्या स्वाधीन केला आणि आपल्या कामाचा प्रसार सतत होत राहावा या उद्देशानं विचार केला. कला आणि अर्थार्जन करणारा हा शिल्पकार कामामुळे समाजमनात जिवंत राहिला.

**मार्क अँटोकॉलक्सी (१८४०)**




गरिबीचे पडसाद कायम कलावंतांच्या कामातून तेव्हापासून उमटत आलेले आहेत. वडील पै पै करून साठवलेले पैसे मोजायचे हे घरातला लहान मुलगा बघायचा. तोच मुलगा पुढे नामवंत शिल्पकार होतो आणि वडिलांचा तो क्षण शिल्पातून साकारतो आणि त्या शिल्पाचा पिटर्सबर्गमधल्या ॲकॅडमीमध्ये सन्मान होतो, त्या शिल्पकाराचं नाव मार्क अँटोकॉलक्सी. मार्कचा जन्म २ नोव्हेंबर १८४० रोजी रशियाच्या लीथुॲनिया भागातल्य विलना गावात झाला. मार्क हा ज्युईश होता. त्याचं शिल्पकलेचं शिक्षण सेंट पीटर्सबर्ग येथील 'इंपिरिअल ॲकॅडमी ऑफ आर्ट'मध्ये १८६२ ते ६८ या काळात झालं.

त्यानं त्याच्या कामाची सुरुवातच ज्युईश शिल्पशैलीनं केली. 'ज्युईश टेलर', 'नाथन द वाईज', 'इन्क्विझिशनज', 'अटॅक अगँष्ट न्यूज', 'द टॅलमुडीक डीबेट' ही त्याची प्रारंभीची शिल्प. ती खूप गाजल्यामुळे त्याचा बोलबाला झाला. 'सम्राट ॲलेक्झांडर दुसरा' यानं त्याचं 'इवान द टेरिबल' हे शिल्प १८७० मध्ये मोठ्या आदरानं विकत घेतलं आणि त्याच्या पुढील कामासाठी मंजुरीही दिली. त्यामुळे टायटल ऑफ ॲकॅडमीनं त्याला पुरस्कारित केलं. १८६४च्या २८ ऑक्टोबरला 'द काऊन्सिल ऑफ ॲकॅडमीनं सन्मानित केलं. सिल्वर मेडलनं कार्ल विश्वासानं म्हणायचा की शिल्पकला ही सामाजिक व मानवी जीवनासाठी उपयुक्त आहे. मानवी सर्व भावभावना त्यातून व्यक्त करता येऊ शकतात. त्यानं मुळातच आपल्या जुईश आयुष्यात आलेल्या अनुभवांना कधीही पाठ दाखवली नाही. रशियन वास्तुशास्त्रज्ञ वॅसीली स्टॅसोव्ह यानं त्याच्या कामाबद्दल अनेक गौरवपर सन्मान केला. सम्राट अलेक्झांडर दुसरानं 'इवान द टेरिबल' हे शिल्प पाहिलं तेव्हा त्याला फक्त ॲडव्हान्स म्हणून ४००० रुबल १८७१ मध्ये दिले, ज्यात त्यानं मोठं घर घेतलं आणि नव्यानं बांधलं. याच काळात एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या मुलीशी विलियीन्समध्ये भेट झाली. प्रेमाचं रूपांतर लग्नात झालं. १८७३ साली तो विवाहित झाला.

१८७६ मध्ये त्यानं त्याच्या मूळ गावी भेट दिली. त्याच्या आजारपणामुळे तो गावी स्थलांतरित झाला. सततच्या प्रदर्शनांमुळे त्याचा वेळही खूप खर्ची पडत होता. तो आपल्या गावी येऊन मनसोक्त निर्मिती करण्यात रमलेला असायचा. त्यामुळे तीस वर्षांपूर्वीचं अपूर्ण काम त्यानं जन्मगावी पूर्ण केलं. त्याचे सतत कुठे ना कुठे दौरे चालूच असायचे. सेंट पिटर्सबर्गमध्ये त्याला प्रोफेसरचा दर्जाही देण्यात आला होता. त्याचं लहानमोठं शिल्प युरोपीयन आर्ट कलेक्शन ऑफ इस्त्राइल म्युझियम, जेरूसलेम येथे प्रदर्शित केलेलं आहे.

१८७२ साली रोममध्ये त्यानं 'पिटर द ग्रेट' पीटर हॉफ पॅलेससाठी भरपूर शिल्पं घडवली. त्या शिल्पांची प्रतिकृती करून पॅरिसमध्ये प्रदर्शनं भरवली. तिथेच त्याला सुवर्णपदक प्राप्त झालं.



**मार्क अँटोकॉलक्सीची शिल्पाकृती**

मार्कच्या शिल्पाला वेगळ्या भावनेचा ओलावा असल्यामुळेच तो राजदरबारी आणि लोकदरबारी प्रसिद्धीस येत राहिला. त्यानं राणी केथरीन दुसरी हिच्यासाठी एका स्मारकाचं काम करून देण्याचं स्वप्न अपूर्णच राहिलं. कारण पोटाच्या तीव्र आजारामुळे तब्येत गंभीर झाली व ९ जुलै १९०२ रोजी जर्मनीतच त्यानं देह ठेवला. केवळ ६२व्या वर्षी त्याची छिन्नी-हातोडा कायमचं थांबलं.

**– विजयराज बोधनकर**
vijayrajbodhankar1964@gmail.com

# कवितेचे घर



**प्रा. प्रमोद नारायणे**

**महिलांचे** भावविश्व व्यापक अशा आशयांनी भरलेले असते. जीवनाचे वैविध्यपूर्ण अनुभव तिच्या विश्वात सामावलेले असतात. हे भावाविष्कार साकार करण्यासाठी तिला कुठलातरी मंच उपलब्ध व्हावा लागतो. तिच्या अभिव्यक्तीला मूर्त रूपात आणण्यासाठी वाव देणारे कुठलेतरी पीठ हवे असते.

महिलांच्या प्रतिभेला चालना देण्यासाठी असेच एक दालन चंद्रपूर जिल्ह्यातील शेगाव (बु) या गावी उघडले गेले आहे. या गावात अनोखे असे 'कवितेचे घर' तयार करण्यात आले. या कवितेच्या घरात महिला ओव्या गातात, कविता सादर करतात. शिक्षक विद्यार्थ्यांना कविता शिकवतात, महिलांच्या भावभावना या ठिकाणी मोकळ्या होतात.

**स्त्रीगीते आणि कवितेचे घर**

कवितेचे घर आणि स्त्रियांची ओवीगीते

कवितेच्या घरी आता गावातील आणि त्या भागातील स्त्रिया येऊन ओवीगीते गातात. या ओवीगीतांना भावभावनांचा विविधांगी स्पर्श असतो. परंपरेने चालत आलेल्या या गीतांचा दरवळ समाजमनात खोलवर रुजलेला आहे.

ओवीगीते गेय स्वरूपात असल्याने त्यांना रचनेची अमीट गोडी असतेच, शिवाय आशयसौंदर्यांच्या दृष्टीने या गीतांना एक वेगळेच वैशिष्ट्य प्राप्त झालेले असते.

कौशल्याबाई पेटकर आज पंच्याऐंशी वर्षांच्या आहेत. त्यांच्या आवाजातील गोडवा अजूनही कायम आहे. याच घरात त्यांनी काही वर्षापूर्वी गायिलेली ओवीगीते आठवतात.

भाऊ काय बोलला
ये नं बहिणा बस ताटी
नार भावजय बोलली
सारा कारभार माझ्या हाती
भाऊ काय बोलला,
ये नं बहिणा पान खाऊ
नार भावजय बोलली
काथ चुना कुठे पाहू?

या गावाला वैदर्भीय संस्कृती जशी लाभली आहे तशी दंडकारण्याच्या झाडीसंस्कृतीचे विलोभनीय अंग लाभले आहे. इथल्या स्त्रिया ओवीगीतांमधून आपल्या भावभावनांना वाट मोकळी करून देतात.

हे कवितेचे घर महिलांसाठी एक चांगला सांस्कृतिक ठेवाच झाले आहे. ते त्यांच्यासाठी नात्याची एक वीण झाली आहे.

शब्दांशी खेळत बसतो
मग अर्थ नव्याने कळतो
शब्द जे सांगती जरी
नसते ते पुराण
विसरणे नाही आम्हा
शब्दांचे ते ऋण

अशी शब्दांची महती गाऊन एकप्रकारे शब्दांचे महत्त्व येथील महिला अधोरेखित करतात.

अरे संसार संसार
जसा तवा चुल्यावर
आधी हाताले चटके
तवा मियते भाकर

ही बहिणाबाई चौधरी यांची कविता तर येथील स्त्रिया दळणकांडण करताना सतत गात असतात. या गीतामधून त्यांना जीवनाचे दुःख कमी करण्यासाठी विसावा मिळतो.

स्त्रिया आपल्या ओवीगीतांतून सामूहिक अनुभूतीचा प्रत्यय आणून देतात. श्रम सामूहिक पद्धतीने झाल्यास कामाचा व्याप कमी होतो अशी त्यांची धारणा आहे. वनिता माकोडे ही महिला ही कल्पना आपल्या शब्दांतून साकार करते.

सखुबाई साजणी कांडू
चौघ्याजणी
बारा जणी मिळून या
सोळा जणी मिळून या
मनाचे मुसळ, जनाचे उसळ
सांडिले तांदूळ हिरवे काचे

अशी आपल्या नित्याच्या कामातील समूहभावना त्या व्यक्त करतात.



गीताताई फुलकर या स्त्रीने तर आजचे बदलते वास्तव आपल्या ओवीगीतांतून मांडले आहे. ती म्हणते–

फुलं झाली प्लॅस्टिकची
सुगंध कुठून येणार?
माणसं झाली पैशांची
माणुसकी कुठून येणार?

आज हरवत चाललेली माणुसकी कुठेतरी सापडेल अशी तिला आशा आहे.

वनिता माकोडे हिने मुलींच्या शिक्षणाचे महत्त्वही आपल्या गीतातून सांगितले आहे.

लाडकी छकुली माझी
लई गुणवान
एक एक पैसा मिळवून
तिला शिकवीन

ही मुलींच्या शिक्षणाची आस्था तिच्या मनात निर्माण होते. स्त्रियांची ही ओवीगीते वेधक असतात.

**सर्जनशील निर्मितीचा अभिनव प्रयोग**

कोट्यवधी जगतात जिवाणू जगती अन् मरती
जशी ती गवताची पाती,
नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभांखाली
निर्मितो नव क्षितिजे पुढती!

काही लोक या पृथ्वीतलावर जन्म घेतात आणि चाकोरीबद्ध जीवन जगून निघून जातात. परंतु काही लोक मात्र कुसुमाग्रजांच्या कवितेतील या नाविकांप्रमाणे कुठलातरी आगळावेगळा प्रयोग करण्यात मग्न असतात. नवे प्रयोग, नव्या कल्पना, नव्या संकल्पना, नवा विचारव्यूह मनात रुजवून त्यांना कृतीत उतरवण्याचा सतत ध्यास त्यांनी घेतलेला असतो. खरे म्हणजे असे लोक नव्या नभाचे नवे क्षितिजच निर्माण करीत असतात. अशा ध्येयवेड्या लोकांच्या मनात कधी कोणती भन्नाट कल्पना येईल सांगता येत नाही.

अशीच एक भन्नाट कल्पना आणि अभिनव अशा सर्जनशील निर्मितीचा प्रयोग म्हणजे 'कवितेचे घर'. या वास्तुनिर्मितीची कल्पना वाचूनच आपण कदाचित थक्क झाला असाल आणि आपल्यासारख्या वाचकांना या घराविषयीची उत्सुकताही वाटत असेल.

चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यात शेगाव (बुद्रुक) नावाचे एक गाव आहे. या गावात विकास ग्रुपच्या सौजन्याने व मूळचे शेगाव येथील आणि सध्या कल्याण येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असलेले श्रीकांत पेटकर आणि त्यांचे बंधू किशोर पेटकर यांच्या कल्पनेतून ही 'कवितेचे घर' नावाची काव्यवास्तू साकार रूप धारण करून आज मोठ्या थाटात उभी आहे.

शेगावचे बापूरावजी पेटकर आणि कौसल्याबाई पेटकर हे कुटुंब मोठे प्रतिभाशाली कुटुंब. बापूरावजींना शिक्षणात रुची आणि आई कौसल्याबाईंकडे लोकगीतांची मुखोद्गत मांदियाळी. या दाम्पत्यांच्या तीन मुलींना आणि पाच मुलांना शिक्षणात तर रुची निर्माण झालीच, शिवाय आई कौसल्याबाईकडून मिळालेला साहित्यकलेचा वारसा सर्वांनीच जोपासला. विजया मेट्रन, माधुरी प्रख्यात डॉक्टर आणि छाया आदर्श शिक्षिका तर मुले ब्रह्मानंद, मधुकर, सुधाकर, श्रीकांत आणि किशोर अनुक्रमे बॅंक मॅनेजर, इंजिनीयर, डॉक्टर, इंजिनीयर आणि वकील झाले. आपला व्यावसायिक हुद्दा सांभाळतानाच ते साहित्याचे वाचन करतच राहिले. या सर्वांचे वाचनाचे वेड सर्वांच्या चर्चेचा विषय राहिला आहे. नोकरीच्या आणि व्यवसायाच्या व्यस्ततेमुळे त्यांचे शेगावला

जाणेयेणे कमी झाले तरी गावाची ओढ मात्र त्यांनी कायम ठेवली. गावाचा संबंध असलेल्या सर्वांशी संपर्क साधून शेगावच्या विकासासाठी श्रीकांत आणि किशोरने 'विकास ग्रुप' स्थापन केला. लोकवर्गणीतून लोकोपयोगी कामे सुरू केली आणि गावविकासाची कामे सुरू ठेवून गावाशी आणि गावच्या मातीशी असलेला ऋणानुबंध त्यांनी कायम ठेवला. गावातील आणि गावाबाहेर गेलेले नागरिक मासिक पैसा विकासकाम ासाठी जमा करत असतात.



शेगावचे मातीचे घर पडायच्या अगोदरच त्या ठिकाणी नवीन काहीतरी बांधायची किशोर आणि श्रीकांतची योजना होती. एक दिवस 'कविता दिवस' होता आणि किशोरच्या डोक्यात आले की का नाही घराचे नाव 'कवितेचे घर 'असेच ठेवायचे. ह्याच घरात आईने दळण दळत असताना बहिणाबाईंच्या कविता म्हटल्या होत्या. डॉ. बाबासाहेबावर असलेली कितीतरी गाणी गायली होती. कोणत्याही लहान मुलाचे नाव ठेवायचे असले की आई गाणे म्हणण्यात पुढाकार घ्यायची. वडील बंगईवर झोके घेत गाणी म्हणायचे. घरातील भाऊ-बहीण ह्याच ठिकाणी गाणी म्हणत असायचे. त्यामुळे काव्याचा नेहमीच संबंध. त्यात श्रीकांत कवी म्हणून प्रसिद्ध होण्याच्या मार्गावर. मग नवीन होणारे घर 'कवितेचे घर' हे घराचे नाव योग्य वाटले. किशोर व्यंगचित्रे काढतो तसेच काही लघुकथा लिहितो. त्या वास्तव जीवनावर आधारित असतात. त्यांनी प्रसिद्ध व्यंगचित्रकार जयवंत काकडे यांच्याकडून रेल्वेविषयक व्यंगचित्रे तयार करून घेतली. आई कौसल्याबाईंनी त्याचे प्रकाशन केले. व्यंगचित्रांचे पुस्तक 'रेल चली' या नावाने प्रकाशित झाले. रसिकांची आणि समीक्षकांची या पुस्तकाला भरभरून दाद मिळाली.

किशोरने मनात घोळत असलेली कवितेच्या घराची कल्पना बंधू श्रीकांत यांच्यापुढे मांडली. त्याची कवितेची चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. एक साहित्यिक म्हणून महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात तो चांगलाच रुळला आहे. तो एक चांगला चित्रकारही आहे. अनेक ठिकाणी त्याच्या चित्रांचे प्रदर्शनही भरले आहे. त्याने लगेच किशोरच्या मनातील संकल्पना उचलून धरली. किशोरची कल्पना, श्रीकांतची साथ आणि पेटकर बहीणभावंडांचा होकार 'कवितेचे घर' साकार होण्यास कारणीभूत ठरला आणि सर्वांच्या आर्थिक सहकार्यातून आणि विकास ग्रुप, शेगावच्या सौजन्याने 'कवितेचे घर' ही सहाशे फुटांची अभिनव वास्तू निर्माण झाली. हे घर म्हणजे कवितेशी संबंधित कार्यक्रमांना आणि उपक्रमांना वाहिलेली वास्तू आहे.

या कवितेच्या घरात मराठीतील प्रसिद्ध अशा कवींच्या कविता त्यांच्या छायाचित्रासह लावण्यात आल्या आहेत. कवितेचे घर पाहायला येणाऱ्या काव्यप्रेमींना प्रसिद्ध कवींच्या कवितांची ओळख होणार आहे. पाहता पाहता सर्वत्र कवितेच्या घराची चर्चा सुरू झाली आणि कवितेच्या घराचा विषय घेऊन अनेकांनी कविता रचल्या. या कवितांचे दर्शन आपल्याला या घरात होईलच.

**कवितेच्या घराचे पुढील संकल्प**

या कवितेच्या घराच्या पुढील उपक्रमांविषयी विचारले असता श्रीकांत व किशोर पेटकर म्हणाले, घराच्या पुढे मोठा परिसर आहे. मराठी कवितेत आलेल्या विविध फुलांची झाडे लावून त्यांच्याजवळ त्या फुलांविषयीच्या मराठीतील कविता लिहिल्या जातील. या माध्यमातून काव्यप्रेमींना फुलांचीही ओळख होईल आणि फुलांची कविताही वाचायला मिळेल. भविष्यात कवितांचे मोठे दालन तयार करण्यात येणार असून मराठीतील नामवंत कवींच्या कवितासंग्रहांबरोबरच नव्याने प्रकाशित होणाऱ्या कवींच्या पुस्तकांचे प्रदर्शन लावण्यात येणार आहे, यासाठी महाराष्ट्रातील किंवा महाराष्ट्राच्या बाहेर कुठेही कवितासंग्रह प्रकाशित झाला तर कवितासंग्रहाची एक प्रत 'कवितेचे घर' मु. शेगाव (बुद्रुक), ता. वरोरा, जि. चंद्रपूर या पत्त्यावर पाठवण्याची विनंतीही कवींना त्यांच्याकडून करण्यात येत आहे. शेगाव (बु) हे गाव ताडोबा अभयारण्यापासून अगदी जवळ आहे. पुढील काळात ताडोबा तसेच आनंदवन बघायला येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाने कवितेच्या घराला भेट द्यावी असे एक साहित्य पर्यटनस्थळ करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखवला. हे त्यांचे स्वप्न साकार होण्यासाठी आपल्या सर्वांच्या सदिच्छा त्यांच्या सोबत आहेतच. हे 'कवितेचे घर' अनेकानेक काव्यफुलांनी फुलून निघावे. या काव्य फुलांचा बहर उत्तरोत्तर वाढत जावा ही आपण अपेक्षा बाळगूया.

**प्रा. प्रमोद नारायणे**
narayanepm123@gmail.com



वांद्रे येथील बी पी ई म्युन्सिपल हायस्कूलचे विद्यार्थी स्पर्धेतील एकांकिका सादर करताना

## विजेत्या शाळा



**प्रथम क्रमांक : विद्याभवन हायस्कूल (इंग्रजी माध्यम) घाटकोपर**



**द्वितीय क्रमांक : सईबाई विद्यामंदिर, मालाड**



**तृतीय क्रमांक : पुणे विद्यार्थीगृह माध्यमिक शाळा, नेरुळ**



**उत्तेजनार्थ : महर्षी कन्याशाळा, सातारा**



**उत्तेजनार्थ : आशाताई गवाणकर प्राथमिक विद्यालय, गोरेगाव**

# विज्ञान एकांकिका स्पर्धेत १२ शाळांतील विद्यार्थ्यांचा उत्साहवर्धक सहभाग





**डॉ. शरद काळे लिखित 'विज्ञानांजली-भाग २'चे आणि 'एकांकिका संग्रहा'चे प्रकाशन करताना- रविराज गंधे मोहन गोरे शरद काळे अ.पां. देशपांडे सुदेश हिंगलासपूरकर आणि महेश खरे**

२८ फेब्रुवारी हा दिवस भारतात राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा केला जातो. या निमित्त नाटक या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान जागरूकता वाढावी, त्याचे महत्त्व रुजावे या उद्देशाने 'ग्रंथाली-प्रतिभांगण' द्वारा विज्ञान एकांकिका स्पर्धा आयोजित केली होती. दादर माटुंगा कल्चरल सेंटर येथे झालेल्या या स्पर्धेत सांताक्रूझ, गोरेगाव, मालाड, वांद्रे, घाटकोपर, कुर्ला, नेरुळ, गोवंडी तसेच सातारा येथील बारा शाळांतील विद्यार्थी सहभागी झाले. भाभा अणुसंशोधन केंद्रातील सेवानिवृत्त ज्येष्ठ शास्त्रज्ञ, पद्मश्री डॉ. शरद काळे यांनी लिहिलेल्या या एकांकिकांच्या संग्रहाचे प्रकाशन यावेळी श्री. मोहन गोरे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच, डॉ. काळे यांनी लिहिलेल्या 'विज्ञानांजली-भाग २' या कवितासंग्रहाचे प्रकाशन मराठी विज्ञान परिषदेचे पदाधिकारी कार्यकर्ते अ.पां. देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

एकांकिका स्पर्धेचे परीक्षक म्हणून रविराज गंधे, किशोर कुलकर्णी, राजीव जोशी आणि विजय लाळे यांनी जबाबदारी सांभाळली. या स्पर्धेतील विजेत्या शाळा पुढीलप्रमाणे-

प्रथम क्रमांक : विद्याभवन हायस्कूल (इंग्रजी माध्यम)
घाटकोपर - एकांकिका विषय - कार्बन फूटप्रिंट
द्वितीय क्रमांक : सईबाई विद्यामंदिर
मालाड - एकांकिका विषय - आहारात तृणधान्यांचे महत्त्व
तृतीय क्रमांक : पुणे विद्यार्थीगृह माध्यमिक शाळा
नेरुळ - एकांकिका विषय - कचरा नव्हे ही संपत्ती
उत्तेजनार्थ बक्षीस १ : महर्षी कन्याशाळा
सातारा - एकांकिका विषय - प्लास्टिकचा भस्मासूर
उत्तेजनार्थ बक्षीस २ : आशाताई गवाणकर प्राथमिक विद्यालय
गोरेगाव - एकांकिका विषय : अंतराळवीर आम्ही

'या एकांकिका स्पर्धेपुरत्या न करता त्यांनी आपापल्या गावात पथनाट्याप्रमाणे केल्यास वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार अधिक होईल' असे महत्त्वाचे मत परीक्षक राजीव जोशी यांनी नोंदवले. एकूणच सर्व विद्यार्थी व शिक्षक यांनी दाखवलेला उत्साह व घेतलेला सहभाग पाहता अशी स्पर्धा मोठ्या प्रमाणावर योजावी असे 'ग्रंथाली प्रतिभांगण'ला वाटते.

या उपक्रमाला शालेय शैक्षणिक साहित्य क्षेत्रातील सुप्रसिद्ध संस्था नवनीत यांच्या 'युवा' या विभागाकडून सहकार्य करण्यात आले होते. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना उपयुक्त असे 'युवा'चे शैक्षणिक साहित्य, ग्रंथालीची पुस्तके व स्पर्धा सहभाग प्रमाणपत्र देण्यात आली. या उपक्रमास समाजातील विविध मान्यवरही व नागरिकही उपस्थित होते. महेश खरे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या उपक्रमात सहभागी झालेले तसेच यूट्यूबवर या कार्यक्रमाचे चित्रीकरण पाहणारे विद्यार्थी, शिक्षक यांना एकांकिकेसारख्या रंजक माध्यमातून विज्ञानातील तत्त्वे समजतील व आपला समाज अधिकाधिक सुजाण, विज्ञाननिष्ठ होईल.

या स्पर्धेचा वृत्तांत ३१ मार्च २०२३ रोजी ग्रंथाली प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल. ●

# मुलांमधील विज्ञानवृत्ती वाढण्यासाठी ग्रंथाली-प्रतिभांगणचा आणखी नवीन उपक्रम 'विज्ञानगप्पा'



'विज्ञानगप्पा' कार्यक्रमात डॉ. सुधीर थत्ते व नंदिनी थत्ते मुलांशी संवाद साधताना.


लहान वयात झालेले संस्कार आयुष्यभर माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होतात. यामुळेच समाजामध्ये विज्ञानवृत्ती वाढायची असेल तर शालेय विद्यार्थ्यांमध्ये ही विज्ञानवृत्ती रुजवली पाहिजे. गप्पा-गोष्टी अशा अनौपचारिक प्रकारे मुलांना दैनंदिन जीवनातील विज्ञानाविषयी कुतूहल निर्माण झाले तर ती त्याविषयी प्रश्न विचारू लागतील व त्यांची उत्तरे शोधण्याच्या प्रक्रियेतून विज्ञानाविषयी सजग असलेले नागरिक घडू शकतील. या विचाराने 'ग्रंथाली-प्रतिभांगण' द्वारा २८ फेब्रुवारी रोजी दुपारी ग्रंथाली-प्रतिभांगण या वांद्रे (प.) येथील वास्तूमध्ये ज्येष्ठ शास्त्रज्ञ व लेखक डॉ. सुधीर आणि त्यांच्या पत्नी नंदिनी थत्ते यांचा शालेय विद्यार्थ्यांशी 'विज्ञानगप्पा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी वांद्रे परिसरातील मुंबई महानगरपालिकेच्या तीन शाळांतील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

डॉ. सुधीर व नंदिनी थत्ते यांनी या कार्यक्रमात विज्ञान हे आपल्या दैनंदिन जीवनात जवळजवळ प्रत्येक गोष्टीत कसे दडले आहे याबद्दल सांगितले. तसेच, विद्यार्थ्यांनी त्यांना पडणारे प्रश्न मोकळेपणाने विचारणे आवश्यक असल्याचे म्हणताना, या प्रश्नांची उत्तरे इंटरनेटच्या माध्यमातून शोधली पाहिजेत असेही सांगितले. यावेळी उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अनेक प्रश्न विचारले व डॉ. सुधीर व नंदिनी थत्ते यांनी त्यांच्या शंकांचे समाधान केले. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी या उपक्रमाविषयीची भूमिका सांगितली. महेश खरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. हा कार्यक्रम महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारपासून ग्रंथाली प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर अवश्य पाहावा. ●


ग्रंथाली




**शरद काळे यांची विज्ञानदिनी प्रसिद्ध झालेली दोन पुस्तके**




**मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.**

# ‘आरोग्याची कॅप्सुल’ या नवीन उपक्रमात डॉ. हेमा पुरंदरे यांची मुलाखत




डॉ. हेमा पुरंदरे यांच्याशी संवाद साधताना डॉ. सतीश नाईक.

आरोग्याबाबत आपण कायम जागरूक असतो. कोविडनंतर ही जागरूकता अधिकच तीव्र झाली. एकूणच आरोग्यविषयक प्रश्नांना समाधानकारक उत्तरं मिळतील असं ठिकाण नव्हतं. याचसाठी वैद्यकीय क्षेत्रातील मातब्बर व्यक्तिमत्त्वांच्या ज्ञानाचा लाभ समाजाला व्हावा व समाजातील गैरसमज व अपप्रचाराला आळा घातला जावा या उद्देशाने ग्रंथाली-प्रतिभांगणद्वारा ‘आरोग्याची कॅप्सुल’ हा नवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध मधुमेहतज्ज्ञ आणि ग्रंथाली प्रकाशित ‘कॅन्सर म्हणजे डोकं फिरलेल्या पेशी’ या पुस्तकाचे लेखक डॉ. सतीश नाईक वैद्यकशास्त्रातील वेगवेगळ्या क्षेत्राच्या निष्णात व्यक्तीशी संवाद साधणार आहेत.

या उपक्रमाचा शुभारंभ सोमवार २० फेब्रुवारी २०२३ रोजी प्रतिभांगण, बॅन्ड स्टॅन्ड, वांद्रे (प) येथे सायंकाळी ६ वाजता झाला. भारतामध्ये जनुकीय तपासण्या, संशोधन व उपचारांचा पाया घालणाऱ्या व पहिले खाजगी जनुकीय सेवाकेंद्र उभारणाऱ्या ज्येष्ठ जनुकतज्ज्ञ डॉ. हेमा पुरंदरे यांची मुलाखत यावेळी झाली

डॉ. हेमा पुरंदरे यांनी या मुलाखतीमध्ये आपल्या जीवनप्रवासाविषयी थोडक्यात पण रंजकपणे माहिती दिली. वैद्यकीय तज्ज्ञांमध्येही जनुकशास्त्राचे महत्त्व फारसे पटलेले नसताना त्यांनी या क्षेत्रात कशी एकलव्याप्रमाणे ज्ञानसाधना केली, परदेशात राहून या विषयाचे विविध पैलू कसे शिकून घेतले हे त्यांनी सांगितले. भारतात परत येऊन जनुकीय चाचण्यांचे महत्त्व वैद्यकीय व्यावसायिकांना आणि रुग्णांना पटवून देण्यासाठी त्यांनी अखंडपणे प्रयत्न केले व आजही करतच आहेत. जगभरातील अनेक देशांमध्ये विवाहपूर्व जनुकीय चाचण्या अनिवार्य करण्यात आल्या असून त्यामुळे तेथे अनेक जन्मजात रोगांचे प्रमाण खूपच कमी झाले आहे. भारतातही हळूहळू याविषयी सजगता वाढत असून त्यामुळे नागरिकांना त्याचा फायदा होत आहे असे त्यांनी सांगितले. डॉ. पुरंदरे यांचे विद्यार्थी असलेल्या शिकलेल्या डॉ. सतीश नाईक यांनी नेमके व अभ्यासपूर्ण प्रश्न विचारून संवादातून जास्तीत जास्त उपयुक्त माहिती दर्शकांना मिळेल याची काळजी घेतली.

कार्यक्रमाचे ध्वनिचित्रमुद्रण करण्यात आले असून ते मार्च महिन्यातील शेवटच्या सोमवारी ग्रंथाली प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर प्रसारित करण्यात येईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश खरे यांनी केले. •

# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी यांच्याशी 'कॉर्पोरेट गप्पा'




**'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'चे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी यांच्याशी संवाद साधताना 'उद्योगविश्व'चे ज्ञानेश चांदेकर**

मराठी साहित्यजगतामध्ये उद्योगविश्वातील अनुभवांचे प्रतिबिंब पुरेशा प्रमाणात पडत नाही. मराठी माणूस व्यवसायात 'पडतो', व्यापारात मागे राहतो अशा चर्चा करण्यापेक्षा उद्योगजगतातील यशस्वी व्यक्तींच्या मुलाखतींमधून त्यांचे अनुभवाचे बोल समाजापर्यंत पोहोचवावेत या विचाराने ग्रंथाली-प्रतिभांगणद्वारा 'कॉर्पोरेट गप्पा' हा उपक्रम आयोजित करण्यात येतो.

गुरुवार, २४ फेब्रुवारी २०२३ रोजी ग्रंथाली-प्रतिभांगणच्या वांद्रे येथील वास्तूत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या चौथ्या कार्यक्रमात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी यांची मुलाखत उद्योगविश्वचे ज्ञानेश चांदेकर यांनी घेतली.

लॉजिस्टिक म्हणजे आयात-निर्यातपूर्व कामकाज उद्योगामध्ये कार्यरत असलेल्या करुणाकर शेट्टी यांनी यावेळी त्यांच्या कारकिर्दीविषयी माहिती दिली. ज्या कामांसाठी पूर्वी अनेक व्यक्तींचा बराच वेळ व श्रम खर्च होत असे ती कामे आता तंत्रज्ञानाच्या सुधारणांमुळे अत्यंत कमी वेळात, श्रमांमध्ये व शासकिय कार्यालयात वारंवार फेऱ्या न घालता होऊ शकतात असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र देशामध्ये उद्योगक्षेत्रात प्रथम स्थानावर असून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सद्वारा महाराष्ट्रातील उद्योजकांना उपयोगी ठरणारे विविध प्रकारचे कार्य केले जाते. जिल्हास्तरावर कोणती उत्पादने जास्त घेतली जातात व त्याच्याशी संबंधित कोणते उद्योग तेथे वाढू शकतील याचा अभ्यास करण्यापासून नवीन स्टार्टअप उद्योग करणाऱ्या तरुणांना मार्गदर्शन करण्यापर्यंतच्या विविध कामांविषयी शेट्टी यांनी माहिती दिली. हा कार्यक्रम ग्रंथाली-प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर महिन्याच्या शेवटच्या मंगळवारी उपलब्ध असेल. ●

ग्रंथाली




## माझी कॉर्पोरेट दिंडी

**माधव जोशी**


लेखकाच्या पन्नास वर्षांच्या कॉर्पोरेट वाटचालीवर, भेटलेल्या व्यक्तींवर-सहकाऱ्यांवर आधारित आत्मकथन.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## युक्तीच्या गोष्ट सांगणाऱ्याची गोष्ट

**शिल्पा शिवलकर**

अनेक उद्योगांना युक्तीच्या गोष्टी सांगणारे आत्मकथन.




**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## वर्धा साहित्यसंमेलनात 'ग्रंथाली'च्या स्टॉलवर प्रकाशन झाले!



मी पॉझिटिव्ह आलो – लेखक प्रमोद नारायणे



चौकोनी विश्व – कवयित्री वर्षा गायकवाड



अशोक बेंडखळे यांच्या पाच पुस्तकांचे प्रकाशन



'आम्ही स्मार्ट मुलं', 'मूषक स्वामींचा दंगा, राणीला इंगा'
लेखक सुरेश वांदिले







रजनीश कुमार शुक्ल यांच्या हिंदी पुस्तकांचा मराठी अनुवाद 'जीवनस्वर साध्य करणारे शिक्षण' आणि 'गौरवशाली संस्कृती' (मराठी अनुवाद – मीरा निचळे. संपादक – मीरा निचळे, जगदीश नारायण तिवारी) सोबत 'भावांजली' – मीरा निचळे कवितासंग्रह



अरुण घाडीगावकर लिखित 'भक्ती'पंथेचि जावे या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन ग्रंथाली कार्यालयात झाले.




उषा चांदूरकर लिखित 'उषाकिरण' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन




कमलाकर राऊत लिखित 'संगीत श्रवणाचे' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन




**'ग्रंथाली'ला महाराष्ट्र शासनाचा 'श्री.पु. भागवत स्मृती उत्कृष्ट प्रकाशक २०२२' पुरस्कार मिळाला. त्याचा आनंद साजरा करताना ग्रंथाली कार्यकर्ते**





मेधा आलकरी
सई हिंगलासपूरकर
अरुण जोशी
सुदेश हिंगलासपूरकर
शोभा हिंगलासपूरकर
धनश्री धारप
अनिता सावंत
रोहित भानुशाली
डॉ. लतिका भानुशाली
सौमित्र शिंदे
राजीव श्रीखंडे
योगिता मोरे
अनिरुद्ध गद्रे
हरिप्रसाद जयस्वाल




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**फक्त ‘ती’च्यासाठी**
**संघर्ष गर्भपाताच्या हक्कासाठी**
**डॉ. स्मिता दातार**




**प्रयत्ने वाळूचे कण रगडिता...**

*‘‘कोमल त्या व्यंग असलेल्या मुलाला घेऊन बाहेर गेली. डॉक्टरांनी चष्मा काढून टेबलावर ठेवला. सुन्नपणे डोकं धरून ते बसून राहिले. तीन वर्षं होऊन गेली होती. त्यांना तिच्या वेदनेवरचं औषध सापडलं नव्हतं. कोमलच्या आयुष्यात एक जिवंत दु:ख होतं. कुठेतरी त्याचा दोष तिनं त्यांना दिला होता. मग अजूनही कोणत्या विश्वासानं कोमल त्याच्याकडे येत होती?’’*

काही विषय आपण फारसे गांभीर्याने घेत नाही. त्यातला एक विषय आहे गर्भपाताचा. हा सातत्याने अथवा घरोघरी घडणारा विषय नाही, ही त्यामागची भाबडी समजूत. त्यातून गर्भपाताचा विषय येतो, तो नको असलेली संतती, या सदरात. मग त्यातली वर्गवारी ठरते ती संतती नको ती का, या मुद्यावर. यातला भाग असतो तो, स्त्रीभ्रूण आहे म्हणून किंवा अनिच्छेने बळजबरी लादलेले मातृत्व. तरीही अशी प्रकरणे अत्यल्प म्हणून त्याकडे पाहताना आपण जागरूक नागरिक म्हणून पाहतो, असे होत नाही.

प्रत्यक्षात तपशील पाहिला तर भारतात दरवर्षी होणाऱ्या गर्भपातांची संख्य ६.५ दशलक्ष इतकी भरते. त्यातल्या असुरक्षित गर्भपातांची संख्या ५७% इतकी आहे. परिणामी अशा गर्भपातांत दररोज अनेक महिला मृत्युमुखी पडतात. याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे असे आपणास वाटत नाही, हे वास्तव आहे. कायद्याची मर्यादा, समजुतींचा अंध पगडा आणि गल्लाभरू डॉक्टर यांच्यातल्या परस्परव्यवहारात हा विषय वेगळ्याच टप्प्यावर गेलेला आहे. यात केंद्रस्थानी आहे ती महिला, तिचे आरोग्य आणि स्वातंत्र्य.

आपल्याला मातृत्व हवे की नको, याचे स्वातंत्र्य स्त्रीकडेच असावे. गर्भपाताला कायद्याने (१९७१च्या) वीस आठवड्यांची मर्यादा आहे. त्याच्या पुढील आठवड्याचा गर्भ असेल तर काय? स्त्री विवाहित असो वा अविवाहित. अठरा वर्षाच्या वयाच्या आत असे मातृत्व लादले असेल तर काय? कायदा, न्याय तिच्या बाजूने उभे राहतो, त्याचा दरवाजा ठोठावला जातो तेव्हा. पण... गर्भात व्यंग आहे आणि वीस आठवड्यांचा कालावधी उलटून गेला आहे तिथे न्यायदेखील कायद्याकडे बोट दाखवून कानांवर/डोळ्यांवर हात ठेवतो.

ही एक लढाई आहे, हक्काची. कुणीतरी पुढाकार घेण्याची त्यासाठी गरज होती. ती गरज ओळखून निर्धाराने, निश्चयाने, खंबीरपणे सर्व ताकद पणाला लावून उभे राहिले ते डॉ. निखिल दातार! कायद्यात असलेल्या तरतुदीत ‘व्यंग असलेल्या भ्रूणाचा’ कुठलाच उल्लेख नाही. म्हणून त्यासाठी अडलेल्या मातेला वाऱ्यावर सोडून देणे योग्य नाही, तिला न्याय मिळवून दिला पाहिजे, तिचा हक्क–सन्मान तिला मिळाला पाहिजे, यासाठी पुढे आले ते डॉ. निखिल दातार! त्यासाठी कारणीभूत ठरली ती कोमल सोनी.

‘फक्त ‘ती’च्यासाठी’ – संघर्ष गर्भपाताच्या हक्कासाठी’ हे पुस्तक म्हणजे एका संघर्षाची गाथा आहे. डॉ. निखिल दातार यांच्या संघर्षाची गाथा आहे. ते कोमल सोनीच्या केसमुळे या धारदार विषयाला हात घालण्यासाठी सरसावले. थेट सुप्रीम कोर्टापर्यंत त्यांनी आपला निर्धार कायम ठेवला आणि असंख्य कोमल सोनींची होणारी घुसमट मुक्त केली. हा प्रवास खडतर होता. त्यासाठी त्यांनी कायद्याचा रीतसर अभ्यास केला, एलएलबीची पदवी मिळालेली. आपल्या वैद्यकीय व्यवसायातील सहकाऱ्यांचा विरोध सहन केला, कधी पराभव पचवला, मात्र माघार घेतली नाही. खडतर प्रयत्नांना– वाळूही रगडिता तेल गळे – या न्यायाने यश येतेच याचा प्रत्यय त्यांना आला. वीस आठवड्यांपर्यंत गर्भपात चोवीस आठवडे इतका सुरक्षित झालाच, त्याबरोबर गर्भात व्यंग असेल तर त्यासाठीचा न्याय न्यायालयाने मान्य केला. एका मोठ्या अभावाचे रूपांतर हक्कात झाले. कायद्यात दुरुस्ती झाली, त्याचे राजपत्र या पुस्तकाच्या शेवटी जोडलेले आहे. तो दिवस आहे २५ मार्च २०२१.

डॉ. निखिल दातार केवळ स्त्रीरोगतज्ज्ञ नाहीत, सामाजिक भान असलेले आरोग्य चळवळीतील अग्रगण्य असे कार्यकर्ते आहेत. रुग्णाची सुरक्षा ही त्यांच्यासाठी सर्वोच्च प्राधान्य असलेली तळमळ आहे. त्यासाठी अनेक संस्थांशी त्यांनी स्वत:ला वाहून घेतलेले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या या कार्याची दखल घेतली गेली आहे. अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. स्वत: अशा सेवा देणाऱ्या संस्था त्यांनी स्थापन केलेल्या आहेत. अर्थातच सुसंस्कृतपणा, सेवाभाव आणि उच्चशिक्षण यांचा वारसा त्यांच्या कुटुंबातच आहे. पं. डी.के. दातार, जागतिक कीर्तीचे सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक आणि डॉ. सुधा दातार, पंचक्रोशीत सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ असा कला–शास्त्राचा वारसा वडील–आई म्हणून त्यांना लाभलेला आहे. त्यांच्या पत्नी डॉ. स्मिता दातार याही डॉक्टर आहेत. अनेक विषयांत त्यांनी प्रावीण्य मिळवलेले असून त्यासाठी त्यांना पुरस्कारही लाभलेले आहे. त्याच या संघर्षगाथेच्या लेखिका आहेत.

ही संघर्षगाथा लिहिताना त्यांनी अगोदरच स्पष्ट केले आहे की निखिल दातार यांचे हे चरित्र नाही. तरीही डॉक्टरांची अनेक वैशिष्ट्ये, गुण यांचा व्यक्तिमत्त्वाच्या अंगाने नेमकेपणाने वेध घेतलेला आहे. एका डॉक्टरचा प्रवास रेखाटताना त्याच विषयाच्या ओघात भ्रूणवार, मेंदू, गर्भाशय, हृदय यांच्या कार्याची ओळख त्यांनी करून दिलेली आहे. येणाऱ्या अडचणी, केलेल्या सुटका यांची उदाहरणे समोर ठेवलेली आहेत. एक सृजनशील लेखिका म्हणून लेखनातले ललितपण, विचारांची नेमकी दिशा, व्यक्तिचित्रण, विषयाचे सुस्पष्टपण उत्तम रीतीने जपलेले आहे. कथानकाला कादंबरीसारखा फ्लॅशबॅक या तंत्राचा सुंदर वापर केलेला आहे. आपल्याच माणसाचा आलेख मांडताना स्वत:चे अलिप्तपणदेखील तितकेच निर्धाराने सांगितले आहे. एक सिद्धहस्त लेखिकेची ही तरलगाथा आहे.

‘फक्त ‘ती’च्यासाठी’ पुस्तकाचे सतीश भावसार यांनी रेखाटलेले मुखपृष्ठ नि:शब्द अवस्थेला नेऊन ठेवते.

**मूल्य ३५० रुपये   सवलतीत २१० रुपये**

## ग्रंथपान

**तिरकस–चौकस**

**सॅबी परेरा**




**तिरकसपणाच्या आवरणाखाली असलेली अंतर्मुखता**

*''असंही असू शकतं की रस्त्यात सशाला कुठेतरी मोफत वायफाय कनेक्शन मिळालं असावं. तो सोशल मीडियाच्या जंजाळात अडकला असावा आणि कासवाकडे स्मार्टफोन नसल्यानं ते चालत राहिलं असावं किंवा असंही असू शकेल, की ससा आणि कासवाच्या शर्यतीत कासवाची टीम सत्ताधारी पक्षानं किंवा त्यांच्या एखाद्या पाठिराख्यानं खरेदी केली असेल आणि कासव जिंकावं म्हणून ईडीची भीती दाखवून सशाला हरायला लागलं असेल.''*

विनोद करणे ही सगळ्यात सोपी कला आहे, असे वाटणारे आणि समजणारे विनोदवीर आपल्या आजूबाजूला पायलीचे पंधरा सापडतील. परंतु एखादा नितळ निर्विष विनोद सांग पाहू, असे त्यांना फर्मावले तर त्यांची जीभ दातांचे फक्त कुंपण पुढे करील, हाच त्यांचा विनोद. आजपर्यंतचा साहित्याचा एकूण पट पाहिला तर आपल्या लक्षात येते, मागणीइतका पुरवठा अद्याप झालेला नाही. सहज, पटकन बोटांच्या पेरांवर बोट ठेवून नावे सांगता येतील इतकेच मोजके लेखन करणारे साहित्यिक आपल्याला दिसतात. विशेष असा की ह्या साहित्याला मागणी आहेच आणि उपलब्ध साहित्याला निखळपणे दाददेखील मिळालेली आहे. तरीही हे समाधान सातत्य टिकवू शकले नाही. आज त्याला कारणे अनेक वगैरे नाहीत, एकच कारण आहे, विनोदावर हुकूमत गाजवणे वाफ गमावण्याइतके सोपे नाही.

'तिरकस चौकस' हा लेखसंग्रह मनापासून आवडला. त्याचे एकमेव कारण, लेखकाची असलेली हुकूमत. नितळ, निर्विष, निरागस आणि निखळपण यांचा सुंदर आविष्कार म्हणजे हा लेखसंग्रह. कुठलाही लेख वाचायला सुरुवात करा, एक प्रसन्न अनुभव आपल्याला तृप्तीचे समाधान देऊन जातो. विनोदात उपहासापेक्षा उपरोध फार महत्त्वाचा ठरतो. विडंबनापेक्षा त्यातली मार्मिकता महत्त्वाची ठरते, यांची उदाहरणे वाचताना सभोवतालचा समाज, व्यक्ती, राजकारण यातले वास्तव आपल्या मनाला स्पर्शून जात नाही, तर मनावर आपल्या जाणिवांवर वार करत जाते. लोक दु:खी दिसले म्हणजे सगळे आलबेल जाणवते आणि तेच आनंदी दिसले तर हवेत पाण्यात भांग मिसळल्याचा संशय येतो, असे लेखक नोंद करतो तेव्हा या सत्याचा वार चुकवणे आपल्यासाठी अवघड होते. महागाई ही मध्यमवयीन माणसाच्या ढेरीसारखी असते, ती एकदा वाढली की कमी होत नाही. तसेच तिच्याविषयी तक्रार करणारे कोण असतात? ज्यांना उत्पन्न वाढण्यात अपयश आले आहे, हे सांगताना लेखक निर्देश करतो ते 'माणुसकी महाग झाली' या वर्माकडे, परंतु सरकार याबाबत आशावादी आहे. बाजारात उपलब्ध नसलेल्या माणुसकीची आम्ही लवकरत निर्यात सुरू करू!

आपला शेजारधर्म निंदकाशी जोडलेला आहे. लेखक मात्र अशाच शेजार असलेल्यांचे स्वागत करतो. त्यामुळे शेजाऱ्यांच्या काळ्या कर्तृत्वाचा पट घरबसल्या उलगडला जातो, त्यामुळे आठवडाभरात नवीन सोसायटीची ओळख व्हायला मदत होते. यातले एक वाक्य लक्षात ठेवण्यासारखे आहे.' जेव्हा आपला बोकड हरवतो, तेव्हा शेजाऱ्याच्या घरातल्या बिर्याणीचा वास संशयास्पद वाटणे साहजिक आहे!

तिळाचे लाडू वाटून गोड बोलण्याचा करार केल्यास वाद, संवाद इतकेच काय विसंवादही होऊ शकत नाही. केवळ मन की बात होऊ शकते... तीही रेडिओ किंवा टीव्हीवर... एकतर्फी. त्यावर आई म्हणते, अरे, एक दिवस गोड बोललास तर काही मरत नाहीस. मलाही ते क्षणभर पटायचे, पण विषाची परीक्षा का घ्या? व्हॅलेंटाईन या विदेशी संताला डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या मेक इन इंडियातील लोकल टॅलेंटविषयी – आपल्या देशातल्या संतांकडे अक्षम्य दुर्लक्ष करतो म्हणजे 'घर का बोकड पनीर बराबर', 'नवऱ्याने घरात कुठल्याही बाबतीत मत मांडणे म्हणजे टो करून नेत असलेल्या गाडीच्या ड्रायव्हरने स्टेअरिंग फिरवण्यासारखं आहे.' 'बंदी असलेल्या वस्तू देवासारख्या असतात. मिळतात सगळीकडे दिसत कुणालाच नाहीत.' 'दारुडी माणसं ही शांतताप्रिय, पापभीरू आणि कायदेकानू पाळणारी असतात. त्यांच्यासाठी वेगळे कायदे करायची गरज नाही. कोरोनाकाळात त्याचा प्रत्यय आलाच.' अशा अनेक विषयांकडे पाहताना लेखकाने आपल्याला त्यातल्या विसंगतीकडे अलगदपणे पाहण्याची दृष्टी बहाल केली आहे. यासाठी काही आपल्या परिचित संदर्भांची जोड दिली आहे. रस्त्यात खड्डे पडणे, ही काही आजची नवीन समस्या नाही. महाभारतात कर्णाच्या रथाचे चक्र खड्ड्यात रुतले होते. महागाईदेखील तशीच ती त्याही काळी होती. सुदामा कृष्णाला पोहे आणतो. साजूक तुपातला शिरा नाही. जिझस पाण्यावरून चालतो त्याला होडी परवडत नाही. मेघदूतातला यक्ष मेघाला दूत करतो, त्याला सांडणीस्वार परवडत नाही. या संदर्भाचा चपखल उपयोग केलेला आहे.


सॅबी परेरा यांचा 'टपालकी' हा लेखसंग्रह यापूर्वी प्रकाशित झालेला आहे आणि त्याला महाराष्ट्र शासनाच्या विनोदी पुस्तकासाठीचा श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विषयावर आपल्या शैलीत भाष्य करणारे लेखक म्हणून त्यांची ओळख सर्वपरिचित आहे तिचा प्रत्यय 'तिरकस चौकस' या पुस्तकातूनही अधिक अधोरेखित होतो. सामवेदी बोलीभाषेत लिहिणारे लेखक व कवी, हौशी रंगभूमीवरील कलाकार व दिग्दर्शक, सूत्रसंचालक म्हणूनही त्यांची ओळख आहे. अनेक वृत्तपत्रे, नियतकालिके यातून सातत्याने लेखन सुरू आहे. त्यांच्या लेखनाची स्वत:ची शैली असून तिला निरीक्षण, वाचन, चिंतनाची वैचारिक बैठक आहे. वाचकाशी सुसंवाद साधण्याचा मनमोकळा निर्व्याजपणा तर मान्य करायलाच हवा. त्यामुळे एक प्रसन्न बोलीतील सुंदर पुस्तक वाचल्याचा निव्वळ आनंद मिळाला.

सचिन गोस्वामी यांनी लिहिलेली प्रस्तावना लेखक आणि लेखन यांचे नाते सुंदरपणे उलगडून सांगणारी आहे. नीलेश जाधव यांनी साकारलेली आतील चित्रे आणि मुखपृष्ठ आशयावर साज चढवणारी आहेत.

**मूल्य २५० रुपये    सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**जागो, मैं खुदा हूँ**
**किरण येले**




**शहाणं करणारं वेडं नाटक!**

*''हमिद, तू मजहब की बात करता है? मानता है मजहब? मजहब क्या चीज है भाई? कुणी बनवली? यार हमिद, माणसाची गरज फक्त एक, भूक आणि ती दोन प्रकारची– एक पोटाची, दुसरी शरीराची, यापुढे काही उरत नाही. ना मजहब, ना खुदा, ना बाप, ना भाई, ना बहन, माँ, कुछ नहीं...''*

'जागो, मैं खुदा हूँ' या नाटकात आलेला हा संवाद. या नाटकात म्हटले तर सलग एका धाग्यात गुंफलेल्या पात्रांचे भावविश्व आहे. त्यांची भावावस्था आपल्याला सतत छळत राहते. त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न मेंदूला शिणवून टाकणारे ठरतात.

नाटकासाठी पहिला टप्पा असतो, नाटक घडते ते स्थळ. मग त्यानुसार त्याची मांडणी केली जाते. ही मांडणी लेखकासाठी मोठे आव्हान असते. नेपथ्यातून दिसणारे स्थळ प्रेक्षकांच्या समोर साकार होण्यापूर्वी ते लेखकाच्य विचारात–मेंदूत जन्माला आलेले असते. त्या स्थळाचा संपूर्ण आकृतिबंध पात्रांच्या–व्यक्तिरेखांच्या साहाय्याने सजीव करायचा असतो. त्यात प्राण फुंकायचा असतो. फुंकलेला प्राण असतो विषय. स्थळ, व्यक्तिरेखा आणि विषय यातला एक हिस्सा असतो लेखक. जो यांच्यामार्फत प्रेक्षकांसमोर आपला आविष्कार सादर करू पाहतो. त्यात त्याचे अस्तित्व मर्यादित आहे, देवासारखे, असूनही दिसत नसतो आणि दिसत नसूनही चराचराला व्यापून असतो. कसा विचार करतो तो आपल्या लेखनाचा, कसा तर्कसंगती लावतो प्रत्येक पात्राला, कथानकातील प्रत्येक टप्प्याला न्याय देण्याचा आणि शेवटी काय सांगू पाहतो त्याच्या कलाकृतीद्वारे? हे सारे विवेचन करायचे कारण 'जागो, मैं खुदा हूँ' हे नाटक.

सदाअत मंटो हा हिंदी–उर्दू साहित्यातला सदासर्वकाळ स्वतःची छाप उमटवलेला लेखक. त्याच्या प्रत्येक साहित्यकृतीने स्वतःची खूण अशी कोरून ठेवली आहे काळावर, की ती कधीच पुसली जाणार नाही. त्याच्या दोन कथा – खोल दो आणि टोबा टेकासिंह या नावाने प्रसिद्ध आहेत. या कथांवर हे नाटक उभे आहे. प्रसिद्ध लेखकांच्या या प्रसिद्ध कथांवर नाटक बेतण्याचे धाडस करणे हे एक आव्हानच! पण आव्हानात घाबरून माघार घेईल तो किरण येले नाहीच. आव्हानाला आव्हान देत नम्रपणे त्याला संपूर्ण न्याय देण्याचे काम किरण येले यांनी केले आहे, असे नाटक वाचून झाल्यानंतर मी ठामपणे सांगतो आहे.

विषय साधा नाही. ना त्याचे स्थळ, ना त्याची भाषा, किरण येले यांनी दाखवलेली समर्पणाची तयारी आणि त्यात घुसळून एक होण्याची वृत्ती त्यामुळेच हा नाटकाचा आकृतिबंध समर्थपणे साकारला गेलेला आहे.

विषय आहे फाळणीचा. भारत–पाकिस्तानाच्या विभाजनाचा, अखंड हिंदुस्थानांच्या अभंगतेवर वार करण्याचा. १९४७ला मिळालेल्या स्वातंत्र्यांचे गोडवे आम्ही गात आहोत, दरवर्षी गाणार आहोत, पण याच्या जन्माच्या वेळी झालेले क्रौर्य कसे विसरता येईल? या क्रौर्याचा साक्षीदार होता सआदत मंटो. मंटोने फाळणी पाहिली, अनुभवली, झळांनी होरपळलाही. तो संपूर्ण कल्लोळ त्याने आपल्या साहित्याच्या कॅमेऱ्यात कैद केला. फाळणी झाली म्हणजे काय झाले, एका देहाचे दोन तुकडे झाले, त्यांना दोन देश असे नाव मिळाले. एक लाल रक्ताची रेष दोन देशांनी मर्यादा म्हणून आखून घेतली, इतकेच त्यात नाही. नाती, माणसे, भावना, सूड, द्वेष, परकेपण, धर्म, जात असा मोठा भाग यात आला आणि त्याचीही फाळणी झाली. त्यातले क्रौर्य कुठल्या महायुद्धाला लाज वाटेल असे होते. त्यात मन, माणुसकी, प्रेम, रक्ताची नाती... अशा सगळ्यांची फाळणी झाली. आणि स्वतंत्र झालेले देश उरले ते वेड्यांचे इस्पितळ म्हणून. नाटकाचे स्थळ हे आहे – वेड्यांचे इस्पितळ. या भयंकर अस्वस्थ करणाऱ्या कथानकावर आधारलेले हे नाटक आहे.

नाटकातली पात्रांची संख्या मोठी आहे. त्याचे प्रत्येकाचे स्वतंत्र अस्तित्व ठळकपणे अधोरेखित होणे, ही लेखकासाठी कसरतच होती. ती बाजू लेखकाने समर्थपणे पेलली आहे.

वेड्याच्या वागण्याचा अन्वयार्थ लावताना म्हटले आहे, 'या येड्यांकडं पाह्यलं की जिंदगी कळते. छोटे बच्चे की माफिक असतात रे समदी. समदं समजतंय त्यास्नी पर हार्मुनिमच्या भात्याला अंगार लागून छिद्र पडल्यालं आयुष्याला. पायजेल तो सूर उमटलंच कसा? खान्यापिन्याची सुध न्हाई म्हून ती येडी. पर जगण्याची सुध ज्यास्नी न्हाई ती तुम्ही आम्ही कोन रं, आँ?'

शब्बत एकच वाक्य परत बोलत राहतो, 'ओ पडदी गिडगिडदी अॅक्सदी बेध्यानादी मंगदी दाल ऑफ टोबा टेकसिंह' त्यातून त्याचा संपूर्ण काळ व्यक्त होण्याची ताकद आहे.

नाटकाचा शेवट वेड्याच्या अदलाबदलीकडे येतो. देशाच्या, धर्माच्या, जातीच्या निकषावर, तेव्हाही अनेक प्रश्न उपस्थित होतात. सुरुवात ते शेवट असा संपूर्ण काळ नाटक खिळवून ठेवत, बधिर करते. प्रश्नांच्या गुंत्यात जखडून टाकते आणि त्या काळाच्या उंबरठ्याशी नेऊन उभे करते, रक्तबंबाळ झाल्यासारखे.

किरण येले हे कवी कुळातले. 'चौथ्यांच्या कविता', 'बाईच्या कविता' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'मोराची बायको', 'तिसरा डुळा' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेतच. त्यांचा विद्यापीठ अभ्यासक्रमात समावेशदेखील आहे. आजचा आघाडीचा, कसदार लेखन करणारा कवी आणि कथाकार अशी त्यांची ओळख आहे. नाटक– जल गई पतंगे, प्लॅटफॉर्म नं. ९, बाई, अमिबा आणि स्टीलचा ग्लास इत्यादी नाटके त्यांच्या नावावर आहेत. शिवाय वेगवेगळ्या टीव्ही चॅनेलसाठी मालिकालेखन, चित्रपट–माहितीपट–संहिता व गीतलेखन, संपादन यातही ते व्यग्र आहे. अनेक मान्यताप्राप्त पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. 'जागो, मैं खुदा हूँ' या नाटकालादेखील अनेक पुरस्कार लाभलेले आहे. त्याच्याच सादरीकरणाचे फोटो आत आणि मुखपृष्ठावर आहेत. सुधाकर वसईकर यांची प्रस्तावना आणि किरण येले यांचे मनोगत नाटक समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरणारे आहे.

**मूल्य १०० रुपये  सवलतीत ६० रुपये**




# ग्रंथपान

**शब्दांचा झुला**
**मोनिका गजेंद्रगडकर**




**शब्दचित्रे अनुभवांची आणि चिंतनाची**

*''माझं एकही लग्न झालेलं नाही. मला करायचं नाही, कारण माझ्यातला पुरुषाला मी चांगलाच ओळखतो. मला साराचा मित्र म्हणूनच राहायचं आहे. मी एकदा का तिचा नवरा झालो तर माझ्यातला पुरुष तिच्यातली स्त्री याच्या शोधत राहील. तिच्याकडून माझ्या अपेक्षा वाढतील. मग आमच्यातलं मैत्र म्हणून हरवून जाईल. मला सारा एक माणूस म्हणून, एक केवळ स्त्री म्हणून नाही; मला सारा आवडते कारण ती माणूस म्हणून सुंदर आहे. ती बायको झाली माझी तर मी आपोआप तिच्यावर हक्क गाजवू लागेन.''*

एक स्त्री तिच्याभोवती अनेक नात्यांची सुंदर आणि तितकीच तरल गुंफण आहे. सुगरणीच्या घरट्यासारखी. मुलगी, प्रेयसी, पत्नी, आई ही दिसणारी सर्वमान्य बिरुदावली, पण त्याहीपलीकडे अनेक नाती तिच्याभोवती रुंजी घालत असतात फुलपाखरांसारखी. त्यात असते प्रेम, वात्सल्य, माया, करुणा यांचा गुंजारव. कळतो तो त्याला, जो तिच्याशी जोडला गेलेला आहे. आणि अशीही नाती तिला जखडून टाकणारी आहेत. कर्तव्य, जबाबदारी, संस्कारी, सामाजिक चौकटी, मर्यादा, त्यात होणारी तिची घुसमट, छळ, कुंचबणा, अवहेलना... आणि बरेच काही, जे 'अत्याचार' या एकाच शब्दातून व्यक्त होते. या सगळ्यांचा शोध घेणे हे प्रत्येकासाठी आव्हान ठरते. तरीही प्रत्येक जण शोध घेत राहतो आपापल्या परीने. या शोधात दोन स्तरांत विभागणी असते. एक शरीर आणि दुसरे मन यातला महत्त्वाचा भाग ठरतो मनाचा. स्त्रीच्या मनाचे सुंदर आणि तरलभावविश्व ज्याला समजले तो/ती मनाने सुंदर आणि नितळ आहे असे समजायला हरकत नाही. ज्यांना त्याचा तळ सापडलेला नाही त्यांची नजर गढूळ आहे किंवा त्यांच्या मनाची कवाडे चिरेबंदी नजरेने बांधत आहेत, असा निष्कर्ष काढायलाही हरकत नाही. याची सत्यता पडताळून पाहायची असेल तर वाचा 'शब्दांचा झुला' हा लेखसंग्रह.

आपल्या प्रियकरात एक मूल शोधणारी सारा आणि साराच्या वाट्याला आलेल्या दुःखात स्वतःची सहनशील आई पाहणारा पॉल, स्त्री–पुरुष नात्यातले हे अनोखे मैत्र केवळ लेखिकेच्याच नितळ नजरेला दिसू शकते. काळ्या कातळातून कोरलेल्या स्त्रीच्या शिल्पात कुठेही पडणारे सौंदर्य तिच्या वात्सल्यात सापडले. आई सुंदर असो वा नसो, ती कशीही असली तरी ती आईच असते आणि तिचे वात्सल्य हेच सौंदर्य असते, हे सौंदर्य टिपणारी नजर खऱ्या कलात्मकतेची पारख करणारी नजर ठरते. यासाठी लेखिकेने योजलेले वाक्य – कलावंताच्या त्याच्या कलेमागच्या असीम सर्जक. सुंदर विचारांतच तर त्याच्या सृजनशीलतेचे खरे शिल्प असते. हे त्यांच्याही सर्जनशीलतेचे दर्शन घडवते, तसे लेखिकेच्याही.

आजची तरुण पिढी धावते आहे. त्यांना रुजू पाहणारी नाती हवीत की नको, या प्रश्नाचे उत्तर आहे, त्यांना नसलेला वेळ. यापेक्षा या नात्यांतून निर्माण होणारे हक्क, बांधलेपण, बंधन, अपेक्षांची ओझी त्यांच्या असीम अवकाशाच्या आड येतात. हे लेखिकेचे निरीक्षण तंतोतंत मान्य करावेच लागते. तसाच नव्या पिढीला आपण अवकाश द्यायला हवा, त्यांच्या नव्या विचारांचाही सन्मान आपण करायला हवा, हा विचारही.

प्रवासाच्या निमित्ताने भारत आणि परदेशातले अनुभव सांगताना केवळ सुंदर, छान, विलोभनीय अशा विशेषणांची उधळण नाही, आहे त्या सौंदर्यातल्या आतल्या गाभ्याची ओळख. एखादे चित्र पाहताना त्यातल्या नेमक्या जागा सापडल्या की संपूर्ण चित्रच आपल्या मनात ठसते, तशी वर्णने यात आलेली आहेत. या वर्णनांत केवळ निसर्ग वा व्यक्ती नाही, त्यात लेखिकेच्या मनात आलेल्या विचारांची, संदर्भाची, अनुभवांची साथसोबत करत असते. भावना, संवेदना या मानसिक हिंदोळ्यांचे वरखाली जाणारे झुले असतात.

'शब्दांचा झुला' हे मोनिका गजेंद्रगडकर यांचे पुस्तक. ३६ लेखांचा हा संग्रह आहे. त्यात अनेक विषयांचा समावेश आहे. हे विषय तसे लहानसा अनुभव देणारे, परंतु त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यातून फुलणारे विचार, त्यांना जोडून जाग्या होणाऱ्या संवेदना, मनात उठणारे कल्लोळ यांचा अवकाश मोठा आहे आणि तो अंतर्मुख करणारा आहे. प्रत्येक लेखात उतरलेले विचाराचे बीज आपल्याही मनात थेट रुजण्याइतके अलगदपणे येऊन विसावते. त्यांच्या निरीक्षणाची लेन्स पारदर्शक आहे. ज्याचा स्वीकार करता येणार नाही, त्यातला मळ त्या स्पष्टपणे दाखवतात आणि जे मनापासून भावते त्याची नुसती भलावण करत नाहीत, त्यातले सौंदर्यही अलवार नजरेस आणून देतात.

माझ्या स्पर्शातून तिच्या दुःखावर डूब धरू पाही.' 'दुःखांना उत्तरं नसतातच. त्यांचा स्वीकार हेच असेल तर उत्तर!' 'अगदी शब्दच तिचे शत्रू असल्यासारखे तिचे ओठ शिवलेलेच जसे.' 'गरोदरपणामुळेही तिच्या डहाळीवर शब्दांची फुलं फुलली नव्हतीच.' अशी सुंदर वाक्ये सुभाषितांसारखी लेखांतून येतात तेव्हा लेखिकेचे प्रतिबिंब त्या लेखात अलगदपणे उतरलेले आणि लेखाच्या सौंदर्याचे प्रतिबिंब आपल्याही मनात आपोआप प्रतिबिंबित होत जाते. लेखिकेच्या निरीक्षण, चिंतनातून, संपन्न आणि कसदार संवेदनशील जाणिवांतून दिसणारे संस्कृती, समाज, माणूस आणि निसर्ग वेगळी दृष्टी बहाल करतात, आपल्याला एकरूप करून घेतात आणि त्याचवेळी अंतर्मुखही करतात.

मोनिका गजेंद्रगडकर आपल्याला सुपरिचित आहे त्या कथाकार आणि कादंबरीकार म्हणून. अनेक दर्जेदार मान्यवर पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. प्रथितयश मौज प्रकाशनगृहाच्या त्या संपादक असून अनेक साहित्यिक मंडळ–समित्यांवर त्यांची नियुक्ती झालेली आहे.

या पुस्तकासाठी अन्वर हुसेन यांनी अतिशय उत्तम असे शीर्षक व सुंदर मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य २०० रुपये  सवलतीत १२० रुपये**


कहाणी संस्कारांची,
प्रेमळ मातृत्वाची
यशोदा
गोष्ट श्यामच्या आईची
सोम-शनि
दु.12.30वा.
ZEE मराठी

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.